साप्ताहिक
माणूस
१० सप्टेंबर ८३/दोन रुपये

# नवमुंबईतले नवे 'रामराव आदिक' इंजिनिअरिंग कॉलेज







# राजश्री प्रॉडक्शनचे सिनेमे

# साडेसहा कोटी वृध्द- यांच्याकडे आपण कसे बघणार आहोत?

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : तेविसावे

अंक : पंधरावा

१० सप्टेंबर १९८३

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

संजय पवार

## सप्रेम नमस्कार, माणूस

### माझे अनुभव

जुलै ८३ चा 'माणूस' चाळायला लागले नि शोभा भागवत यांच्या 'आनंदाचे अनुभव' या लेखाने माझे मन वेधून घेतले. मी एक प्राथमिक शिक्षिका आहे. असे अनुभव नेहमीच येतात. मुलांना थोडा मोठेपणा देण्यात आपणही जो आनंद मिळवितो तो अवर्णनीयच असतो. लहानांना थोडेसेच दिले तरी त्याची परतफेड 'आवळा देऊन कोहळा' या स्वरूपात होते; परंतु मोठ्यांना कोहळा देऊन आवळाही पदरात पडेलच असे नाही.

बालकवर्ष होते. आम्ही काही प्रकल्प हाती घेतले होते. त्यात एक असा प्रकल्प होता की– त्या दिवशी ज्या मुलाचा वाढदिवस असेल त्याला प्रार्थना झाली की त्याच हॉलमध्ये उभा करून पिंजरेचा टिळा लावायचा व ओवाळायचे, नि सर्वांनी 'हॅपी बर्थ डे टु यू' म्हणायचे व टाळ्या वाजवायच्या. खरे म्हणजे यात आम्ही फार काय करीत होतो ? परंतु त्या वेळचा त्या मुलाचा फुललेला चेहरा पाहून इतके समाधान मिळायचे की मोठ्यांना पाचशे रुपयांचे प्रेझेंट देऊनही मिळणार नाही ! मुले ही निरागस, मोकळी असतात. लहानसहान बाबतीत होणारा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर लगेच दिसून येतो. इथे नाटकीपणाला थारा नसतो. खोटे मुखवटे नसतात. त्यामुळे करणाऱ्यालाही फार मोठा आनंद मिळून जातो.

असाच एके दिवशी एका मुलाचा वाढदिवस शाळेत नेहमीप्रमाणे साजरा झाला. खूप आनंदित झाला तो ! परंतु घरी गेल्यावर एवढा धुमाकूळ घातला की विचारू नका ! का तर म्हणे शाळेत वाढदिवस साजरा झाला नि घरी आईने काहीच कसे केले नाही ? बाबांचे ऑफिस, आज शाळा म्हणून तुझा वाढदिवस रविवारी करायचा ठरविला आहे असे आईने त्याला जवळ घेऊन सांगताच स्वारी ताळ्यावर आली; पण हेच जर का आईने त्याला आधीच सांगितले असते, पटविले असते तर नसते का जमले ? ज्याचा वाढदिवस, जी उत्सवमूर्ती त्याचा विचार न घेता मोठ्यांनीच सोईप्रमाणे बेत आखायचे यात त्या मुलाला काय मिळाले ? माझा वाढदिवस, माझ्या आवडीचे खायला करणार, माझ्या शाळेमुळे बेत रविवारचा. हे मुलाला आधीच समजले असते तर तो त्याचा आनंद दीर्घकाळ टिकला असता व नसता गोंधळ टळला असता.

शेजारच्या ५।६ वर्षांच्या मुलीला मी विचारले की अग, 'आज तुझा वाढदिवस ना? मग आईने गोड काय केले ?' ती म्हणाली, 'आईने मला विचारले की कालच बाबा अचानक पुण्याला गेले आहेत आठ दिवसांनी येतील. येताना तुला फ्रॉक आणतीलच. मग ते आल्यावर तुझा वाढदिवस साजरा करायचा की आज ?' मग मीच सांगितले, 'बाबा असताना किती मज्जा येते नाही ? बाबा आल्यावरच माझा वाढदिवस कर. पण मला आवडणारे गुलाबजाम मात्र कर हं !' त्या मुलीचा थोडासा विचार घेताच किती खुशीने तिने संमती दिली नि त्या दिवशी वाढदिवस साजरा न होताही खुशी होती वाढदिवस जणू साजरा झाल्याची !

दरवर्षी मेमध्ये माझ्या भाचीचा मुलगा पुण्याहून येतो. पाच-सहा वर्षांचाच आहे. पण दरवेळी एक-दोन नवीन खेळ घेऊन येणार. उदा. सापशिडी, अडथळा, पत्त्याच्या जादू, कोडी. आला की सर्वांना ते खेळ जणू काही आपल्यालाच माहीत आहेत अशा थाटात शिकवणार. खेळाचा निकाल वगैरे त्याच्यावरच सोपवून आपण खेळायचे. खरं म्हणजे त्या खेळात आपल्याला काही नवीन

मसतेच ! परंतु थोडा वेळ त्याला शिक्षक होऊ द्यायचे. आपण यांना–मोठ्यांनाही काही शिकवतो या समाधानात तो चेहऱ्याचे वगैरे असे काही हावभाव न करून नियम वगैरे सांगत असतो की, आपण नकळत त्या आनंदात सामील होऊन फार मोठे समाधान मिळवतो व देतोही.

सहलीच्या वेळी तर हा आनंद मी पुरेपूर लुटते. मुलांच्या सहली या मुलांसाठीच. त्यांनाच जास्तीत जास्त आनंद मिळवून द्यायचा. सहलीच्या गाड्या ठरतात. सर्वच मुलांना मी त्यांच्या गाडीत असावे असे वाटते, कारण एरव्ही शिस्तीची बाई, मी सहलीत एकदम बदलते. मुलांना खूपच स्वातंत्र्य देते. काही शाळांतून नेहमी कडक शिस्त असतेच; परंतु सहलीतही त्यांनी अगदी रांगेने जावे, मोठ्याने बोलू नये, असा निर्बंध असतो. नेहमीच शिस्तीत ठेवण्याचा प्रयत्न केला तर परिणाम उलटा होतो. त्यांची बंडखोर वृत्ती उफाळून वर येते. बाहेर पडल्यावर तीच मुले समाजात वागायला योग्य ठरत नाहीत. गाडीत अगर मुक्कामावर मुलांना नाच, गाणी मोकळेपणी करू दिल्याने मुले सहलीचा आनंद पुरेपूर लुटतात. त्या मुलांच्यात बसल्याने तर त्यांना केवढा आनंद मिळतो ! त्यांनी आपल्या चिकाचिकीत हाताने लाजत–मुरकत दिलेली एखादी लिमलेटची गोळी घेतली तर त्यांना केवढा आनंद होतो ! त्यांच्यात जेवायला बसणे, त्यांना आधी पाणी, आधी चहा देण्यात त्यांचा 'ईगो' सुखावला जातो. आईप्रमाणे बाईही आपले करतात याचा त्यांना अभिमान वाटतो आणि सहलीहून परतताना मुले अगर आपण थकतो; परंतु समाधानाचे गाठोडे घेऊनच घरात पाऊल ठेवतो.

सहलीच्या वेळी मुलांना प्रात्यक्षिकातून धडे दिल्यास परिणामकारक होतात. पानात अन्न टाकू नये, नाश करू नये हे ओरडून नि मारून सांगूनही काही उपयोग होत नाही हे पुष्कळ पालकांनाही समजत नाही. माझ्या भाच्याला पानात टाकण्याची सवय होती. त्याला एकदा मिरज स्टेशनवरचे दृश्य दाखविले की आपण जेवून टाकलेली पाने चाटून मुले आपली गुजराण करतात. ते दृश्य पाहिल्यावर त्याने आपणहून पानात टाकण्याची सवय टाकली.

मुलांच्या बाबतीत कटाक्षाने मात्र एक गोष्ट टाळली पाहिजे की दुसऱ्या मुलांशी तुलना !

आपल्या मुलांनी असे वागावे, असे व्हावे नि तसे व्हावे असे आपण म्हणत असतो. आपल्या कल्पना, आपली मते ही आपल्या जमान्यातली असतात. ती आपण त्यांच्यावर लादू पहातो. त्यांना त्यांच्या जमान्याप्रमाणे जाऊ द्या ना, आपण फक्त त्यांच्या नावेचे सुकाणू आपल्या हातात ठेवायचे. नाव बाजूला जायला लागली तर वळवायची इतकेच. वल्ही त्यांनाच मारू द्या ना. नाव आपण चालवली, आपण पैलतीरी हे समाधान त्यांना द्या की. सुकाणू कोणी का धरेना ! पालक हे सारेच आपल्या हाती ठेवू इच्छितात नि मग...मुलांची नाराजी, बंडखोरवृत्ती, हाताबाहेर जाणे सुरू होते. मग आपण कितीही प्रयत्न केला तरी काही उपयोग होत नाही.

मुलांनी सतत अभ्यास करावा, मोठे व्हावे ही बऱ्याच पालकांची अपेक्षा असते. शाळेतून आल्याबरोबर खाऊन–पिऊन लगेच अभ्यासाला बसावे. मुलगा कुरकुरू लागताच त्याला दम भरून, तर काही वेळेला मार देऊन अभ्यासाला बसवितात. १०–३० वा. शाळेत गेलेली मुले थकून–भागून ६ वाजता घरी परततात अशा वेळी त्यांनी थोडे खेळलेच पाहिजे. खेळामुळे मुले ताजीतवानी होतात. त्यांना फार तर अट घालावी आता एक तास खेळ; परंतु रात्री दोन तास अभ्यास केला पाहिजे. मुले आनंदाने ती अट पाळतात. जबरदस्तीने अभ्यासाला बसवून त्यांचे अभ्यासात मन एकाग्र होईल का ? बाकी शेजारची मुले खेळत असता त्याची नजर पुस्तकावर असली तरी चित्त तेथे असेल का याचा पालकांनी विचार करावा. पेपरात शंभरापैकी शंभर गुण मिळवले म्हणजे तो हुषार व चांगला मुलगा व ज्याचा समतोल सर्वांगीण विकास झाला आहे पण पेपरात कमी मार्क्स मिळाले आहेत तो कमी दर्जाचा, हा समज पालकांनी काढून टाकावा. आजच्या धकाधकीच्या जीवनात टिकाव धरायचा असेल तर मुलाला सर्व क्षेत्रात गती असली पाहिजे. आता पालकांनी बदलले पाहिजे, मुलांशी अधिक समरस होऊन त्यांच्या आनंदात आपण मिसळले पाहिजे. त्यांना समजून घेतले पाहिजे.

२३ ऑगस्ट ८३ कमल गोविंद ठाकुरदेसाई
राजापूर

☐ आपल्या साप्ताहिकातील 'इस्लामिक बाँब' लेखमालेतील लेख वाचले व भारतापुढील आव्हानाची व संकटाची कल्पना आली. आता भारताने अण्वस्त्रांचा विकास केलाच पाहिजे. पाकिस्तान अणुबाँबचा उपयोग भारताविरुद्ध करेल हे उघडच आहे.

पाकिस्तानच्या अणुबाँब व वाढत्या लष्करीबळामुळे भारताच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक जीवनावर होणाऱ्या परिणामासाठी चर्चा होणे आवश्यक आहे.

तसेच १९६५ व १९७१ च्या युद्धाबाबत पाकिस्तान, भारत व परदेशी तज्ज्ञ लोकांनी लिहिलेले लेख प्रसिद्ध केल्यास बरे होईल. तसेच या युद्धात दोन्ही देशांनी वापरलेल्या युद्धसामग्रीची सविस्तर माहिती आवश्यक आहे.

आपल्या साप्ताहिकातील इस्लामिक बाँब या आगामी संकटाची चाहूल देणाऱ्या लेखाबाबत धन्यवाद !

२९ ऑगस्ट ८३ सुधीर कांबळी
पुणे

☐ हल्ली 'माणूस' हा एक वाचनीय अंक तर आहेच शिवाय आपण जे नवीन नवीन उपक्रम चालू केले आहेत त्याबद्दल अभिनंदन.

आपण नाट्यपंढरी हे जे सदर चालू केले आहे ते फारच छान आहे. त्यामुळे नटमंडळी नुसती प्रदर्शनातील वस्तू नाही हे लोकांच्या लक्षात येईल. तसेच पूर्वीची नटमंडळी डिग्ऱ्या घेतलेली नसून सुद्धा किती सुसंस्कारित होती, निष्ठा, प्रामाणिकपणा त्यांच्यात किती होता हे समजून येते, एका रात्रीत प्रकाशाच्या झोतात येणाऱ्यांना तर ही माहिती चांगलीच मार्गदर्शक ठरेल. प्रसिद्धी मिळण्यापूर्वी त्यांनी त्या कलेसाठी किती कष्ट घेतले आहेत, केवढी तपश्चर्या केली आहे हे दिसून येते आताही तशी मंडळी आहेत; परंतु ती अगदी हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच.

हे सदर लिहिणारे श्री. गो. रा. जोशी नाट्यवाङ्मयाचे किती अभ्यासू व प्रेमी आहेत हे दिसून येते. जुन्या नटांच्याबद्दल असलेले गैरसमज दूर झाले तरी सुद्धा हे सदर चालू केल्याचे सार्थक झाले असे आपल्याला व लेखकाला वाटेल. उत्तरोत्तर 'माणूस'ला असेच यश लाभो !

३१ ऑगस्ट ८३. सौ. विपुला कोल्हटकर
पुणे

## एक तेजीत चालू शकणारा धंदा

# रामराव आदिक इंजिनिअरिंग कॉलेज, नवमुंबई

विष्णू जयदेव

महाराष्ट्र सरकारने विना–अनुदान तत्त्वावर अभियांत्रिक महाविद्यालयांना मान्यता द्यायचे ठरविले आणि पावसाळ्यात कुत्र्याच्या छत्र्या उगवाव्यात तसा इंजिनिअरिंग कॉलेजांचा राज्यभर सुकाळ झाला. आजपर्यंत एकूण ३४ संस्थांना ही महाविद्यालये उघडण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. मुंबापुरी ह्यात मागे कशी असेल ? येथे तर चक्क 'रामराव आदिक इंजिनिअरिंग कॉलेज' निघाले आहे. मागे बाबासाहेबांनी दारूचे परवाने वाटले तेव्हापासून आम्ही मुंबापुरीत रामराव आदिक कंट्री–लिकर-बार निघणार आहे अशा अफवा ऐकून होतो; पण आदिकांची ही शिक्षणक्षेत्राविषयीची आस्था पाहून आम्हाला आनंद वाटला. आता सावकाशीने मुंबापुरीत एस्. एम्. आय्. असीर पॉलिटेक्निकसुद्धा सुरू होईल ! असो.

ह्या पावसाळी अधिवेशनात विरोधी पक्षांनी सरकारच्या या नव्या योजनेवर केलेली टीका आणि शिक्षणमंत्री सुधाकर नाईक ह्यांनी दिलेली उत्तरे ह्यामुळे या नव्या संस्थांविषयीचे आमचे कुतूहल जागृत झाले होते. ते ह्या रामराव आदिक इंजिनिअरिंग कॉलेजमुळे अधिकच चाळवले गेले.

वृत्तपत्रांतून तर या नवीन महाविद्यालयांबद्दल उलटसुलट चर्चा चालू आहेच. दादा तर जेथे जातात तेथे या नव्या कल्पनेचे समर्थन करतात.

'पुण्या–मुंबईला ॲडमिशन मिळाली नाही की आपली मुले कर्नाटकमधील विद्यालयात प्रवेश मिळवितात. मग त्यांची व्यवस्था आपण येथे का करू नये ? महाराष्ट्राने काय केवळ कारकून आणि टायपिस्टच निर्माण करायचे ?' वगैरे वगैरे मुद्दे मांडण्यात आले. याच वेळी ऑगस्टच्या सुरुवातीस रामराव आदिक कॉलेजच्या जाहिराती वृत्तपत्रांतून येऊ लागल्या. तेव्हा हा काय प्रकार आहे हे पाहण्याचे आम्ही ठरविले.

ह्या कॉलेजचे प्रमुख प्रवर्तक आहेत कॉंग्रेस आयचे माजी आमदार आणि गारगोटीच्या मौनी विद्यापीठाचे अध्यक्ष डी. वाय. पाटील. खरे पाहता या ३४ पैकी निम्म्याहून अधिक कॉलेजेस कॉंग्रेस आयच्याच लोकांना देण्यात आलेली आहेत. मागे बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री असताना जास्तीत जास्त दारूचे परवाने पार्टीच्याच लोकांना वाटण्यात आले होते आणि आता महाविद्यालये. (यावरून पार्टीत कार्यकर्त्यांचे इंटरेस्ट किती वैविध्यपूर्ण आहे हे ध्यानात यावे.)

पाटील, १९७८ मध्ये वसंतदादांनी कोल्हापुरातून उभ्या केलेल्या उमेदवाराविरुद्ध निवडणूक हरले. तेव्हापासून दादांना त्यांचा विरोध आणि आदिकांशी घरोबा !

मुंबई पुणे महामार्गावर कोकणभवनाच्या समोर सीने फाइन ह्या जाहिरातसंस्थेने डोनेट केलेला रामराव आदिक इंजिनिअरिंग कॉलेजचा बोर्ड तुम्हाला दिसेल. तेथून आत गेलात की सीडकोच्या वसाहतीच्या एका टोकाला एक तीन मजली इमारत लागते, तेच हे कॉलेज.

सीडकोमधून आम्हाला जी माहिती मिळाली त्यानुसार ही इमारत शाळेसाठी राखून ठेवण्यात आली होती. कोणत्याही प्रकारे निविदा न मागवताच सीडकोने ही इमारत संस्थेच्या ताब्यात दिली.

ऑगस्ट २५ ला आम्ही कॉलेज पाहण्यास गेलो. सप्टेंबर एकपासून हे महाविद्यालय सुरू होणार. पण बाहेर सामसूम होती. डी. वाय्. पाटील आतमध्ये हैड्रोजनबॉंब तयार करीत असावेत अशी एक दाट शंका आम्हाला आली. कारण बाहेरचा पहारेकरी काही केल्या आत सोडेना ! एवढेच काय तर बाहेरच्या बोर्डावरील ट्रस्टींची नावेही लिहून घेण्याला त्याचा विरोध होता. पाटीलसाहेबांचा सक्त हुकूम होता की, त्यांच्या गैरहजेरीत कुणालाही आत सोडायचे नाही–विशेषतः पत्रकारांना. आम्ही आत प्रवेश कसा मिळविला हे येथे सांगण्याची आवश्यकता नाही.

या इमारतीतील फक्त तीन वर्गांत हे महाविद्यालय सुरू होणार आहे. एकूण १२० मुलांना पहिल्या वर्षासाठी ॲडमिशन दिली जाईल. इन्स्टरुमेंटेशन, इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटर सायन्स अशा तीन शाखांसाठी परवानगी देण्यात आली आहे.

तीनही वर्गात मिळून तीसच्या वर बाके नाहीत. कोणत्याही वर्गात फळ्याचा पत्ता नाही! शेजारचा एक हॉल आम्ही उघडून पाहिला. १२० मुलांसाठी दहा ड्रॉइंग बोर्डस् आणि समोरच्या पाटील आणि आदिकांच्या शेजारी शेजारी लावलेल्या तसबिरी. प्रयोगशाळेचा मागमूसही नाही. वरच्या मजल्यावर काही खोल्यांत १५ ते २० लोखंडी खाटा आणि टेबले होती. येथे बहुधा विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था केली जाईल अशी शंका आमच्या मनाला चाटून गेली. ( मन चिंती ते वैरीही न चिंती म्हणतात ते असे ! ) ऑफिसच्या फर्निचरचा पत्ता नाही. अजून इमारतीत फोनही आलेला नाही. एवढ्या तयारीवर म्युनिसिपालिटीची शाळाही सुरू होत नाही, मग अभियांत्रिक महाविद्यालय कसे सुरू होणार ? येथे प्रवेशासाठी मुलांना साडे-सहा हजार रुपये फी भरावी लागणार. शिवाय वसतिगृहाचा खर्च वेगळा. याच अभ्यासक्रमासाठी व्ही. जे. टी. आय्. मध्ये मुलांना ४०० रुपये फी भरावी लागते. असो. टागोरांनी विश्वभारती झाडाखालीच सुरू केले. इमारती मागाहून आल्या अशी मनाची

समजूत घालून आम्ही मुंबईत परतलो.

जसलोक हॉस्पिटलशेजारी असलेल्या हिल ग्रेंज हायस्कूलमध्ये ह्या कॉलेजचे ऑफिस आहे, असे समजल्याने आम्ही तेथे गेलो. शाळेच्या पहिल्या मजल्यावर कॉरीडॉरमध्ये तीन–चार माणसे कोचावर बसली होती. ॲडमिशनसाठी आलेल्या मुलांचे ते बहुधा पालक असावेत. कोचावरच एका बाजूला एक कारकून. आम्ही त्यांना कॉलेजचे प्रॉस्पेक्टस मागितले, पण त्यांच्याकडे कोणतेच पत्रक नव्हते. 'तुम्ही पाटीलसाहेबांनाच भेटा. तेच तुम्हाला माहिती देतील. आम्हाला काही सांगता येणार नाही.' असे ते म्हणाले.

रात्री नऊच्या सुमारास आम्ही पाटलांच्या घरी फोन केला. ते या म्हणाले म्हणून पावणे-दहाच्या सुमारास त्यांच्या घरी पोहोचलो. आमच्या येण्याने त्यांना फारसा आनंद झालेला दिसला नाही. त्यामुळे आम्ही थोडे हिरमुसले झालो; परंतु आपण आस्थेने संस्थेविषयी चौकशी केल्यास त्यांना आनंद वाटेल म्हणून आम्ही त्याच विषयाला हात घातला.

पाटील म्हणाले की, रामराव त्यांचे जवळचे मित्र असल्याने त्यांचेच नाव त्यांनी कॉलेजला दिले; पण इतक्या जलद रामरावांच्या नावाने शिक्षणसंस्था काढून, त्याच नावाने कॉलेज कसे काय काढण्यात आले? यावर ते म्हणाले की, या नावाला ऐतिहासिक महत्त्व नसले तरी भौगोलिक महत्त्व राहीलच की! (मौनी विद्यापीठाचा इतिहास ध्यानी घेता पाटलांना इतिहासाचा दुरावा वाटणे साहजिकच आहे.)

ते म्हणाले की, एक–दोन वर्षांत कॉलेजची वेगळी इमारत उभी राहील. तोवर मुले व्ही. जे. टी. आयमध्ये प्रात्यक्षिकांसाठी जातील. कॉलेजसाठी स्टाफ मिळवणे कठीण नाही. रिटायर्ड शिक्षकही मिळू शकतील, असे त्यांचे म्हणणे पडले. कॉलेजच्या ट्रस्टींबद्दल अधिक माहिती सांगण्याची त्यांची इच्छा नव्हती; पण ह्या ट्रस्टींमध्ये त्यांच्या पत्नीसह ट्रान्सपोर्ट ओनर, स्पेअर पार्ट डीलर आणि एक मद्याच्या कारखान्याचा मालक देखील आहे. अधिक माहिती विचारताच पाटील म्हणाले की, ट्रस्टींच्या सर्व व्यवहारांबाबत आपल्याला फारशी माहिती नाही. कॉलेजच्या ॲडमिशन्स चालू आहेत; पण आपल्याजवळ प्रॉस्पेक्टसची कॉपी नाही.

त्यांनी आम्हाला पुन्हा पुन्हा बजावून सांगितले की, इन्फ्रास्ट्रक्चर आणि तंत्रशिक्षण याविषयीच्या आपल्या संकल्पना वेगळ्या आहेत; पण त्या त्यांनी आम्हाला स्पष्ट केल्या नाहीत.

## खास मान्यता

व्ही. जे. टी. आय. ही सरकारी संस्था असल्याने प्राध्यापकवर्ग या रामराव आदिक कॉलेजविषयी जरा जपूनच बोलतो. प्रिन्सिपल डॉ. गुपचुप यांनी तर कॉलेजविषयी कोणतेही मत व्यक्त करायचे टाळले. ते फक्त म्हणाले की, आम्ही त्यांना फार काळ सोयी पुरवू शकणार नाही. त्यांची त्यांना व्यवस्था करावी लागणारच.

प्रथम वर्ष इंजिनिअरिंगसाठी व्ही. जे. टी. आय.मध्ये एकूण २२० जागा आहेत. येथे ॲडमिशन्स नेहमी ८८ ते ९० टक्क्यांना बंद होतात. डिग्री आणि डिप्लोमाच्या मिळून दोन हजार मुलांनाच येथील प्रयोगशाळा अपुऱ्या पडतात. यात अधिक भर पडली तर प्रॅक्टिकल्स घेणेही शक्य होणार नाही, असे बऱ्याच प्राध्यापकांचे मत पडले. कॉलेजचा स्टाफ आणि विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार सरकारकडून दबाव आल्याने व्ही. जी. टी. आय. ने बाहेरच्या मुलांसाठी शनिवार–रविवारी प्रॅक्टिकल्स घेण्याचे मान्य केले आहे; परंतु व्ही. जी. टी. आय. मधील लॅबोरेटरी स्टाफ मात्र या व्यवस्थेला राजी नाही. विद्यार्थ्यांनी तर कॉलेज ह्या दबावाला बळी पडले तर संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. ज्या ज्या प्राध्यापकांशी आम्ही बोललो त्यांनी तर इतक्या अपुऱ्या तयारीवर मुंबई विद्यापीठाने ह्या कॉलेजला मान्यताच कशी दिली ह्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले.

दुसऱ्याच दिवशी आम्ही मुंबई विद्यापीठात गेलो तेथे असे कळले की, कार्यकारी समितीचा (Executive Council) मान्यतेला विरोध असतानाही उपकुलगुरू गोरे ह्यांनी त्यांचे खास अधिकार (Special–powers) वापरून ह्या महाविद्यालयाला मान्यता दिली. एरवी हे विद्यापीठ साधी लायब्ररी नसेल तर आर्टस् आणि सायन्स कॉलेजला मान्यता देत नाही आणि येथे तर कॉलेजने अर्जही न करता त्याला मान्यता देऊन विद्यापीठ मोकळे!

उपकुलगुरू डॉ. गोरे म्हणाले की, 'इतक्या तुटपुंज्या तयारीत इंजिनिअरिंग कॉलेज कसे चालवले जाणार ह्याबद्दल मलाही शंका होती; पण सरकारलाच कॉलेजसाठी विद्यापीठाची मान्यता हवी होती आणि म्हणून आता मला माझ्या खास अधिकारात ती द्यावी लागली. मॅनेजमेंटच्या योग्यतेबद्दल मला काहीच बोलायचे नाही. (I was doubtful as to how they can run an engineering college with such megre facilities; but then the Government was keen on affiliating it to Bombay University and so I used my special powers. As per the credentials of the management, I have nothing to say.)

तंत्रशिक्षणखात्याचे संचालक (Director Technical Education) जी. एस. कडू ह्यांना आम्ही भेटलो तेव्हा ते म्हणाले की, तंत्रशिक्षणाचा दर्जा घसरू नये म्हणून सरकारने एक कमिटी स्थापन केली आहे. ही नवीन कॉलेजस् चालविण्यासाठीसुद्धा ट्रस्टींखेरीज वेगळी गव्हर्निंग बॉडी असेल. एखादी संस्था जर निश्चित केलेला दर्जा राखू शकली नाही तर तिची मान्यता काढून घेतली जाईल.

परंतु कोणत्याही विद्यापीठात असे सहसा होत नाही. एकदा तुम्ही मान्यता दिली आणि प्रथम वर्षाचे विद्यार्थी दुसऱ्या वर्षात पोहोचले की, मान्यता काढून घेणे शक्य होत नाही. मुलांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण होतो. इतक्या मुलांना दुसऱ्या कोणत्या संस्थेत प्रवेश देणार?

डायरेक्टोरेट ऑफ टेक्निकल बोर्ड मेरिट लिस्टवरून ॲडमिशन्स देते; परंतु ह्या नव्या कॉलेजामध्ये दहा टक्के जागा मॅनेजमेंटच्या इच्छेनुसार (at the discretion) दिल्या जातील. तंत्रशिक्षणखात्याचा अथवा सरकारचा त्यांच्यावर ताबा नाही.

आणि ह्याच एका कारणासाठी आम्ही सुरुवातीला म्हणालो त्याप्रमाणे पावसाळ्यात कुत्र्याच्या छत्र्या उगवाव्यात तशी ही अभियांत्रिक महाविद्यालये राज्यभर उगवली आहेत!

व्ही. जे. टी. आय. सीडकोमधील काही अधिकारी आणि मुंबई विद्यापीठातील सेनेट

आणि कार्यकारी मंडळाचे सभासद यांच्याशी चर्चा केल्यानंतर जी माहिती मिळाली ती अशी :

### व्यवसाय तेजीत

कर्नाटकमध्ये अभियांत्रिक महाविद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी महाराष्ट्रातील मुले ६० ते ७० हजार रुपये कॅपिटेशन फी भरावयास तयार होतात, तर मग महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त विद्यापीठाशी संलग्न असलेल्या अभियांत्रिक महाविद्यालयासाठी हे लोक एक लाख रुपयेही द्यावयास तयार होतील! हे पैसे वेगवेगळ्याप्रकारे गोळा करता येतात. बिल्डिंगफंड म्हणून, लॅबोरेटरीफंड म्हणून किंवा काही महाविद्यालयात तर चक्क एक लाख रुपये पाच वर्षांकरिता विनाव्याज डिपॉझिट म्हणून मागितले जातात !

एक लाख रुपयांचेवरील पाच वर्षांचे व्याजच जवळजवळ ३०,००० रुपये होते. १२ ते १५ जागांपैकी दोन–चार जागा या ना त्या लोकांना खूष करण्यासाठी गेल्या तरी उरलेल्या जागांवर सात ते आठ लाख रुपये डिपॉझिट म्हणून कमावता येतात ! मुलांची फी साडेसहा हजार रुपये असल्याने त्यांच्यावरील खर्चाचा प्रत्यक्ष भार मॅनेजमेंटवर येत नाही. सुरुवातीची दोन–चार वर्षे काही सोयी पुरविण्यासाठी नफ्याचा बराचसा भाग खर्ची पडला तरी त्यानंतर हा व्यवसाय तेजीत चालतो.

आता तुम्ही म्हणाल, कर्नाटकमध्ये असे होत नाही का? काहीतरी आपली मुले कर्नाटकात पैसे देऊन जातातच ना? मग त्यांनी ते येथे दिले म्हणून काय बिघडले ? ज्यांना पैसे देणे शक्य आहे तेच अॅडमिशन्स घेतात. मग इतरांच्या पोटात दुखण्याचे कारण काय? शिक्षणसंस्था काय पैशा–शिवाय चालवायच्या का?

कोणतीही संस्था पैशाशिवाय चालत नाही आणि शिक्षणसंस्थेसाठी पैसा उभा करणे हे तर सर्वांत जिकिरीचे काम. कर्मवीर भाऊराव पाटलांनी ते केले आणि महर्षी कर्व्यांनाही ते करावे लागले. फरक इतकाच की, ही माणसे शिक्षणक्षेत्रातली होती. त्यांचे आयुष्यच या कार्याला त्यांनी वाहून घेतले होते. आमच्या माहितीप्रमाणे महर्षी कर्व्यांचा मॅकडॉवेल व्हिस्कीचा कारखाना नव्हता आणि भाऊराव पाटलांचा (कॉंग्रेस आयचे नव्हेत) स्पेअर पार्टस्‌चा बिझिनेस नव्हता. त्यांनी जेवढे मिळवले तेवढे कारणी लावले. शिक्षणसंस्थांसाठी पैसा गोळा केला. पैशासाठी शिक्षणसंस्था उभारल्या नाहीत !

महाराष्ट्रात आजही अशा शिक्षणसंस्था आहेत की, त्यांचे या क्षेत्रात गेली तीस ते चाळीस वर्षं कार्य चालू आहे. तुम्ही धोबी-तलावावरील डायरेक्टोरेट ऑफ टेक्निकल एज्युकेशनमध्ये गेलात आणि परवानगी मिळालेल्या या अभियांत्रिक महाविद्यालयांची यादी पाहिलीत की तुम्हाला कळेल–यात नावाजलेल्या अशा शिक्षणसंस्था केवळ बोटांवर मोजण्याइतक्याच आहेत; पण सरकारचा निर्णय जाहीर होताच रातोरात स्थापन झालेल्या संस्था मात्र मोप आहेत !

अशी ही मंडळी जेव्हा शिक्षणप्रसाराचा चंग बांधतात तेव्हाच शंकेला जागा निर्माण होते. तामिळनाडू आणि बंगाल यांच्या मानाने शिक्षणप्रसारात महाराष्ट्र मागासलेलाच आहे. मग तेव्हा ही मंडळी कोठे होती? आणि आज जेव्हा विनाअनुदान तत्त्वावर तंत्रमहाविद्यालयांना परवानगी देण्याचे सरकारने ठरविले तेव्हाच ही पुढे का सरसावली ?

ज्यांचा अभियांत्रिक शिक्षणाशी दूरान्वयेही संबंध नाही अशा लोकांनी सुरू केलेल्या ह्या संस्था मूळ धरू शकतील का? यातून मिळवला जाणारा पैसाही शैक्षणिक कार्यासाठीच वापरला जाणार का? या संस्थांतून बाहेर पडणारे विद्यार्थी जबाबदार नागरिक तर सोडून द्या; पण इंजिनिअर म्हणून तरी बाहेर पडतील का? असे बरेच प्रश्न पुढे उभे रहातात.

साधी प्राथमिक शाळाही रातोरात सुरू करणे शक्य नाही तर मग तंत्रमहाविद्यालय तर नाहीच नाही. हे सांगायला व्ही. जे. टी. आय.चे प्राध्यापक वा मुंबई विद्यापीठाच्या उपकुलगुरूंची आवश्यकता नाही. किंबहुना याच कारणासाठी मान्यताप्राप्त अशा फारच कमी संस्था ह्या उपक्रमासाठी पुढे आल्या आणि त्यातूनही प्रत्यक्षात ज्या लोकांना ही महाविद्यालये सुरू करण्यासाठी परवानगी देण्यात आली त्यांच्याबद्दल आम्ही अधिक काय म्हणावे ?– इंग्रजीत एक म्हण आहे Fools rush in where angls fear to trade.

यात थोडा बदल करून आपण म्हणू या. Crooks rush in where angels fear to trade.

–And crooks are no fools !

☐

" एका वेगळ्या विषयावर भर देणारी ही कादंबरी. स्त्री-बुवाबाजीच्या प्रकारांमागचे मर्म उलगडून सांगणारी. कुठलंही भाष्य न करता एक सत्यघटना जशीच्या तशी मांडल्याने झपाटून टाकण्याचे चांगलेच सामर्थ्य या कादंबरीला लाभलंय. त्याच त्या प्रेमाच्या त्रिकोणकथांपेक्षा एक महत्त्वाचा सामाजिक विचार लालित्यपूर्णतेने या नवोदित लेखकाने घडवलाय, त्यामुळे बुवाबाजीसारख्या गोष्टींबावत वाचक अधिक जागरूक बनतील."

पुस्तक पंढरी / ऑगस्ट, १९८२ अंक
बॉंबे बुक क्लब–ऑगस्ट निवड

सबला

लेखक : माधव शिरवळकर.
राजहंस प्रकाशन, पुणे ३०
मूल्य : रुपये बारा

# ललित मुंबई

# भारतीय कलेत उमललेला कृष्ण

म्युझियमच्या कुमारस्वामी हॉलमध्ये सध्या कृष्णजीवनाविषयी कलाकृतींचं एक प्रदर्शन चालू आहे. ' द कृष्ण थीम इन इंडियन आर्ट ' असा या प्रदर्शनाचा विषय आहे. भारतीय कलांमध्ये कृष्ण, कृष्णभक्ती किंवा कृष्णजीवन कुठे चितारण्याचा प्रयत्न केला आहे, त्याचा हा छोटासा पण निवडक संग्रह आहे. त्यामध्ये प्रामुख्यानं दृश्य अशा कलाकृती, चित्रं, शिल्प तर आहेतच; पण काव्यासारख्या साहित्यकृतींनाही प्रतिनिधित्व मिळालं आहे.

धर्म आणि अधर्म, पाप आणि पुण्य, नीती आणि अनीती, पावित्र्य आणि ओंगळपणा या दोन सर्वस्वी वेगवेगळ्या गटात रहात असलेल्या मूल्यसंकल्पना झाल्या एकमेकांपासून सर्वस्वी भिन्न. दोन विरुद्ध टोकंच अशा या संकल्पना, त्यांचे कप्पे एकमेकांसाठी हवाबंद असणार.

पण या हवाबंदपणाला छेद देऊन त्या दोहोंमधूनही झुळझुळणारा जीवनाचा सामायिक प्रवाह दिसतो, तो उघड्या डोळ्यांनी जीवनाला सामोरं जाणाऱ्या विचक्षण बुद्धीला रवीसुद्धा पाहू शकत नाही, ते पहाणाऱ्या कलावंताच्या तरल प्रतिभेला, जीवनाचं रहस्य शोधणाऱ्या तत्त्वज्ञान्याला नाही तर शतका-शतकांचा आढावा कालातीत तर-तम भावानं घेणाऱ्या इतिहासकाराला.

या सर्वांना कळतं की, पाप आणि पुण्य, नीती आणि अनीती या दोघांचा जन्म जीवनात होतो आणि फार काय त्या दोघांचे पायही एकमेकांच्या पायात अडकलेले असतात. अगदी टोकाची उदाहरणं सोडली तर दोघांमधल्या सीमारेषा पुसट असतात आणि एक संपून दुसऱ्याचा प्रारंभ कधी होतो हे सांगणं फार कठीण जातं.

नैतिकता, पुण्य, औचित्य इत्यादींमधला अंतिम अधिकार असणारा धर्म आज प्रतिष्ठित सोवळ्यात असू दे; परंतु जेव्हा तो जन्माला येतो, तेव्हा तो खरंच ' धारयते इति धर्मः ' असतो. मानववंशीय अनेक हालचालींना, कृत्यांना आपल्या पावित्र्याच्या निकषानं बाद ठरवणारा धर्म अशाच काही घडामोडींमधून पाप-पुण्यातीत अशा जगण्याच्या धडपडीतून निर्माण होत असतो.

अशा सर्व विचक्षण बुद्धिवानांना, कलावंतांना, प्रतिभावंतांना, तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांना शतकानुशतकं खाद्य पुरवत आला आहे महाभारताचा इतिहास किंवा महाभारताची कथा. या कथेचा मध्यवर्ती बिंदू आणि जणू काही सूत्रचालक असा कृष्ण आणि अनंत अज्ञाताचा वेध घेण्यासाठी दर वेळी आव्हान देणारी त्याची व्यक्तिरेखा.

कृष्णाचं आयुष्य आणि त्याचं कार्य चमत्कृतींनी भरलेलं, उत्कंठा वाढवणारं, कृष्णाबद्दल अचंबा वाटायला लावणारं आणि एक सूक्ष्म आदराची भावना मनात निर्माण करणारं. कृष्णाच्या आयुष्यात जेवढं वैविध्य आहे, तेवढं वैविध्य दुसऱ्या कुठल्याही पौराणिक व्यक्तिरेखेच्या आयुष्यात पहायला मिळेल की नाही याची शंकाच आहे. दैवी उदात्तता, देवपण, माणूसपण, धूर्तपण आणि शहाणपण, अन्याय आणि न्याय अशा साऱ्या बेटाबेटांतून वळसे घेत कृष्णाच्या जीवनाचा प्रवाह वाहत रहातो ! आणि त्यातून साकार होतं एक अती गुंतागुंतीचं, व्यामिश्र, तरळ असं व्यक्तिमत्त्व. तेहतीस कोटी देवांना मागे सारून मानवी जीवनात सरळ जागा पटकावणारा कृष्ण, या जीवनाचा ठाव घेतो या गुंतागुंतीनं.

कृष्णाच्या आयुष्यातली एक गोडी म्हणजे कधीही न सुटलेला त्याचा माणूसपणाचा आणि ऐहिक व्यवहाराचा पाया. लहानपणातल्या खोड्या, तरुणपणच्या गोपींबरोबरच्या लीला, व्यवसायानं आलेलं गवळीपण आणि त्याची व्यवस्थित पार पाडलेली कर्तव्यं. राजकारणातले डावपेच आणि दैवी शक्ती म्हणून मान्यता. चमत्काराचा एक सतत ओघ एका बाजूला; पण दुसरीकडे शुद्ध मानवी भावभावना आणि जगण्याची माणसासारखी धडपड.

शास्त्रीय तत्त्वावर कार्य करणारा वसुदेव-पेला पण प्रदर्शनातल्या संगमरवरी कलाकृतीत चित्रित केला आहे. तो कृष्णाबद्दलचा आणि जन्मापासूनच प्रत्ययाला येणाऱ्या त्याच्या दैवी शक्तीबद्दलचा अचंबा. कृष्णाच्या पायाला लागताच ओसरून जाणारं पाणी आणि डोक्यावरच्या कृष्णाच्या पाटीला सावरत आपली वस्त्रं आवरून घेत निघालेला वसुदेव.

आणि मग गोकुळात-खऱ्या कर्मभूमीत आल्यावर चढलेला कृष्णाच्या उलाढालींचा रंग-माखनचोर अशा शीर्षकाची बरीच चित्रं या प्रदर्शनात आहेत. त्यातलं एक आहे १८९५ सालचं. गढवालशैलीत काढलेलं चित्र. या चित्रात कृष्ण आणि त्याचे साथीदार माखनचोरीत गढून गेलेले दिसताहेत. गंमत म्हणजे या साथीदारांमध्ये मानवी मित्रांबरोबर माकडमित्रांचाही समावेश आहे आणि दाराआडून यशोदा आणि अन्य स्त्रिया आश्चर्यानं हे सारं पहात आहेत ! घराच्या तुळयांवर, शिकाळ्यांवर वानरमंडळी झोके घेताहेत, लोण्याची मडकी उपडी झाली आहेत आणि कृष्ण आणि त्याच्या मित्रांच्या चेहऱ्यांवरचे भावही वानरांपेक्षा फारसे वेगळे नाहीत ! त्यांचे चेहरे आणि हात लोण्यानं लडबडून गेले आहेत आणि त्यावरून ओथंबणारा आनंद अगदी स्पष्ट आहे.

## परंपरेच्या पलीकडे

कृष्णाच्या बालपणीचा काल सुखाचा चित्रित करणारी आणखीही बरीच चित्रं आहेत. बुंदेलखंडी शैलीतलं एक उपवनक्रीडा हे असंच उल्लेखनीय आहे. वर्तुळात बसलेले कृष्ण आणि त्याचे मित्र, सोडून ठेवलेल्या

त्यांच्या शिदोऱ्या, झाडांच्या पानांवर चाललेली त्यांची जेवणं. जवळून वाहणारा झरा, त्या झऱ्यात उमललेली कमळं, पोहणारे हंसपक्षी, दाट वनं, काळपट हिरव्या रंगाची झाडं, त्या झाडांवरची वानरं आणि रंगीबेरंगी पक्षी, आपण कधीही न पाहिलेलं कृष्णाचं बालपण किंवा कधीही न पाहिलेली गोकुळातली उपवनं आणि कृष्णाच्या क्रीडा, पण तरीही त्यातली रमणीयता चित्रकाराच्या प्रतिभेनं बरोबर चितारली आहे. ही चित्रं पहाताना अनाकलनीय असा एक स्मरणरमणीयतेचा भाव मनात जागा होतो; पण ज्याचा पूर्वानुभव नाही, त्याचं स्मरण तरी कसलं? की हे आपण अनुभवलेलं किंवा अनुभवण्याची इच्छा असलेलं बालपण या चित्रातून पाहायला मिळतं?

पण अशा क्रीडा करणारा कृष्ण सामान्य मूल नाही, त्याच्या दैवीपणाचा हवाला त्याच्या आयुष्यातही पहायला मिळतोच. कालियामर्दन, कुब्जेचा कायापालट ही दोन चित्रं त्या दृष्टीनं सुरेख वाटतात. साधा चेंडूचा खेळ; पण त्याचा गंभीर झालेला परिणाम; सुरुवातीला नदीच्या तळाशी विश्रांती घेणारा आणि मग उसळून वर आलेला कालिया आणि कृष्णानं केलेलं त्याचं दमन, चकित होऊन हे सारं पहाणारे कृष्णाचे सवंगडी, भयभीत झालेल्या गोपी आणि चेहऱ्यावरचे बालसुलभ, खोडकर भाव जराही ढळू न देता कालियाचं दमन करणारा कृष्ण हे सारे तपशील चित्रकारानं टिपले आहेत आणि कृष्णाबद्दलची जनमानसातली संपूर्ण भावनाच या चित्रांमधून उमटली आहे. कुब्जेचा कायापालट हे १८ व्या शतकातलं जोधपूर शैलीतलं चित्र, त्यामध्ये आतापर्यंत केवळ खोडकरपणात रमणारा कृष्ण इथे प्रथमच मोठा झाल्यासारखा वाटतो. त्यानं सरळ केलेली, अष्टावक्र कुब्जा, आताची सुंदर स्त्री, तिच्या चेहऱ्यावर उमटलेले कृतज्ञतेचे भाव, भोवतालच्या चेहऱ्यांवरचं आश्चर्य हे सारं काही त्या चित्रात आलं आहे.

कृष्ण गोपाळ होता आणि त्यानं ते गोपालन मनापासून केलंही. या गोपालनातले किती तरी प्रसंग जनमानसात ठसले आहेत आणि चित्रकारांच्या कुंचल्यातून उतरले आहेत. राजस्थानी शैलीतलं दावानलभक्षणाचं चित्र, १७४९ सालचं गोवर्धन उचलण्याचं चित्र यामध्ये गाईंच्या हालचालीतला वेग, त्यांचे भयभीत डोळे, टवकारलेले कान हे तपशील उल्लेखनीय आहेत.

गोपी, राधा, रासक्रीडा, प्रेमलीला हा कृष्णाच्या जीवनातला मोठा महत्त्वाचा हिस्सा. कवी आणि चित्रकारांनी त्यामध्ये पुन्हा पुन्हा आपल्या प्रतिभेचे नवेनवे उन्मेष अनुभवलेले आहेत. या प्रदर्शनामध्ये गीतगोविंदातले उतारे आणि त्यासंबंधीची चित्रं असा एक सुंदर संग्रह मांडला गेला आहे. उत्कट, व्याकुळ प्रेम, त्यातले रुसवे–फुगवे, राग–लोभ, मत्सर–विरह हे सारे मानवी गुणविशेष राधा-कृष्ण-प्रेमात दिसतात, तसे अन्यत्र जाणवत नाहीत. तसं तर एकनिष्ठ राम–सीता आणि शंकर-पार्वतीही आपल्या प्रेमाबद्दल प्रसिद्ध आहेत; पण अनेक पातळ्यांवरचं प्रेम जसं राधा–कृष्णसंबंधात आढळतं, तसं वैविध्य फक्त इथेच आहे. कृष्णाला भेटण्यासाठी धावणारी आणि अडखळून पडणारी राधा, १८८० सालचं राजस्थानी शैलीतलं शरद–पौर्णिमेची रासक्रीडा दाखवणारं चित्र. नूरपूर शैलीतलं १८ व्या शतकातलं मानिनी नायिकेचं चित्र, त्यामध्ये राधा कृष्णाकडून पाय चेपून घेते आहे, विरहातली राधा आणि कृष्ण, कृष्ण अन्य गोपींबरोबर प्रेमालाप करतो आहे म्हणून मत्सरानं जळणारी राधा, राधेच्या पायातला काटा काढून शेल्याच्या गोंडयानं तिथली वेदना सुसह्य करणारा कृष्ण अशी राधा-माधव प्रेमाची अनेक रूपं इथे आहेत.

कृष्ण आणि त्याच्या गोपी, त्याचं गोधन कुठे म्हणून भेटत नाहीत? पिचवई (मोठी वॉलहँगिंग्ज) गंजिफा, सरोदसारखी वाद्यं, स्वैपाकाची भांडी, पेटया, ताम्रपात्रं, चमचे आणि पळया, दागिने, दरवाजावरचं नक्षीकाम, युद्धाची हत्यारं आणि प्रदर्शनीय कलावस्तु अशा नित्य व्यवहारातल्या अनेक वस्तूत ठिकठिकाणी कृष्ण भेटतो.

परंपरेनं कृष्णाला देव बनवलं आहे; पण ठोकळेबाज देवपणापलीकडे जाणारं, विचार करायला लावणारं, मनाला हुरहूर लावणारं असं काही तरी कृष्णामध्ये आहे हे निश्चित! जबरदस्त व्यक्तिरेखा असण्याबद्दल आणि त्यातून जीवनाचं दर्शन घडवण्याबद्दल, जीवनाच्या विसंगतीचं, दुःखाचं आणि सुखाचं चित्रण करण्याबद्दल ग्रीक पुराणकथा प्रसिद्ध आहेत; पण महाभारतातला कृष्ण त्यांच्याहूनही अधिक गुंतागुंतीचा, जीवनाच्या मुळाशी भिडणारा असा वाटतो. असा गुंतागुंतीचा कृष्णही सरळ साधा होत भारतीय कलांमध्ये कसा प्रतिबिंबित झाला आहे, त्याचं हे प्रदर्शन आहे.

—ललिता बर्वे


**दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे**
**गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल! दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते, ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बागुलांच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

—ग. रा. जाधव

(केसरी, रविवार, ६–१२–८१)

# आंबेडकर भारत

**लेखक : बाबुराव बागुल**

**राजहंस प्रकाशन, पुणे.** मूल्य : २० रुपये.



## ह्या ना त्या निमित्ताने

# राखी-पोर्णिमा - एक सूचक सण

फिरोज रानडे

'फलाणे साहब, आपको कोई सिस्टर नही है ?'

कचेरीत जाता-जाताच फर्नांडिसच्या त्या प्रश्नाने श्याम चमकला. फर्नांडिसच्या ह्या आगतुक प्रश्नाचे काय कारण असावे बुवा? म्हणून तो इकडे-तिकडे पाहू लागला तर कचेरीतल्या सगळ्या लोकांच्या हाताला रंगीबेरंगी राख्या बांधलेल्या !

त्या बघताच श्यामच्या डोक्यात आवश्यक तो व आवश्यक तेव्हढा प्रकाश पडला. श्यामच्या हाताला राखी नव्हती व त्या ख्रिश्चन सहकाऱ्याच्या प्रश्नामागची ती भावना होती.

'है तो, सिस्टर नही कैसे ? चार सिस्टर्स है !' श्याम थोड्या रागारागानेच म्हणाला.

अर्थात हा राग फक्त फर्नांडिसवर नव्हता तर थोडा स्वतःवर पण होता. त्या दिवशी नारळी पोर्णिमा होती तशीच राखीपौर्णिमा पण होती; पण त्या दिवशी सुट्टी नव्हती त्यामुळे म्हणा किंवा त्या व अशा धार्मिक गोष्टींवर श्यामचा फारसा विश्वास नव्हता म्हणून म्हणा श्याम हे राखी-पौर्णिमेचे प्रकरण संपूर्णपणे विसरून गेला होता.

बहुतेक सगळ्यांच्या हातच्या राख्या पाहून व आपल्या हाताला नाही हे पाहून आपल्याला बहीणच नाही ह्या निर्णयाला हा फर्नांडिस पोहोचला हे पाहून श्यामला राग आला होता.

'फिर वो बंबईमे नही होगी ?' फर्नांडिस परत विचारता झाला. कोणी आपली बहीण असता हाताला राखी बांधणार नाही ह्यावर श्यामचा विश्वास काही केल्या बसेना.

'एक सिस्टर है बंबईमे, यही गिरगावमे है। मैं उनके यहा शामको जानेवाला हूँ। मेरे ब्रदर-इन-लॉ सबेरे जल्दी दफ्तर जाते है। शामको उनके घर जाऊँगा तो उनकीभी मुलाकात हो जायेगी। तब ही राखी बंधवाऊंगा।

ह्या खुलाशाने फर्नांडिसचे समाधान झाले. तो आपल्या कामाला लागला तसा श्यामही आपल्या कामाला लागला.

फर्नांडिसला त्या वेळी जरी श्याम समाधानाकरता म्हणून संध्याकाळी बहिणीकडे जाणार आहे असे म्हणाला होता तरी खरेच तो संध्याकाळी बहिणीकडे गेला.

श्यामची बहीण त्याची वाट पहात होतीच. तिने राखी आणून ठेवली होती. खायला शिरा-पोहे केले होते. ते खाऊन चहा वगैरे पिऊन झाल्यावर तिने श्यामच्या हाताला राखी बांधली. ते सगळे झाल्यावर श्याम घरी निघाला.

बसमधुन येता येता त्याच्या मनात विचार येत होते. नक्की हा सण कधी व केव्हापासून सुरू झाला असेल बरे? हल्लीसुद्धा गुजराथ, महाराष्ट्र, दक्षिण भारतापेक्षा हा सण उत्तर-हिंदुस्थानात, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेशात जास्त मानवला जातो.

मुस्लिम टोळधाडी येऊ लागल्यानंतर आपल्या कुटुंबियांचे संरक्षण करण्याची जबाबदारी पुरुषमंडळींवर पडू लागली. ह्या राखीपौर्णिमेच्या निमित्ताने त्या जबाबदारीची पुरुषवर्गाला जाणीव व आठवण करून दिली जात असावी वगैरे वगैरे विचार होईपर्यंत श्यामचे घर आले.

घरी येताच राधाने त्याच्या उशिरा येण्याबद्दल चौकशी केली. तिचे योग्य ते समाधान करून झाल्यावर श्याम राधाला म्हणाला, 'चल, तूही मला राखी बांध !'

हे ऐकताच श्यामचे डोके तर ठिकाणावर आहे ना? ह्या प्रश्नार्थक मुद्रेने राधा त्याचेकडे पहाती झाली.

कारण राखी ही बहिणीने भावाला, वडिलांना, बाकी नातेवाइकांना एवढेच काय पण अगदी नवऱ्याच्या भावाला पण बांधायची असते वा बांधली तरी चालते; पण कोणत्याही परिस्थितीत बायकोने नवऱ्याला राखी बांधणे निषिद्ध मानले गेले आहे

'काय सांगतो आहे मी? चल मला तू राखी बांध !' श्याम परत हट्टाने म्हणाला.

श्याम उगाच मजेने म्हणत असेल ह्या कल्पनेने राधा खळखळून हसली व म्हणाली, 'ह्याचा काय अर्थ होणार आहे माहीत आहे ना? त्या काका हाथरसीची कविता विसरलात का?'

काका हाथरसी हा उत्तरप्रदेशातला मोठा खंदा विनोदप्रचुर कविता करणारा कवी! कुटुंबनियोजनाकरता त्यांनी अनेक उपायातला एक उपाय म्हणून सगळ्या बायकांनी आपआपल्या नवऱ्यांना राखी बांधावी असे एका कवितेत सूचित केले होते. परिणामी त्यांचे बहीण-भावांचे नाते होईल वगैरे... वगैरे.

राधा खळखळून हसली होती व काका हाथरसीच्या त्या कवितेची श्यामला आठवण करून देती झाली होती. तरी श्याम त्या मनस्थितीत नव्हता.

'काका हाथरसीच्या कवितेचे मला काही सांगू नकोस. त्यांनी मजेनी ती कविता लिहिली असेल. मी मात्र गंभीरपणे म्हणतो आहे की मला राखी बांध म्हणून !'

'अहो, हे काय बोलता आहात वेडयासारखं? आणि वर म्हणताहात की मी गंभीरपणे बोलतो आहे म्हणून! बहिणींनी भावाला वा त्यासम असलेल्या नातेवाइकांना राखी बांधावयाची असते. बहीण-भावाच्या नात्याचा हा सण आहे!'

'मग त्याला भाऊबीज आहे की. मी काही तुला भाऊ-बीजेला ओवाळ म्हणून सांगितले

नाही आहे वा पुढे सांगणारही नाही. माझे म्हणणे एवढेच की, तू मला आज राखी बांध !'

आतापर्यंत राधा उभ्या-उभ्याच बोलत होती. हा विषय इतक्या गंभीरपणाने व असा अटीतटीने चर्चिला जाईल असे तिला प्रथम वाटलेच नव्हते; पण आता श्याम अगदी हट्टाला पेटला आहे व आता ह्यावर शांतपणे बोलल्याशिवाय श्यामचे मन बदलणार नाही हे बघून ती श्यामच्या समोरच्या सोफ्यावर बसली व शांतपणे म्हणाली, 'पण मी तुम्हाला राखी बांधावी असे तुम्ही का म्हणता आहात ते कळू दे तरी !'

'हां, ते सांगतो. हे बघ, ही इतिहास-काळापासून म्हणजे मुसलमान लोक हिंदुस्थानावर स्वारी करायला लागले, युद्धे होऊ लागली, लढाया होऊ लागल्या तेव्हापासून सुरु झाली असावी.

'एकदा येथले राजे हरले की मुसलमानांच्या लूटमारीला, जाळपोळीला, अत्याचाराला अगदी ऊत येत असणार. घरंदारं लुटावयाची, संपत्ती लुटावयाची, वायका-मुलींची अब्रू लुटावयाची हे ते मोठ्या क्रूरतेने करत !'

'त्या वेळी बायका-मुलींचे आपण संरक्षण करू अशी ग्वाही अशी राखी बांधून पुरुषमंडळी स्त्रियांना देत असतील व आज ती प्रथा तशीच चालू आहे.'

'बरोबर आहे तसेच असणार !' राधा शांतपणे पण थोडी आश्चर्याने म्हणाली. श्याम ह्या राखी बांधण्याच्या प्रथेचा इतक्या शांतपणे व बरोबर विचार करू शकतो तर त्याचा आपल्याकडून राखी बांधून घेण्याचा हट्ट का ?

'मग तशी ग्वाही काय फक्त भाऊ, वडील वा फक्त नवरा सोडून बाकी सगळ्या नातेवाइकांनी द्यावयाची ?' श्याम

'तशीच पद्धते असावी.' राधा.

'पण तशीच पद्धत का ?' श्याम चिडून म्हणाला. 'नवरा काय आपल्या बायकोचे रक्षण करायला समर्थ नसतो ? की ती त्याची जबाबदारी नसते ? जर भाऊ बहिणीचे रक्षण करू शकतो व तिचा विश्वास बसावा म्हणून राखी बांधून घेतो तर नवरा पण आपले रक्षण करील ही भावना बायकोच्या मनात नवऱ्याबद्दल का नसावी ?'

आता राधाकडे खरंच उत्तर नव्हते. रक्षाबंधन हे जर फक्त विश्वासाचे, आपले संरक्षण होईल ह्याबद्दलच्या विश्वासाचे प्रतीक असेल तर त्या अर्थी राखी नवऱ्यालाही बांधायला काय हरकत आहे ? हा श्यामचा प्रश्न तिला योग्य वाटला; पण तिला त्याचे योग्य उत्तर गवसेना. ती चूपच राहिली.

'सांग ना, जर भाऊ संरक्षण करू शकतो, बाप करू शकतो तर नवरा करू नाही शकत ?'

'नवराही करू शकेल हो !' राधा जागेवरची उठत म्हणाली, 'पण एखादी गोष्ट करू शकणे व त्याबद्दलचा विश्वास वाटणे ह्यात फार फरक आहे !'

'आपला भाऊ आपले अगदी प्राणपणाने रक्षण करेल असा बायकांना मनोमनी विश्वास असतो तसा विश्वास त्यांना आपल्या नवऱ्याबद्दल वाटत नसावा आणि म्हणूनच ही राखी फक्त भावाने....'

राधा शांतपणे निघून गेली व तेव्हढ्याच शांतपणे श्याम तिच्याकडे पहात राहिला. □


कलेकलेनें चंद्र वाढतो...




मिंटीच्या निरनिराळ्या बचत योजनात
सहभाग घेऊन आपल्या समृध्दीचा
चंद्र असाच वृध्दिंगत करा.
म्हणजेच सुखाच्या चांदण्याची
बरसात होईल.
बचतीने समृध्दी
बचतीसाठी महाबँक!

बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)
मुख्य कचेरी : "लोकमंगल" शिवाजीनगर पुणे – ४११ ००५



# छकुलं

**काय हवं ते म्हण. तुझी मनःस्थिती मी जाणतो. बाळाला दूर करताना तुझ्या मनाला क्लेश होताहेत—खरं आहे—पण आपल्या घरी तरी त्याला काय मोठं सुख लागणार आहे ? आपलं अठरा विश्वे दारिद्र्य ! आपल्याकडे खितपत पडण्यापेक्षा तो दूसरीकडे गेलेला बरा—नाही का ?**

● सुधा नरवणे ●

कुटुंब कल्याण केंद्रातली ती प्रचारिका आमच्या घरी आली आणि आम्हाला इतरांप्रमाणेच विचारायला लागली की, 'कशाला तुम्ही एवढी मुलं जन्माला घालता?'

माझ्या बायकोनं तिला फटकन् उत्तर दिलं—' रात्री दुसरं काही करण्यासारखं नसतं म्हणून ! आम्हाला सिनेमाला जाणं परवडत नाही. दुसरे गाण्याबजावण्याचे कार्यक्रम परवडत नाहीत. मग आम्ही करावं तरी काय आणखी ?'

हे उत्तर ऐकल्यावर ती प्रचारिका स्वतःच लाजली. इकडे तिकडे बघायला लागली आणि काहीच बोलायला न सुचल्यानं चकार शब्द न बोलता निघून गेली !

ती पुरती निघून गेल्यावर मी माझ्या बायकोला चांगलंच फैलावर घेतलं. म्हटलं, ' अग, काही जिभेला हाड आहे का नाही तुझ्या ?'

' का ? काय चुकलं माझं ? खोटं आहे का ते ?'

' प्रत्येक वेळी खरं सांगितलंच पाहिजे असं नाही. जरा तारतम्य बाळगावं— आपण कुणाशी बोलतोय— काय बोलतोय— काही पोच असावा माणसाजवळ—'

—मी लहान होतो तेव्हा पुष्कळदा पाहिलं होतं की, जास्त मुलं असलेल्या कुटुंबाची लोक कीव करतात. त्या पुरुषाला ' बिचारा ' म्हणतात. ' कठीण आहे हो त्यांचं—' असं म्हणत. तेव्हा मला कळायचं नाही की यात कीव करण्यासारखं काय आहे ? कठीण काय आहे आणि तो माणूस 'बिचारा' कसा काय ?

आता कळतं— सगळ्या शब्दांचे अर्थ पुरेपूर कळतात. सात–आठ तोंडांना खायला घालणं म्हणजे केवढं कठीण काम आहे हे आता रोज एकदा समजतं—

मी लहानपणी पुस्तकात वाचायचो— अगदी दशा-दशा झाली होती त्या कुटुंबाची— घर कसलं चंद्रमौळी खोपटच—

तेव्हा या शब्दांचे अर्थ मुळीच कळत नव्हते. आता अर्थज्ञानच काय पण ते शब्द प्रत्यक्ष जगत होतो मी ।

आमचं घर म्हणजे एक खोली आहे. सहा मुलं आणि आम्ही दोघं. खोलीभर सामान— चिरगुटं, पांघरुणं, खेळणी, भांडी, पुस्तकं, कपबशा सगळ्या वस्तू एकमेकांपाशी दाटीवाटीनं बसून आहेत. पाऊस आला की, अंथरुणं इकडून तिकडे हलवायची— कोरडा कोपरा शोधत त्या खोलीभर फिरत राहायचं—

कधीकधी एखाद्या जुन्या गोष्टीतला मजकूर आठवतो— ' त्या बिचारीला पुन्हा दिवस गेले— आणखी एका चिमण्या जिवाला जन्माला घालून त्याचे उपासमारीनं हाल करण्यापेक्षा त्याला जन्माला येऊच द्यायचं नाही असा निर्णय तिनं घेतला—' किंवा असा मजकूर आठवे— ' आपल्या क्षणिक वासनेचं फळ आपल्या हातानंच तोडायचं तिनं ठरवलं—'

तेव्हा अंगावर शहारे येत.

—आज तो तसला निर्णय मी आणि बायकोनं घेतला. तिला सातव्यांदा दिवस गेलेले आमच्या लक्षात आलं आणि आम्ही हबकून गेलो. हा निर्णय अंमलात आणेआणेतो तिला नववा महिना लागला ! आता गर्भपात अशक्यच. मग आम्ही ठरवलं की, मूल जन्माला आलं की, लागलीच त्याला चर्चमध्ये सोडायचं— तिथं इतके कनवाळू लोक येत-जात असतात की, कुणीही त्याला उचलून घेईल. ऊब-निवारा देईल. मोठं करील—

कुटुंब-कल्याण-केन्द्रानं चालवलेल्या मोफत हॉस्पिटलमध्येच माझी बायको बाळंत झाली. तिथं चार-पाच दिवसांपेक्षा जास्त ठेवत नाहीत बाळंतिणीला. ती बाळासह घरी आली. घरातला गोंधळ, पसारा आणि मुलांचा आरडाओरडा ऐकून तिनं कपाळावर हात मारून घेतला. म्हणाली, ' उगीच आले घरी— पोटात दुखण्याचा बहाणा करून आणखी रहायला हवं होतं हॉस्पिटलमध्ये—

तिच्यापुढे कामाचे डोंगर उभे होते. ती कंबर कसून कामाला लागली. अधूनमधून ते नवजात अर्भक टाहो फोडी. लगेच ती हातातलं काम टाकून त्याच्या गरजा पुरवी. घरातलं सर्व काही स्थिरस्थावर व्हायला एक महिना लागला. आम्ही ठरल्याप्रमाणे बाळाला सोडायला चर्चमध्ये जाण्यासाठी निघालो. आमचं गाव एवढंसं. एकच चर्च तिथं बाळाला सोडलं तर लोकांना केव्हाच कळून चुकेल की, कुणाचं बाळ आहे ते. चांगलीच छी: थू होईल आमची अन् बाळ पुन्हा परत आमच्याकडे येईल ते वेगळंच—

तेव्हा आम्ही ठरवलं की जरा दूरवरच्या गावात...रोमला जावं...चर्च शोधावं अन् बाळाचं गाठोडं अलगद प्रभू येशूच्या स्वाधीन करावं...

प्रवासात आणि नंतर रोमला पोचल्यावर माझी बायको अखंड बडबड करत होती. मला ते ऐकवेना. आपल्या मनातला असह्य कल्लोळ लपवण्याचा ती हा असा प्रयत्न करीत होती. मला म्हणाली, ' आपण श्रीमंत लोकांच्या वस्तीतल्या चर्चमध्ये बाळाला सोडू ...म्हणजे कुणी श्रीमंत माणूस त्याला उचलील...बाळाच्या आयुष्याचं सोनं होईल... हो. उगीच पुन: गरिबाचं घर नको...पुन: तेच हाल, तेच दारिद्र्य— असलं नको— मग त्यापेक्षा आपलं घर काय वाईट आहे ? ...

...पण नको...श्रीमंत माणसं स्वार्थी न् अप्पलपोटी असतात. आत्मसंतुष्ट असतात... गाठोडं बघतील पण उचलायची नाहीत. माझं छकुलं चाराठ दिवस तसंच भुकेपोटी तडफडत राहील...प्राण जाईल त्याचा... त्यापेक्षा असं करू आपण की मध्यमवर्गाच्या वस्तीत जाऊ. तिथल्या चर्चमध्ये सोडू बाळाला—'

मला तिची बडबड सोसवेना. आपण जन्माला घातलेल्या निष्पाप जिवाचा अशा

तऱ्हेनं त्याग करताना माझ्या मनालाही अगणित इंगळ्या डसत होत्या. मी स्वतःची निर्भर्त्सना करीत होतो आणि तरीही स्वतःला बजावीत होतो की, आता आणखी एका मुलाचं पालनपोषण आपल्याला जमणार नाही. हे जे आपण करीत आहो ते योग्यच आहे. आता मागं पाऊल घेता कामा नये ...हाती घेतलेलं काम तडीस नेलंच पाहिजे !

बायको बोलतच होती. मी अधूनमधून तिच्या मुद्द्यांना हरकत घेत होतो. तिच्या वटवटीला खोळ घालणं हा एकच उद्देश. मी म्हटलं, 'मला एक कल्पना सुचतीय...सेंट पीटर चर्चमध्ये सोडायचे का त्याला...?'

'नको नको– केवढं प्रचंड चर्च आहे ते– केवढी वर्दळ अन् केवढी गर्दी असते. कुणीसुद्धा ढुंकून बघणार नाही बाळाकडं– त्यापेक्षा कांदोली रस्त्यावरचं ते चर्च आहे ना... तिकडं जाऊ या...त्या रस्त्यावर खूप मोठी-मोठी दुकानं आहेत. श्रीमंत गिऱ्हाइकांचाच राबता असतो तिथं...ती माणसं चर्चमध्ये येतील– लहान आहे ते चर्च...मी पाहिलंय् ना मागं एकदा...चटकन् कुणी सधन माणसाचं लक्ष जाईल आपल्या बाळाकडं...चला तिकडंच जाऊ...'

तिच्या बोलण्याला मान तुकवण्यावाचून मला गत्यंतर नव्हतं.

बसनं आम्ही तिकडे जायला निघालो. बसमध्ये आणखी उतारू होते म्हणून आपोआपच माझ्या बायकोच्या तोंडाला कुलूप बसलं. बाळाच्या अंगाभोवतीचं ब्लॅंकेट ती सारखी घट्ट घट्ट लपेटून घेत होती. मधूनच त्याचं टोपडं बाजूला करून त्याच्या मुखाकडे टक लावून बघत होती. मधूनच त्याला छातीशी धरून आपले ओठ हळूच त्याच्या गालावर टेकवी. बाळ आपलं गाढ झोपलं होतं...

...आमचा स्टॉप आल्यावर आम्ही उतरलो आणि ती पुन: बडबडायला लागली. या रस्त्यावर खरोखरीच उंची उंची मालाची दुकानं होती.

'पहा पहा ती माळ–किती टपोरे मोती आहेत...अरे ती सुंदर बाबागाडी पहा ना... ते बघितलंस का?...ते रे– ते कपड्याचं दुकान– किती सुंदर कपडे आहेत...इथं नक्कीच पैसेवाले लोक येत असतील...असंच कुणी तरी इथल्या चर्चमध्ये येईल...आपल्या बाळाला उचलील आणि थेट या तयार कपड्यांच्या दुकानात आणील– बाबासूट, स्वेटर, मोजे सगळे लोकरीचे कपडे .. कित्ती कित्ती सुंदर दिसेल आपलं बाळ...

...त्या जवाहिऱ्याच्या दुकानातील ती सोन्याची साखळी पाहिलीस का...आपल्या बाळाच्या पहिल्या वाढदिवसाला त्याच्या गळ्यात ती साखळी असेल ना ?...

...ती अर्धवट माझ्याशी अन् अर्धवट स्वतःशी बोलत होती. मी तिला काही विरोध केला नाही. तिचं स्वगत, तिची दिवास्वप्नं तिची तिलाच लखलाभ असोत !

अखेर एकदाचे आम्ही त्या चर्चमध्ये पोचलो. लहानसं होतं ते. पिवळा फिकट रंग, जीझसच्या मूर्तीचा कोनाडा वर कोपऱ्यात कुठं तरी होता आणि पाद्रीमहाशयांच्या प्रवचनाचं व्यासपीठही बाजवीपेक्षा उंचच वाटलं. माझ्या बायकोला एकंदरीत ते चर्च काही आवडलं नाही. मला म्हणाली, 'मागं मी एकदा इथं आले होते ना तेव्हा वेगळाच दिसायचा हा हॉल. आज काही वेगळाच दिसतोय्...'

तिनं तिथल्या पवित्र जलात आपली दोन बोटं बुचकळली आणि छातीजवळ नेऊन क्रॉसची खूण केली. आपल्या उराजवळचं ते बोचकं आणखी घट्ट धरून तिनं चर्चची पाहणी आरंभली. चारी कोपऱ्यांत जाऊन पाहिलं. भिंतीवरची चित्रं पाहिली. वरचं छत मान मोडेपर्यंत पाहिलं. लोकांना बसण्यासाठी खुर्च्या होत्या त्या पाहिल्या. वरच्या घुमटाखाली लटकवलेला दिवाही न्याहाळून पाहिला. हे सारं पाहताना तिच्या मुद्रेवर कमालीचा अविश्वास दिसत होता. मी दारात उभं राहून कुणी येतंय का अशी पाळत ठेवत होतो. एक डोळा तिच्याकडे तर दुसरा डोळा प्रवेशद्वाराकडे होता...

तेवढ्यात एक उंचशी बाई आली, लाल पोषाख, सोनेरी केस, मुद्रा विचारमग्न. येताक्षणी तिनं प्रभूच्या चरणी माथा टेकवला. मिनिट-दोन मिनिट प्रार्थना केली आणि आल्या पावली ती निघून गेली. आमच्याकडे तिचं लक्षही गेलं नाही. ते पाहून माझी बायको म्हणाली...'नको–इथं नको... इथं येणारी सर्व माणसं ह्या बाईसारखी स्वतःत दंग असणारी असतील. दुसरी माणसं खिजगणतीत नाहीत...केव्हा एकदा प्रार्थना संपतेय अन् केव्हा एकदा त्या अलीशान दुकानात जाऊन आपण खरेदी करतोय् असं वाटत असणार.सदा घाईतअसणारी माणसं इथली!




ती घाईघाईनं बाहेर पडली. तिच्यामागून जाण्याखेरीज मला गत्यंतरच नव्हतं.

खूप चालल्यावर आम्ही दुसऱ्या एका चर्चपाशी आलो. हे चर्च मघांच्या चर्चपेक्षा मोठं होतं. आत अंधार होता. पुष्कळ लोक तिथं प्रवचन ऐकत होते. पोषाखावरून हा समुदाय सुखवस्तू वाटला. पाद्रीबुवांचं प्रवचन ऐनभरात आलं होतं. सगळे लोक मंत्रमुग्ध होऊन त्यांचे शब्द ऐकत होते. आमच्याकडे कुणाचं लक्ष गेलं नाही. मी तिला म्हटलं, 'इथं ठेवायचं का बाळाला?' तिनं होकारार्थी मान हलवली. आम्ही त्या दालनाच्या एका कडेला गेलो. तिथल्या एका खुर्चीवर हळूच बाळाला ठेवलं. ब्लँकेटनं त्याचं तोंड अर्धवट झाकलं गेलं होतं ते तसंच राहू दिलं. तिने गुडघे टेकून प्रार्थना म्हटली. मग मान वर उचलून भिंतीवरची संतमहंतांची चित्रं पाहिली. प्रत्येकाच्या चेहऱ्यावरचा दयाळू भाव पाहून तिला कसलं तरी आश्वासन मिळाल्यासारखं दिसलं. ती उठण्याच्या तयारीत दिसली म्हणून मी वळून जायला लागलो. तेवढ्यात पाद्रीबुवांच्या तोंडचे शब्द कानावर आले... 'आणि प्रभूनं पीटरला विचारलं, 'कुठं चाललास तू?'

मी दचकलो. मला वाटलं, मलाच कुणीतरी हा प्रश्न विचारतंय. मी क्षणभर खिळल्यासारखा उभा राहिलो. माझी बायको माझ्याजवळ आली आणि जवळजवळ ढकलतच मला बाहेर काढायला लागली,

तितक्यात कुणी तरी तिला उद्देशून म्हटलं 'अहो बाई, तुमचं हे गाठोडं राहिलंच की इथं—विसरलात वाटतं...?'

त्या बाईच्या चेहऱ्यावरून ती एक परोपकारी स्त्री असावी असं वाटलं. बहुधा रोज चर्चमध्ये येत असावी. रोज एखादं सत्कृत्य करीत असावी. सौजन्यानं ओतप्रोत भरलेला तिचा चेहरा...

वा! फारच उपकार केले तिनं आमच्यावर! माझी बायको गडबडीनं म्हणाली, 'हो की! विसरतच होते मी—बरी तुम्ही आठवण केलीत—थँक्स—आभारी आहे मी—'

पुन्हा ते गाठोडं तिच्या हृदयाजवळ विराजमान झालं. निराशेनं थबथबलेल्या स्वरात ती म्हणाली, 'बघ, कुणालाच नकोय आपलं बाळ—'

मघापेक्षा जलद गतीनं आम्ही आणखी एका चर्चमध्ये येऊन पोचलो. ते एक खूप मोठं चर्च होतं. आता तिनं घाईघाईनं आपल्याजवळचं गाठोडं कोपऱ्यातल्या एका बाकड्यावर ठेवलं... आता तिनं गुडघे टेकून प्रार्थना म्हटली नाही की बाळाचा शेवटचा पापाही घेतला नाही. पायाखालची जमीन जणू चटके देत आहे इतक्या चपळाईनं ती बाहेर पडली... सुटकेचा श्वास पुरता सोडला नाही तोच बाळाच्या रडण्याचा आवाज तिच्या कानी आला. इतका वेळ बाळ शांत होतं; पण आता त्याच्या भुकेची वेळ झाली होती. उरावला पान्हा माझ्या बायकोला थोपवता येईना. ब्लाऊझ ओलाचिंब झाला. विजेच्या वेगानं ती पुन: आत गेली... त्याला मांडीवर घेतलं. ब्लाऊझची बटणं उघडून त्याला पाजायला लागली. 'अहो बाई, हे काय चालवलंय् इथं. बाहेर जा बघू...' चर्चचा एक सेवक तिच्या अंगावर खेकसला. त्याच्यावर मुळीसुद्धा न रागवता ती बाळाला उराशी धरून पाजत–पाजतच बाहेर आली. तिची मुद्रा समाधानी दिसत होती. आम्ही चर्चच्या आवाराच्या बाहेर पडलो. पलीकडेच एक बाग होती. बागेतल्या एका बाकावर बसून तिनं बाळाला पोटभर पाजलं. आलटून–पालटून दोन्ही बाजूंना बाळाला घेतलं. तिचं ऊर रिकामं झालं आणि बाळाचं पोटही तुडुंब भरलं. ते पुन: शांत झोपी गेलं—

आता संध्याकाळ झाली. चर्चची दारं बंद व्हायची वेळ झाली. आता काय करायचं? मी दिङ्मूढ झालो. जे कर्म करायला आम्ही बाहेर पडलो होतो त्यातली निष्ठुरता अधिकच जाणवायला लागली. अपराधीपणाची जाणीव मनाला कुरतडायला लागली अगदी हतबुद्ध होऊन मी तिला म्हटलं, "अग, चटकन् काय ते ठरव ना— किती वेळ असं गिरीगिरी फिरत राह्यचं...?"

"वा रे वा! चटकन ठरव म्हणजे काय? स्वत:च्या रक्तामांसाचा गोळा असा चटकिनी हातावेगळा करता येतो का? त्याला वाटेल तिथं ठेवून कसं चालेल? कुत्र्यामांजराच्या तोंडी द्यायचंय् का त्याला?"

"तसं नाही ग... पण जे करायचं ते लौकर करू— जितका जास्त विचार करू तितकं ते कठीण होईल—"

"खरं म्हणजे तुला अशी भीती वाटतेय की मी माझा विचार बदलेन— होय ना? तुला भीती वाटतेय् मी त्याला पुन: घरी नेईन... होय ना? तुम्ही पुरुष म्हणजे स्वार्थी— भेकड..."

"काय हवं ते म्हण. तुझी मन:स्थिती मी जाणतो. बाळाला दूर करताना तुझ्या मनाला क्लेश होताहेत— खरं आहे— पण आपल्या घरी तरी त्याला काय मोठं सुख लागणार आहे? आपलं अठरा विश्वे दारिद्र्य! आपल्याकडे खितपत पडण्यापेक्षा तो दुसरीकडे गेलेला बरा— नाही का? काय आपलं घर! काही कळा उरलीय् का आपल्या घराला? पाऊस आला की गळतंय्— डास, ढेकूण, पिसवा कायमच्या वस्तीला आल्यात. धड बाथरूम नाही— संडास नाही. भरपूर पाणी नाही. उकिरडा आहे नुसता! —"

यावर ती काही बोलली नाही. खिन्न मुद्रेनं बाळाला छातीशी धरून ती दिसेल त्या रस्त्याला चालायला लागली. तिच्यामागोमाग मी— तितकाच उदास— खिन्न. अमुक एका दिशेनं जायचं असं काहीच आमच्या मनात नव्हतं. 'व्हाया नॅशनल' रस्त्याच्या टोकाला टेकडीकडं जाताना तो चौक आहे


**ज्यांना पहिली अपत्ये मुलीच आहेत आणि पुत्र व्हावा अशी इच्छा आहे त्यांनी संपर्क साधावा.**

**वैद्य एम्. वाय्. परांजपे**
संजीवन चिकित्सक
सदाशिव पेठ, नृसिंहसदन
जनता बँकेसमोर
बाजीराव रोड
पुणे ४११ ०३०

**संजीवन औषधालय**
वैद्य एम्. वाय्. परांजपे
लोटलीकर बिल्डिंग
१ ला मजला, १६, एल्. जे. रोड
सिटी लाइट सिनेमाजवळ
माटुंगा (प. रे.) मुंबई ४०० ०१६

ना– तिथं आम्ही पोचलो. त्या भागात अगदीच तुरळक गर्दी होती. वाहतूकही बेताची. वर्दळ कशी ती नव्हतीच. रस्त्याच्या उतारावर राखी रंगाची एक मोटर उभी होती. मोटारीत कुणी नव्हतं. भाजूबाजूलाही कुणी नव्हतं. मी मोटारीच्या दाराच्या हँडलला हात घालून ते उघडायचा प्रयत्न केला. आमच्या सुदैवानं दाराला कुलूप नव्हतं. दार चटकन उघडलं गेलं. मी बायकोला म्हटलं, "चल. चल पटकन्– मागच्या सीटवर ठेव त्याला. जलदी कर! –"

तिनं माझं ऐकलं. त्याला तिनं सीटवर ठेवताक्षणी मी दार चटकन् बंद केलं. एक हात तिच्या खांद्यावर ठेवून तिला जवळ घेतलं आणि जवळजवळ ओढतच तिथून दूर नेलं.

तो चौक सोडून आणखी एक रस्ता पार करून आम्ही दुसऱ्या चौकात आलो. हा चौकही निर्मनुष्य होता आणि इथं आणखीनच अंधार होता. रस्त्यावर मोजकेच दिवे जळत होते. शहरातला हा भाग थोडा उंचावर एका टेकडीवर होता. इथून आम्हाला रोम शहरातले दिवे लखलखताना दिसत होते. चौकातल्या कारंजापाशी जाऊन ती एका खांबाला टेकून बसली– माझ्याकडे पाठ करून! आणि एकदम हमसून हुमसून रडायला लागली 'काय ग? आता काय झालं?'

"त्याच्यावाचून मी कशी राहू ?– आता एवढ्यात मी त्याला सोडलं; पण मला त्याची फार फार आठवण येतेय... माझ्या छातीत दाटून येतंय्– हे बघ– इथं दुखतंय् रे..."

मराठीतील एक सच्चे
आत्मचरित्र
हंसा वाडकर
सांगत्ये ऐका
चौथी आवृत्ती प्रसिद्ध झाली.
मूल्य : १४ रुपये
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

"खरं आहे... पण आता हळूहळू तुला सवय होईल... उद्यापासून तू त्या दूध आटण्याच्या गोळ्या घे म्हणजे ठीक होईल सगळं–"

माझ्या या बोलण्यावर तिनं नुसतेच खांदे उडवले आणि पुन: दुप्पट जोरानं हुंदके देऊन ती रडायला लागली. मग पाहता पाहता तिनं आपलं रडं आवरलं. डोळे कोरडे केले. तिची चर्या क्रुद्ध झाल्यासारखी दिसली.

'–इथून जवळच रोमच्या राजाचा राजवाडा आहे ना रे? चल आता तिथं जाऊ. मी राजाला जाब विचारणार आहे.'

'कसला जाब? कुणाला? काय वेडीबिडी आहेस का?'

'मी नाही. तो राजा. ते सरकार वेडं आहे. का म्हणून आपण गरीब राहिलो आहोत? आपण दोघं इतके काबाडकष्ट करतो तरी मुलांचं नीट पालनपोषण करता येत नाही आपल्याला!' कसल्या तरी निर्धारानं झपाटल्यासारखी ती राजवाड्याच्या दिशेनं धावत सुटली. मला तिला आवरता येईना.

राजवाड्यात आता कोण राहतं कुणास ठाऊक? तिथं अवेळी जाऊन ती कसला तमाशा करेल देवाला माहिती. तिला आवरलंच पाहिजे. काय वाटेल ते करून सरकारशी भांडण्याची तिची ऊर्मी दाबून टाकली पाहिजे. मी तिला चुचकारत म्हटलं, 'हे बघ. ऐक जरा माझं. मीही मघापासून विचार करतोय. चल आपण परत जाऊ. बाळाला परत आणू त्या मोटारीतून. मलाही त्याची आठवण बेचैन करतेय. सहा मुलात आणखी तो सातवा. काय फरक पडणार आहे? भरल्या गाडीला सुपाचं ओझं ते काय?'

ही कल्पना तिला तत्काळ पटली. राजवाड्यात जाऊन रोमच्या राजाशी भांडण्याऐवजी मोटारीपाशी जाऊन बाळाला परत आणण्याची कल्पना तिला फारच आवडली. आनंदानं तिचे डोळे चकाकायला लागले.

'पण...पण...अजून ती मोटार तिथं असेल का?'

मलाही तीच शंका होती; पण ती महत्त्वाची नव्हती. 'नक्कीच! आता तर पाच मिनिटांपूर्वी आपण त्याला तिथं सोडून आलो ना? एवढ्यात कुठं जाईल ती मोटार?'

–कसंही करून राजवाड्यात जाण्यापासून तिला परावृत्त करायचं एवढा एकच विचार माझ्या मनात होता.

आम्ही त्या उताराच्या रस्त्याला पोचलो तर खरंच ती मोटार होती तशीच होती. माझ्या बायकोनं पटकन मोटारीचं दार उघडलं आणि ती बाळाला उचलायला लागली. तेवढ्यात एक मध्यमवयीन गृहस्थ तिथं अवतीर्ण झाला अन् ओरडायला लागला,

'ए बाई. ए बाई. काय करते आहेस? काय उचलते आहेस माझ्या मोटारीतून?' तिनं त्याच्याकडं ढुंकून पाहिलं नाही की, त्याला प्रत्युत्तर दिलं नाही. मुकाट्यानं ते गाठोडं उचललं आणि प्रेमभरानं उराशी धरलं. तो मनुष्य ओरडतच होता, 'ए बाई. माझी मोटार आहे ही. ते बंडल कुणाचं आहे ते? काय आहे त्यात?'

मी घाबरून कोपऱ्यावर जाऊन उभा राहिलो. माझ्या बायकोनं एकदम भांडणाचाच पवित्रा घेतला. ती त्याच्या पुढ्यात गेली नि म्हणाली, 'कुणाला हवीय तुमची मोटार? थुंकते मी तुमच्या मोटारीवर आणि गाठोडं–बंडल असं काय म्हणता? माझं छकुलं आहे हे. बघायचंय. पाह्यचाय त्याचा चेहरा?'

तिनं बाळाच्या तोंडावरचं ब्लँकेट बाजूला केलं, 'पहा. पहा, कसा गोड छकुला आहे हा. तुम्हाला असं गोजिरवाणं मूल सात जन्मात मिळणार नाही! काय म्हणालात? पोलिसात नेईन? तुम्ही जर मला पोलिसात नेलंत तर मी त्यांना सांगीन की, तुम्हीच माझं बाळ चोरायचा घाट घातला होता. बरेच आहात की! आम्ही गरीब असलो म्हणून काय झालं? आम्हाला आमची मुलं काही जड नाहीत!'

तिनं त्याच्यावर इतकं तोंडसुख घेतलं, त्याला ती इतकी अद्वातद्वा बोलली की, तो मनुष्य घाबरलाच. त्याला काही सुचेना. तिचं वाक्ताडन ऐकून तो शरमिंधा झाला.

त्याच्याकडे पाठ फिरवून, माझी बायको बाळाला छातीशी धरून, एखाद्या सम्राज्ञीसारखी गर्वानं पावलं टाकीत मी उभा होतो तिथं आली. म्हणाली,

'चल, घरी जाऊ. मुलं वाट पाहत असतील!' ☐

(सुप्रसिद्ध इटालियन लेखक अल्बेर्टो मोराव्हिया याच्या The Baby या कथेचे स्वैर रूपांतर)



# भारतीय सांस्कृतिक दृष्टिकोनातून वार्धक्यविचार

श्रीनिवास टिळक, मॉंट्रिअल, कॅनडा



सुधारित वैद्यकीय मदत व औषधोपचार, देवी, पटकी, हिवताप इत्यादी साथींचे जवळजवळ समूळ उच्चाटन वगैरे कारणांमुळे आज स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या चौथ्या दशकात संख्येने अधिक भारतीय अधिक जास्त वर्षे जगत आहेत. ब्रिटिश अमदानीत मृत्युसमयी भारतीयांचे सरासरी वयोमान २६ होते, ते आता वाढत जाऊन दुप्पट म्हणजे ५२ झाले आहे; पण वाढत्या वयाच्या लोकसंख्येबरोबरच भारतातील एकंदर वृद्धांची संख्याही वाढत आहे १९८१ च्या जनगणतीनुसार भारतात सुमारे साडेसहा कोटी वृद्ध स्त्री-पुरुष असावेत. ( ६० वर्षे वयावरील सर्व व्यक्तींना भारतशासन वृद्ध लेखते. ) इतर विकसनशील देशांप्रमाणेच आज भारतात औद्योगीकरण, आधुनिकीकरण व शहरीकरण या प्रक्रिया जोर धरीत असल्याने त्याचे भारतीय आबालवृद्ध स्त्रीपुरुषांवर इष्टानिष्ट परिणाम होऊ लागले आहेत. केवळ वृद्धांबाबत बोलायचे म्हटले तर वरील प्रक्रियांमुळे त्यांचा एकंदर सामाजिक व कौटुंबिक दर्जा, राहणीमान, वैचारिक स्वातंत्र्य व भावनिक स्वास्थ्य आज धोक्यात येत आहे. परंपरेने आपल्या संस्कृतीत वृद्धांना मानाचे व आदराचे स्थान देण्यात आले आहे. त्यांचा दर्जा व अधिकार उच्च आहेत. कुटुंबाच्या भवितव्याच्या संदर्भात सर्व महत्त्वाच्या निर्णयांवर त्यांचे शिक्कामोर्तब असावे अशी आपल्या परंपरेची शिकवणूक आहे; परंतु आजकालच्या वृद्धांचे शारीरिक स्वास्थ्य सुधारले असले तरी नवीन आचारविचार-कर्त्यासवर्त्या पुरुषांचे खेड्यातून शहराकडे होत असलेले स्थित्यंतर, अदृश्य होत चाललेली संयुक्त कुटुंबपद्धती इत्यादी कारणांमुळे एकाकी जीवन कंठण्याची वेळ बऱ्याच वृद्ध स्त्री-पुरुषांवर आताच आलेली आहे. सरकारी नियमांमुळे पुष्कळ निकोप वृद्धांना खाजगी वा सरकारी नोकरीवरून निवृत्त करण्यात येत आहे. शेतजमीनविषयक नवीन कायद्यांमुळे परंपरेने वृद्धांच्या हातात असलेला जमिनीवरचा ताबा त्यांच्याकडून काढून घेण्यात आला आहे. त्यामुळे वृद्धापकाळीही आपली मुलेबाळे/नातेवाईक यांच्याकडून चांगली वागणूक मिळवून घेण्याचा एक हुकमी मार्ग खेड्यापाड्यांतील वृद्धांच्या ताब्यातून निघून गेला आहे. तेव्हा वृद्ध, त्यांचे जीवन, त्यांच्यापुढे असलेल्या विशिष्ट समस्या, त्या कशा सोडवाव्या इत्यादि प्रश्नांचा सर्वांगीण विचार करणाऱ्या Gerontology (वार्धक्यशास्त्र) या पाश्चात्य राष्ट्रांत विशेष प्रगत पावलेल्या ( वास्तविकदृष्ट्या तेथेही हे शास्त्र गेल्या २५ वर्षांतच अधिक प्रगत झाले आहे,) शास्त्राबद्दल भारतात सध्या विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे.

## वार्धक्यशास्त्र : स्वरूप व सिद्धांत

वाढत्या वयाच्या त्या व्यक्तीच्या शरीरावर, मनावर, कुटुंबावर व समाजावर पडणारा ताण व प्रभाव आणि त्यातून उद्भवणाऱ्या समस्यांना तोंड देता यावे म्हणून प्रत्येक संस्कृती व परंपरा वार्धक्याला प्रतिक्रियात्मक व प्रतिसादात्मक अशी काही विशिष्ट मूलभूत तत्त्वे, जीवनमूल्ये व तदनुषंगिक आचारविचार आणि आदर्श निर्माण करीत असते. वार्धक्य व वृद्धांच्या जीवनाशी निगडित अशा कल्पनासमूहालाच वार्धक्यशास्त्र अशी पारिभाषिक संज्ञा आहे. वाढते वय (aging) ही एक मूलतः जीवशास्त्रात (biology) अंतर्भूत होणारी प्रक्रिया असली तरी वार्धक्य (oldage) हे मानवाच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे एक महत्त्वपूर्ण अंग आहे. थोड्या वेगळ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे वाढते वय ही जरी शरीराची स्वाभाविक व नैसर्गिक प्रक्रिया असली तरी वार्धक्य ही एक सामाजिक व सांस्कृतिक घटना व दृश्य आहे. म्हणून वार्धक्याचा अभ्यास जीवशास्त्रीय, सामाजिक व सांस्कृतिक अशा तिन्ही दृष्टिकोनांतून करण्यास सुरुवात झाली आहे. जीवशास्त्रीयदृष्ट्या वार्धक्याची प्रक्रिया (aging process) वृद्ध व त्यांचे विशिष्ट आजार, त्या संदर्भात करण्यात येणारे औषधोपचार, वृद्धावस्थेत आरोग्य टिकवून धरण्यासाठी वृद्धांनी करावयाचे व्यायाम व पाळावयाची पथ्ये इत्यादी गोष्टींचा विचार होतो. सामाजिकदृष्ट्या वाढत्या वयाबरोबर स्त्री-पुरुषांचा सामाजिक दर्जा (Status) त्यांची कर्तव्ये व भूमिका (social roles) इत्यादी कशा बदलत जातात यांचा अभ्यास होतो. सांस्कृतिकदृष्ट्या प्रत्येक संस्कृती काही विशिष्ट बोधचिन्हे (symbols) कहाण्या व बोधकथा, तात्त्विक व आध्यात्मिक विचारसंरचना

( thought patterns ) यांच्या आधारे वार्धक्याच्या अनिवार्य प्रक्रियेला मर्यादित अशा मानवी जीवनात अर्थ लावून जीवन कसे सुसह्य करते याचे विवेचन होते. वार्धक्याची जाणीव व आकलन, ते कसे जगावे वगैरे गोष्टींबद्दलच्या कल्पना माणसाला उपजत नसतातच. हे ज्ञान वाढत्या वयाबरोबर स्वाभाविकरीत्या माणसाला येत नाही. आपल्या समाजात रूढ असणाऱ्या, त्याला मान्य असणाऱ्या मार्गांनेच आपण वृद्ध व्हायला शिकतो. वृद्धांनी आपले उतारवय कसे कंठावे, त्यांना लोकांकडून कशी वागणूक मिळावी याबद्दल प्रत्येक समाजाने काही विशिष्ट चालीरीती व रूढी निश्चित केलेल्या असतात. या संदर्भात वार्धक्यशास्त्र व धर्म (religion) यांचे नाते जवळचे आहे हे लक्षात ठेवणे उपयुक्त ठरेल. कारण दोन्हीही आपापल्या परीने मानवी जीवनाला अर्थ लावून देण्याचा प्रयत्न करीत असतात.

वर म्हटल्याप्रमाणे भारतीय वार्धक्यशास्त्र अजून बाल्यावस्थेतच आहे. वृद्ध स्त्रीपुरुषांचा घसरत जाणारा दर्जा व त्यांचे खालावत जाणारे राहणीमान यांना आळा घालण्यासाठी आज रूढ होऊ पाहणाऱ्या नवीन आचारविचारांचा वार्धक्य व वृद्धांबाबतच्या परंपरागत सांस्कृतिक व सामाजिक दृष्टिकोणांशी समन्वय साधू शकणारी एक नवीन आदर्श जीवनपद्धती व व्यवस्था निर्माण करणे हे भारतीय वार्धक्यशास्त्राचे एक महत्त्वाचे ध्येय राहील. भारताच्या इतिहासात पूर्वी एकदा म्हणजे बौद्धयुगात, वार्धक्य व त्याला संलग्न अशा विषयांना अनुसरून अशीच एक क्रांतिकारक विचारसरणी आजच्यासारख्याच संक्रमणकाळात उदयास आली. वार्धक्य ही मानवी जीवनाच्या त्रुटी व मर्यादा स्पष्ट करणारी एक अत्यंत क्लेशदायक व अपरिहार्य अशी घटना आहे हा एक मूलभूत व क्रांतिकारी सिद्धांत बुद्धाने मांडला व त्याला अनुसरून एक नवीन, निवृत्तिप्रधान आदर्श जीवनप्रणाली तत्कालीन वैदिक प्रवृत्तिप्रधान अशा जीवनप्रणालीला पर्याय म्हणून सुचविली. पुढे बुद्धोत्तर, स्मृतिकालखंडात मनु, याज्ञवल्क्य इत्यादि स्मृतिकारांनी परंपरागत वैदिक धर्मावर आधारित पण बौद्धमताशी सुसंगती व समन्वय राखणारी, वार्धक्याच्या इष्ट परिणामांचा आत्मोन्नतीसाठी उपयोग करून घेऊ इच्छिणारी व त्याच्या अनिष्ट परिणामांना यशस्वीपणे तोंड देऊ शकणारी, प्रवृत्ती व निवृत्ती यांना जीवनात समान स्थान देणारी अशी एक सुधारित, आदर्श जीवनप्रणाली (चतुराश्रमव्यवस्था) निर्माण केली.

या आश्रमव्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी लिहिलेल्या प्रस्तुत लेखाचा उद्देश द्विविध आहे. (१) आश्रमव्यवस्थेचे वार्धक्याच्या संदर्भात विवेचन व विश्लेषण करणे आणि (२) त्यायोगे अजून बाल्यावस्थेत असलेल्या वार्धक्यशास्त्राला त्याच्या सांस्कृतिक परंपरेची तोंडओळख करून देणे.

## ज्ञानाची सांस्कृतिक परंपरा

ज्ञानाचे आकलन, साधना व मीमांसा ज्ञानाच्या सांस्कृतिक परंपरेच्या संदर्भात होऊ शकते असा एक मूलभूत सिद्धांत शंकराचार्य, भर्तृहरी आदि प्राचीन भारतीय विचारवंतांनी मांडला आहे. मानवाच्या भोवती पसरलेल्या अफाट व अनंत बाह्यविश्वाचे आकलन त्याच्या सतत नवनवीन स्वरूपात माणसाला त्याच्या परंपरेने जतन करून ठेवलेल्या संचित बोधचिन्हांच्या व विचार-संरचनांच्या द्वारे होत असते. तसेच मानवाच्या अंतर्विश्वाबद्दलचे त्यांच्या मनात उभे राहणारे प्रश्न, त्यांची उकल करण्यासाठी त्यांचे चाललेले प्रयत्न व त्यायोगे त्यांच्या जीवनाला ते लावीत असलेला अर्थ हा मानवाची विशिष्ट सांस्कृतिक परंपरा आणि वर्तमानकाळात त्याच्या पुढे ठाकलेली आव्हाने यांच्या परस्पर क्रियेतून निर्माण होणाऱ्या तणावातून, संघर्षांतून दृग्गोचर होत असतात. येथे संस्कृती म्हणजे सत्य, शिव आणि सौंदर्य ही आत्मसात करण्यासाठी मानवाने परस्परसहकार्यातून निर्मिलेल्या वस्तूंचा, संस्थांचा व कल्पनांचा एकात्म संभार ही व्याख्या अभ्याहृत आहे. (पहा : परंपरा आणि नवता, गो. वि. करंदीकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८०, २ आ.) या संभाराचे मूल्यगर्भसंचित व त्याची गतिशील चैतन्यावस्था यांच्यातून त्या संस्कृतीची विशिष्ट परंपरा निर्माण होते व सांस्कृतिक तत्त्वांच्या निष्ठापूर्वक परिपालनातून ती व्यक्त केली जाते. विशिष्ट वस्तुनिष्ठ संदर्भातून अनिवार्यपणे प्रकट होणारे कोणतेही नवीन ज्ञान प्रथम त्याच्या परंपरेशी नकारात्मक, संघर्षात्मक पद्धतीने संबद्ध होते आणि दोघांमधील संवादाचा परिणाम म्हणून कालांतराने परंपरेतच अटळपणे मिसळून जाऊन तिला समृद्ध करते व अखेरीस ज्ञानाच्या पारंपारिक गतिमान संचिताचा एक सजीव घटक म्हणून अंतर्भूत होते. हे घडत असताना पारंपारिक ज्ञानाच्या मूल्यमापनात काही लक्षणीय बदल घडून येऊ शकतात. म्हणजे परंपरेचे भूतपूर्व ज्ञान व त्याचे स्वरूप तेच राहिले तरी नवीन ज्ञानामुळे, विचारांमुळे त्याचा 'अर्थ' बदलू शकतो. याचे कारण म्हणजे नवीन ज्ञान जरी प्रामुख्याने वर्तमानकाळाशी निगडित असले तरी पारंपारिक ज्ञानातील काही संवादी सुरांना जागृत करण्याची शक्ती त्याच्यात असू शकते. तेव्हा एखाद्या ज्ञानशाखेची परंपरा आणि तिच्यात भर टाकणारे नवीन विचार यांचा सुसंवाद जोडता आला तर त्यातून दोन उपयुक्त गोष्टी निष्पन्न होऊ शकतात : (१) पारंपारिक मूल्यगर्भसंचिताचा वर्तमानकाळातील गरजा भागविण्यासाठी काही उपयोग करून घेता येतो व (२) नवीन ज्ञानाच्या दिशा व स्वरूप काय असावे।राहील याबद्दल काही मार्गदर्शन मिळू शकते.

याच कारणास्तव परंपरेतून निर्माण होणाऱ्या ज्ञानाचे महत्त्व भाष्यकार वारंवार प्रतिपादन करतात. या ज्ञानाला आगमज्ञान अशी संज्ञा आहे आणि आगम हे ज्ञानाचे प्रमाण म्हणून बहुतेक सर्व दर्शनातून मान्यता पावलेले आहे. भर्तृहरीच्या मते आगमज्ञानाची परंपरा ऋषिज्ञानाहूनही पूर्वकालीन आहे. ('ऋषीणामपि यत् ज्ञानम् तदपि आगमपूर्वकम्...' वाक्यपदीयम्, ब्रह्मकाण्डम्.) गीता १३.३ वर भाष्य करताना शंकराचार्य म्हणतात, ज्याच्या ज्ञानाला परंपरेची पार्श्वभूमी नाही तो सर्व शास्त्रे जाणणारा असला तरी त्याला मूर्खवत् समजून त्याच्या ज्ञानाची उपेक्षा करावी. (असम्प्रदायवित्सर्वशास्त्रविदपि मूर्खवदेवोपेक्षणीयः) म्हणूनच कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन भर घालण्याच्या प्रयत्नात त्या ज्ञानाचे पूर्वार्जित संचित व परंपरा काय आहे वा होती याची दखल घेणे अत्यावश्यक असते. प्रस्तुत लेखात ही दखल घेण्याचा प्रयत्न प्रसिद्ध बौद्ध कवी अश्वघोष याचे बुद्धचरित · सौंदरनंद व कालिदासाचे रघुवंश या संस्कृत साहित्यातील तीन विदग्ध महाकाव्यांच्या आधारे केला आहे.

विदग्ध या संज्ञेचा यौगिक किंवा धात्वर्थ 'विशेष प्रकारे भाजलेले' असा होतो. मूळ कच्ची किंवा हिरवी खाद्यवस्तू वाळवून, शिजवून किंवा भाजून मग खाण्याकरता उपयोगात आणली जाते. म्हणजेच नैसर्गिक अन्नावर सुधारलेल्या नागर माणसाने काही विशिष्ट संस्कार करून उपयुक्त केलेले सुसंस्कृत अन्न असा अर्थ विदग्ध या संज्ञेने सूचित होतो. त्या संदर्भात उत्तरकालीन संस्कृतीच्या बदलत्या ओघात व भिन्न परिस्थितीत पूर्वीच्याच काव्यांच्या (उदा. रामायण व महाभारत) आधारे, विशिष्ट हेतूने आणि जाणिवेने रचलेले कलामंडित व तंत्रबद्ध महाकाव्य म्हणजेच विदग्ध महाकाव्य अशी व्याख्या समीक्षक करतात. (पहा–संस्कृत काव्याचे पंचप्राण के. ना. वाटवे, मनोहर ग्रंथालय, पुणे, १९७० पृ १०.४.)

वार्धक्यविषयक मूलभूत विचार बौद्ध धार्मिक व स्मार्त ग्रंथातून मांडले गेले आहेत; परंतु ते सूत्र वा नियम या स्वरूपात असल्यामुळे सामान्य माणसास कळण्यास क्लिष्ट, नीरस, शुष्क व दुर्बोध वाटतात. याउलट महाकाव्याचो कथा सांगण्याच्या संदर्भात मानवी जीवनाच्या वार्धक्यादि अवस्थांचे दर्शन घडविणे व त्यासाठी प्रतीक म्हणून ती ती दृश्ये वा प्रसंग कल्पकतेने योजून त्या कथेत बोधगम्यता आणणे हे महाकाव्यरचनेचे प्राणभूत तत्त्व आहे. आपल्या कथेतील विशिष्ट वयोमान असलेल्या पात्रांच्या प्रातिनिधिक अनुभवांवर नागरी संस्कार व काव्य यांचा साज चढवून सार्वत्रिक व सर्वमान्य मानवी जीवनाचे दर्शन घडविण्याचे कार्य अश्वघोष व कालिदास आपापल्या तात्त्विक व धार्मिक दृष्टिकोणातून उत्तम तऱ्हेने पार पाडतात. बाल्य, तारुण्य, प्रौढावस्था व वार्धक्य या चार प्रमुख अवस्थांची कलात्मक मीमांसा स्वतः प्रमाण मानलेल्या विशिष्ट नीतितत्त्वांच्या आधारे ते करतात. या कारणास्तव प्रस्तुत लेखात वरील तीन विदग्ध महाकाव्ये आधारभूत ग्रंथ म्हणून निवडल्याचे प्रयोजन लक्षात येईल. वरील पार्श्वभूमीवर उतारवयापर्यंत जीवनात प्रवृत्तीला महत्त्वाचे स्थान देणाऱ्या वैदिक जीवनप्रणालीला पर्याय म्हणून तारुण्यातच निवृत्तिपर होणारी जीवनप्रणाली बुद्धाने पर्याय म्हणून का प्रतिपादिली व त्याला प्रतिसाद म्हणून स्मृतिकारांनी प्रवृत्ती व निवृत्ती या दोघांनाही बरोबरीचे स्थान देणारी चतुराश्रमव्यवस्था तडजोड म्हणून का मांडली व तिचा पुरस्कार कालिदासाच्या रघुवंशातून कसा करण्यात आला आहे याच्या विवेचनाकडे आपण आता वळू या.

## वैदिक प्रवृत्तिप्रधान जीवनप्रणाली

वेदकालीन जीवनात बालपणापासून वार्धक्यदशेपर्यंत प्रवृत्ती हाच स्थायीभाव होता हे ऋग्वेद व अथर्ववेदातून वेगवेगळ्या देवतांना उद्देशून केलेल्या स्तुतिपर सूक्तांतून सूचित होते. वार्धक्य ही एक स्वाभाविक व नैसर्गिक प्रक्रिया आहे हे लक्षात ठेवून व ती सर्वांनाच अटळ व अपरिहार्य आहे हे ओळखून माणसाने दीर्घायुष्यापर्यंत निरोगी रहावे व उतारवयापर्यंत जीवनाचा मनमुराद, जितका अधिक घेता येईल तेवढा उपभोग घ्यावा अशी वैदिकांची धारणा होती. ज्याप्रमाणे बैलाला दोरीने खांबाला बांधून ठेवतात त्याचप्रमाणे वार्धक्य माणसाला जखडून टाकते. (अथर्व ३.११.८) म्हणून वार्धक्याला भिऊन ते टाळण्याचा अट्टाहास करणे यात पुरुषार्थ नाही. शरीर म्हणजे वार्धक्यापर्यंत टिकणारा एक खजिना आहे, तो रिता न होता सतत वाढत जावा अशी वैदिककालीन लोकांची प्रार्थना असे. उदा. वार्धक्यालाच देवता कल्पून केलेल्या प्रार्थनेत एक ऋषी म्हणतो, 'हे जरिमन् (वार्धक्य) तुझ्यासाठीच हा मानव वाढू दे. आकाश आणि पृथ्वी त्याला वार्धक्यानंतरच मरणारा करोत. (अथर्व १,२.२८)' दुसऱ्या एका ऋषीची विनंती आहे की, बैल ज्याप्रमाणे गोशाळेत घुसतात त्याप्रमाणे प्राण आणि अपान हे दोन वायू शरीरात घुसून या मनुष्याला शंभर वर्षे जगणारा करोत (अथर्व ७.५३.५.) अथर्व ५, २८,७ मध्ये मनुष्याच्या बाल, तरुण व वृद्ध अशा तीन अवस्था कल्पून त्यांची यज्ञोपवीताच्या तीन पदरांशी तुलना केली आहे. ज्याप्रमाणे एकच धागा तीनही पदरात परिणत असतो त्याचप्रमाणे (प्रवृत्तिप्रधान) धर्माचरणाचा एकच धागा या तीनही अवस्थांतून दृश्य व्हावा अशी अपेक्षा व भावना वैदिक समाजात रूढ होती. थोडक्यात वेदांतून आढळून येणारी व्यक्तिमत्त्वाची आदर्श प्रतिमा जीवनात उतारवयापर्यंत रस व आनंद लुटून घेण्याची इच्छा व महत्त्वाकांक्षा बाळगणारी आहे, प्रवृत्तिपर तत्त्वज्ञान व मनोवृत्ती यांचा पगडा तत्कालिन समाजावर असल्यामुळे जीवनाची क्षणभंगुरता, त्याची कटुता, भीषणता, वार्धक्यामुळे होणारी मानवी जीवनाची अपरिमित व अटळ हानी यांची भीति वैदिक समाजाला शिवलेली आढळून येत नाही व त्यामुळेच या विषयावर काही तात्त्विक चर्चा, ऊहापोह झालेला ऋग्वेदादि ग्रंथांतून आढळून येत नाही.

## बुद्धप्रणीत निवृत्तिप्रधान जीवनप्रणाली

अश्वघोष हा इसवी सनाच्या पहिल्या शतकातला एक मौलिक बौद्ध महाकवी म्हणून प्रसिद्ध आहे. उच्च कोटीचा धर्मोपदेशक आणि महान तत्त्ववेत्ता म्हणूनही त्याची ख्याती होती. मूळचा ब्राह्मण असल्यामुळे वेद, उपनिषदादि ग्रंथांचा त्याने गाढा अभ्यास केला होता. बुद्धचरित व सौंदरनंद ही त्याची दोन महाकाव्ये एकमेकांच्या पूरक कृती आहेत. पहिल्यात बुद्धाच्या जन्मापासून त्याला निर्वाणपद प्राप्त होईपर्यंतच्या प्रमुख प्रसंगांचे सांगोपांग वर्णन व विवेचन आहे, तर दुसऱ्यात नंदाला त्याच्या मनाविरुद्ध तारुण्यातच बुद्धाने संसारातून परमार्थाकडे कसे वळविले याचे कथानक येते. प्रस्तुत लेखाच्या दृष्टीने बुद्धचरिताचा तिसरा व सौंदरनंदाचा चौथा सर्ग अधिक महत्त्वाचे आहेत. जीवनात प्रासादाच्या बाहेर प्रथमच पडलेल्या तरुण गौतमाला पाहून नगरवासी आनंदित होतात. गौतमालाही बाहेरचे आल्हाददायक वातावरण पाहून हर्ष होतो; पण त्याचा आनंद क्षणभंगुर ठरतो. कारण शुद्धाधिवास देवांनी बुद्धिपुरस्सर निर्माण केलेली वृद्ध, रोगी व मृतदेह ही तीन करुण दृश्ये एकामागून एक त्याच्या नजरेला येतात. जीवनात सर्वोपभोगांनाच फक्त स्थान आहे, सर्वायुष्य विषयसुखांचा आनंद लुटण्यासाठीच आहे असे पढविण्यात आलेला गौतम वृद्धावस्था, अनारोग्य व मृत्यु या मानवी जीवनाच्या संहार करणाऱ्या घटना अस्तित्वात आहेत या जाणिवेने व्यथित होतो. व्याधिजरामरण यांच्या आक्रमणापुढे मानव अगतिक व असहाय आहे. त्याच्या जीवनाला मर्यादा आहेत हा विचार त्याला व्याकुळ करतो आणि त्याच्या मनात संवेग व उद्वेग निर्माण करतो. एका बाजूला मानवी जीवनात प्रतिक्षणी घडून येणाऱ्या या अनर्थांची अनिवार्यता आणि दुसऱ्या बाजूला जगातील लोकांनी याबाबत दाखविलेली आत्यंतिक उपेक्षा

यांच्यामुळे त्याच्या मनात वीतराग व वैराग्य यांची भावना वाढीस लागते. गौतमाच्या बदलत्या मनोवृत्तीमुळे सावध्र झालेल्या त्याच्या वत्सल पित्याचे, शुद्धोधनाचे, गौतमाला संसारात रमविण्याचे सारे प्रयत्न कसे विफल ठरतात याचे कथानक बुद्धचरिताच्या तिसऱ्या सर्गात येते.

तरुण नंद आपली पत्नी सुंदरीसह महालात सुखोपभोग घेत असताना बुद्ध तेथे भिक्षा मागण्यासाठी येतो; पण कोणीच त्याच्याकडे लक्ष न दिल्यामुळे रिक्त हस्तानेच विन्मुख होऊन त्याला तेथून निघून जावे लागते. नोकरांकरवी हे वर्तमान कळल्यावर नंद बुद्धाकडे धावत जाऊन त्याची क्षमा मागतो. उत्तरादाखल बुद्ध आपले भिक्षापात्र त्याचे हातात ठेवतो. तरीही नंद संसारसुख सोडून द्यायला तयार होत नाही. म्हणून बुद्ध बळजबरीने नंदाला त्याच्या इच्छेविरुद्ध भिक्षु व्हायला कसे उद्युक्त करतो याचे कथानक सौन्दरनंदच्या चौथ्या सर्गात येते.

वरील दोन कथानकांतील दृश्ये, प्रसंग व घटना यांचे वर्णन करण्याच्या अनुषंगाने अश्वघोष वार्धक्य, वृद्ध व त्यांचे जीवन याबद्दल प्रथम बुद्धाची स्वतःची व नंतर त्याच्या अनुयायांची काय विचारसरणी झाली व ती तत्कालीन वैदिक समाजात रूढ असलेल्या कल्पनांहून कशी क्रांतिकारी होती याची स्पष्ट कल्पना व जाणीव करून देतो. उदा. गौतम जेव्हा आयुष्यात प्रथमच पांढरे केस झालेला, कमरेत वाकलेला, शिथिल गात्रे असलेला असा एक वृद्ध गृहस्थ त्याच्या रथाकडे येताना पाहतो तेव्हा तो सारथ्याला विचारतो, 'हा माणूस कोण आहे; त्याची झालेली ही अवस्था त्याची वैयक्तिक विकृती आहे का हा मानवी देहाचा स्वधर्मच आहे, का हा त्याला अकस्मात् घडलेला अपघात आहे?' (बुद्धचरित, ३.२८) उत्तरादाखल सारथी म्हणतो. 'रूपाचे हरण करणारी, शक्तीचा घात करणारी, शोकाचे उत्पत्तिस्थान असणारी, आनंदाचा निःपात करणारी, स्मृतीचा नाश करणारी आणि इंद्रिये व इंद्रियजन्य सुखांचा कर्दनकाळ ठरणारी ही जरा नावाची व्याधी आहे. (बुद्धचरित. ३.३०)' जरा सर्वांनाच सारख्या रीतीने अशी छळते आणि महाराज, आपलीही तिच्यापासून सुटका नाही!' सारथ्याचे हे बोलणे ऐकून विजेचा कडकडाट झाल्यावर बैल जसा घाबरतो तद्वत गौतमही वार्धक्याच्या भयाने थरथर कापू लागला. (बुद्धचरित ३.३४) त्याचे मन कोणत्याच गोष्टीत रमेनासे झाले. जीवनातल्या कोणत्याच कृतीत त्याला रस वाटेना. पुढे जरा, मरण व व्याधी या उपाधींबद्दल अरण्यात सतत विचार व चिंतन करून त्याला ज्या परम ज्ञानाची दिव्यदृष्टी आली त्याचे वर्णन व चित्रण अश्वघोष पुढीलप्रमाणे करतो :

जन्म, जरा, मरण सर्वच दुःख आहे. ज्याप्रमाणे सर्व वनस्पती पृथ्वीपासून उत्पन्न होतात त्याचप्रमाणे जरा सर्व विपत्तींचे मूळ कारण आहे. जरेसारखा देहधारकांचा दुसरा कोणी शत्रू नाही. ज्याप्रमाणे उसाच्या कांड्यातून सर्व रस काढून घेतल्यावर त्याचे चिपाड इंधन म्हणून वापरण्यासाठी बाजूला ठेवण्यात येते, त्याप्रमाणे जरारूपी यंत्रातून पिळून निघालेले नीरस शरीर मृत्यूची वाट पहात बसते. (सौंदरनंद ९.३१) किंवा ज्याप्रमाणे दोन पुरुषांकडून मागेपुढे ओढल्या जाणाऱ्या करवतीने मोठ्या वृक्षाचे ओंडके पाडण्यात येतात तद्वत रात्र आणि दिवस यांच्या मार्गाने सतत आक्रमण करीत असलेले वार्धक्य या उन्मत्त आणि अभिमानी जीवाला व जगाला खाली पाडते. (सौंदरनंद ९.३२) म्हणून जोपर्यंत मनुष्य संसारसुखात रत आहे तोपर्यंत जरा आदी अनर्थ त्याच्यावर आक्रमण करतात. या कारणास्तव प्रवृत्तीचाच अभाव केला, म्हणजेच जीवन निवृत्तिपर केले तर मनुष्यमात्र कोणत्याही व्यथेने दंशित होणार नाही. तरुण वयात मन प्रवृत्तिप्रधान असते व ते विषयोपभोगाकडे सतत धावत असते; पण पहाडातून खाली धावत येणाऱ्या वेगवान नदीप्रमाणे उसळणाऱ्या या प्रवृत्तिपर मनाला वेळीच बंधन घातले पाहिजे. कारण पुन्हा कधी परत न येणारे यौवन वेगाने वार्धक्याकडे धावत आहे.

## क्षणिक व अनित्य

यौवन क्षणिक आहे आणि त्याचा आनंद उपभोगणारा मानव व त्याचे विश्व अनित्य आहेत. म्हणून ज्यांचा स्थायीभाव यौवन आहे असे कामोपभोगी क्षणिक व अनित्य आहेत. कामग्रस्त असणे हा मानवाचा स्वाभाविक जीवनधर्म आहे. तरुण असो वा वृद्ध, मनुष्य नेहमीच कामातुर असतो. म्हणून जरामरण–व्याधी हे महान अनर्थकारी त्रिकूट नसते तर सर्वांनाच मनोज्ञ अशा विषयसुखात रममाण होता आले असते. स्त्रियांचे रूप व सौंदर्य अमर व अक्षीण असते त[illegible] पुरुषांनी त्यांचा उपभोग घेण्यास प्रत्यवाय नसता; पण मानवी जी[illegible] नाची वाटचाल जरामरणव्याधी यांच्या दिशेने अटळ आहे जी[illegible] नाचा अंत मृत्यूने होणार नाही, व्याधी, रोग, अनारोग्य यांनी प्रजे[illegible] स्वास्थ्य बिघडणार नाही, वार्धक्य तारुण्याचा ऱ्हास करणार नाही[illegible] अचानक दुर्घटनांनी कोणाचीही सुखसंपत्ति हरण होणार नाही, अ[illegible] निर्विवाद हमी कोणी देणार असेल तर तारुण्यातच संसार–कुटुं[illegible] सोडून तपोवनात परमार्थनिर्वाणप्राप्तीसाठी जाण्याची गरज कोण[illegible] लाच उरणार नाही. (बुद्धचरित ५.३५) काहींच्या मते तारुण्या[illegible] विकारप्राबल्य असल्यामुळे व मन चंचल आणि अस्थिर असल्यामु[illegible] ध्यानधारणा, तप इत्यादी व्रतांचे पालन करण्यात अडचणी व अड[illegible] थळे येतात; परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, वृद्धापकाळी शरी[illegible] क्षीण होत जाते आणि दुःख अवश्यभावी असते म्हणून ध्यानधारणे[illegible] सारखी खडतर व्रते तारुण्यातच पार पाडून मुक्ती मिळवावी.

आपल्या प्रिय स्वजनांपासून मनुष्याचा होणारा वियोग अटळ आहे. तो केव्हा ना केव्हा तरी घडणारच. म्हणून आपल्या वृद्ध मातापित्यांची सेवा करण्यासाठी तरुण मुलांनी स्वतःचा परमार्थ साधण्यासाठी संघात किंवा अरण्यात जाऊ नये असा युक्तिवाद करणे चूक आहे. पितापुत्र, आईबाप वगैरे नाती तसेच कुटुंबसंस्था स्वाभाविक नाहीत, ती कृत्रिम आहेत. मोठ्या कष्टाने, इच्छाशक्तीच्या जोरावर प्राणिमात्र आपल्या आईच्या उदरात गर्भ म्हणून वाढतो; पण जिचे सर्व प्रयत्न अखेरीस निष्फळ होणार हे ठरलेलेच आहे (म्हणजे नऊ महिने पोटात वाढवलेला गर्भ कालांतराने मरणार हे निश्चित आहे) अशी आई त्या गर्भाची कोण लागते आणि तो गर्भ तरी तिचा काय लागतो? (बुद्धचरित ६.४५) गर्भधारणा झाल्यापासून मृत्यू माणसाला केव्हाही गाठू शकतो. आपण सर्व यमराजाचे लाचार आहोत. त्याचे बंधन झुगारून द्या. कारण निर्वाणप्राप्तीसाठी काल-अकाल अशा मर्यादा नसतात. कालाग्नीच्या जरा व रोगरूपी ज्वालांनी वेढलेल्या संसारात जे गाफील राहतील ते चारी बाजूंनी जळत असलेल्या घरात झोपून राहिलेल्या माणसाप्रमाणे होत. (सौंदरनंद ५.४१)

## बौद्धमताचे तत्कालीन समाजावर झालेले परिणाम

वरील विवेचनावरून आपल्याला असे आढळून येते की, बुद्ध मनुष्याचा जीवनक्रम जरामरणव्याधी यांच्या संदर्भातूनच पाहतो. वार्धक्याची व्याख्या तो व्याधी व मरण यांना जोडणारा दुवा या शब्दांत व्यक्त करतो. जरेपासून मानवाचे कायमचे रक्षण व्हावे म्हणून अष्टांगयोगयुक्त अशा स्वानुभवावर आधारित एका नवीन मार्गाचा पुरस्कार त्याने केला. बुद्धाच्या या निवृत्तिपर विचारसरणीचा फार खोलवर परिणाम तत्कालीन प्रज्ञावान लोकांवर आणि त्यांच्याद्वारे एकंदर समाजजीवनावर झाला. अशोकासारख्या सम्राटाने बौद्ध धर्माचा स्वीकार करून त्याला राजाश्रय दिला, त्यामुळे बौद्धमताच्या प्रभावाला व प्रचाराला सत्तेची बळकटी व मान्यता मिळाली. केवळ शरीरपोषणापलीकडे माणसाचे काही अधिक कर्तव्य आहे, निव्वळ शारीरिक आनंदाहून उच्चतर असा निर्वाणातून उत्पन्न होणारा आनंद आहे ही बुद्धाची प्रमेये बहुतेक सुज्ञांना व आप्तांना मान्य पडली. मानवी जीवनात विकारदमन व विवेकवर्धन यांची आवश्यकता आहे हा बुद्धविचार तत्कालीन जनमनात सहजगत्या रूढ झाला; परंतु एकंदरीत विरागी व संन्यस्त वृत्तीचा सर्वतोपरी पाठपुरावा करणारे श्रमण गौतमाचे तत्त्वज्ञान ज्ञान म्हणून फार उच्च किंवा निरपवाद असे काही जणांना भासले तरी सर्वसामान्य, दैनंदिन मानवी जीवनाच्या दृष्टीने ते जीवनाबद्दल अनादर व अनास्था उत्पन्न करणारे ठरले. (पहा : कालिदासदर्शन: गो. के. भट, व्हीनस प्रकाशन, पुणे, पृ. ७७).

बुद्धाने स्वतःच उदाहरण घालून दिल्याने व सतत चाळीस वर्षे त्याचा प्रचार केल्यामुळे बौद्धयुगात संन्यासजीवनाबद्दल लोकांच्या मनात आदर निर्माण झाला. प्रव्रज्येची प्रतिष्ठा पण त्याबरोबर वाढली बौद्ध धर्मोपदेशकांचा उपदेश श्रवण करून अनेक अल्पवयीन युवक भिक्षू बनले. बौद्धसंघ विशेषकरून तरुणांनाच आकर्षून घेण्याचा प्रयत्न करीत असे. कारण वृद्धापकाळी निर्वाण प्राप्त करू इच्छिणाऱ्या म्हाताऱ्यांच्या शारीरिक व मानसिक कुवतीबद्दल शंका व्यक्त केली जात असे. थेर म्हणजे वयोवृद्ध नव्हे तर ज्ञानवृद्ध म्हणजे ज्ञानाने श्रेष्ठ असा अर्थ लावण्यात येई. असे बरेच थेर तारुण्याच्या उंबरठ्यावरच जग, संसार सोडून विरक्त झालेले आढळून येत व त्यातील काही अर्हतपदापर्यंतही पोहोचलेले असत; परंतु या प्रथेमुळे तत्कालीन समाजात बरीच खळबळ माजून एकंदर समाजजीवनच विस्कळित होऊ लागले होते. कारण ज्यांच्या वृद्धापकाळी कर्तासवर्ता मुलगा हाच एक आधार होता तोच भिक्षु बनल्यामुळे त्याच्या वृद्ध मातापित्यांचे हाल होणे साहजिकच होते. संसार सोडून भिक्षु बनून संघात सामील होण्याचे कारण निदान सुरुवातीला तरी निर्वाणप्राप्ती हेच होते; पण हळूहळू ते कारण मागे पडून निव्वळ स्वार्थ किंवा ऐहिक सुखसोयींपोटी बरेच जण भिक्षू बनू लागले. उदा सुमंगल नावाच्या एका पूर्वाश्रमीच्या शेतमजुराच्या प्रतिमोक्षाप्रमाणे (confession) 'भिक्षु झाल्यामुळे शेतमजुराच्या नशिबी असणारे कष्टप्रद जीवन, खडतर कामे व अवजारे यांच्यापासून माझी आता सुटका झाली आहे. मला आता कोयत्याने चारा कापावा लागत नाही की, नांगर धरावा लागत नाही त्या कुदळीफावड्यांपायी सतत वाकाव्या लागणाऱ्या माझ्या पाठीलाही आता आराम मिळत आहे. (पहा थेरगाथा, क्र. ४३).' थेरगाथा व थेरीगाथा या चरित्रपर ग्रंथांतून प्रव्रज्या घेण्याची वेगवेगळी कारणे दिलेली आढळून येतात. दांपत्यजीवनातील विफलता, पारिवारिक कलह व तंटेबखेडे यांना कंटाळून अनेक स्त्रीपुरुष भिक्षुभिक्षुणी बनत असत. कित्येक तरुण गृहस्थ जेव्हा आपल्या स्त्रियांना सोडून संघात शिरले तेव्हा भिक्षुरूपात का होईना पण त्यांच्याजवळ रहावयास मिळावे, या मुख्य हेतूने काही जणी भिक्षुणी बनल्या. अनेक विधवा स्त्रिया पतिवियोग सहन न झाल्यामुळे धम्माला शरण गेल्या. अर्थात भिक्षुभिक्षुणी बनूनही कित्येक थेरथेरींची मानसिक विकारांपासून सुटका झाली नाही तसे प्रांजळपणे दिलेला कबुलीजबाब गाथांतून आढळतो. उदा. श्यामा नावाच्या एका थेरीने तरुणपणीच प्रव्रज्या घेतली; परंतु पंचवीस वर्षे ध्यानधारणा करूनही आत्मविजय मिळविण्यात ती अयशस्वी ठरली. अखेरीस वृद्धावस्थेतच तीव्र साधनेच्याद्वारे ती अर्हत्व प्राप्त करून घेऊ शकली. वड्ढेसी नावाची दुसरी थेरी लिहिते की, प्रव्रज्या घेतल्यानंतर पंचवीस वर्षे ती कामवासनेने ग्रस्त राहिली. सिंहा नावाच्या दुसऱ्या एका थेरीच्या स्वानुभवानुसार सात वर्षे तीव्र साधना करूनही तिच्या चित्ताला शांती मिळू शकली नाही. मन सतत बाह्य आकर्षणांकडे धावत राहिले. काही थेर प्रव्रजित झाल्यानंतरही पारिवारिक बंधनांतून मुक्त होऊ शकले नाहीत. बुद्धोत्तर काळात तर भिक्षूंचे वेगवेगळे गट बौद्ध–विहारांच्या आसपास स्वतंत्र घरे बांधून राहू लागले. काकजातकातील एका कथेनुसार एकदा श्रावस्तीचे काही धनाढ्य गृहस्थ भिक्षू बनून विहाराजवळच पर्णशाला बांधून तेथे एकत्र राहू लागले. भिक्षा मागण्यासाठी ते एकत्रच बाहेर पडत व कधीकधी गावात आपल्या बायकांमुलांना भेटावयास जात व तेथेच जेवणखाण उरकत असत.

## प्रतिक्रिया

वरील विवेचनावरून बुद्धोत्तर काळात बुद्धाने सुचविलेल्या पर्यायी जीवनप्रणालीविरुद्ध जी सामाजिक प्रतिक्रिया घडून आली तिची कारणे स्पष्ट होतात. या विरोधाचे नेतृत्व मनु, याज्ञवल्क्य इत्यादी स्मृतिकारांनी केले त्यांच्या मते वार्धक्य, वृद्ध व त्यांचे जीवन यांचे बुद्धाने केलेले मूल्यमापन अभावात्मक (negative) होते. त्याने सुचविलेल्या पर्यायी जीवनव्यवस्थेमुळे तत्कालीन समाजाचा वृद्धांकडे पाहण्याचा दृष्टिकोण विकृत झाला आणि वृद्ध स्त्रीपुरुष व त्यांचे कुटुंबीय आणि समाजातले इतर वयोगट यांच्यामध्ये मोठी दरी व दुरावा निर्माण झाला. वृद्धांचे जीवन एकाकी बनू लागले व त्यामुळे समाजस्वास्थ्य बिघडून समाजाच्या स्थैर्याला धोका निर्माण झाला. म्हणून निवृत्ती किंवा विरक्तता हेच जीवनाचे एकमेव ध्येय मानून त्याप्रमाणे जीवनयात्रेची आखणी करणाऱ्या श्रमण तत्त्वज्ञानाविरुद्ध स्मृतिकारांनी आपला आवाज उठविला आणि त्या संदर्भात वार्धक्याची भावात्मक (positive) व्याख्या पुढे मांडली. वयाने वाढत जाणे म्हणजे शरीर व मनाने निकोप राहून वयोवृद्ध होणे, स्वतःचे कुटुंबीय, समाज व स्वधर्म यांच्या संदर्भात ज्ञानवृद्ध होणे व परमार्थ साधणे. वार्धक्य परिणामस्वरूप आहे व जन्मल्या क्षणापासून ते जीवनाचा एक अविभाज्य घटक बनते. वयोमानानुसार मनुष्याच्या मनोवृत्तीत विशिष्ट बदल घडून येतात. म्हणून तारुण्य हे विषयोपभोग घेण्यासाठी आहे तर धर्म व मोक्ष यांना शरण जाण्याचे वय वृद्धापकाळ होय. कालानुसार रूप व यौवन दाबून वार्धक्य वर येतेच. म्हणून यौवनातच विषयसुख भोगणे हा मानवाचा स्वाभाविक धर्म

आहे, तर वृद्धापकाळ हाच परमार्थप्राप्तीचा उचित काळ असतो. मोक्षफल अदृश्य व अप्रत्यक्ष आहे त्याच्या मागे तारुण्यातच लागून अर्थ व काम या प्रत्यक्ष प्रवृत्तीपर, इंद्रियोन्मुख व इंद्रियजन्य सुखांची अवहेलना करणे हा अधर्म आहे. तसे वागणे म्हणजे उद्या मोर मिळेल या आशेने आज हातात असलेले कबुतर सोडून देण्यासारखे आहे.

धैर्य व स्थैर्यपरायणता हे वार्धक्याचे स्थायीभाव आहेत. त्यामुळे या अवस्थेत मन सहजगत्या शांत राहते. म्हणून तेव्हाच परमार्थाकडे वळणे अधिक हितकारक आहे. निर्वाण व मोक्षप्राप्तीच्या संदर्भात स्त्रीपुरुष सहजीवन व सहकार्य यांना महत्त्वाचे स्थान आहे. वृद्ध पुरुषाने आपल्या स्त्रीला (तिची तशी इच्छा असेल तर) ध्यानधारणा इत्यादी व्रतांचे पालन करण्यासाठी आपल्याबरोबर अरण्यात आणणे गैर नाही.

## परिणाम : वार्धक्यप्रक्रियेचे तात्त्विक अधिष्ठान

वर वार्धक्य हे परिणामस्वरूप असते असा निर्देश केला, त्याच्या स्पष्टीकरणाकडे आता वळू या. सृष्टीतील सूक्ष्म व स्थूल भूते आणि त्यांच्यापासून उत्पन्न झालेला देह सत्त्व, रज व तम ह्या तीन गुणांपासून निर्माण झाला आहे. सतत परिणाम (बदल) पावणे हा गुणांचा प्रकृतिधर्म आहे म्हणून त्यांच्यापासून निर्माण झालेला देहही प्रतिक्षणास परिणाम पावत जाऊन वृद्ध होत असतो. सांख्यदर्शनात मांडला गेलेला हा सिद्धांत थोड्या-फार फरकाने इतर दर्शनांनीही प्रमाण मानला आहे. पातंजलीच्या योगसूत्रात विवेचनात्मक अशी काही सूत्रे ( उदा. पहा योगसूत्र २.१५, ३.१५ ) या सिद्धांतावर आधारित आहेत व व्यासकृत योगभाष्यात त्यांचे उत्तम विवरण केलेले आहे. खालील विवेचन प्रायः त्यावरच आधारित आहे.

वस्तुमात्रात किंवा प्राणिमात्रात अनंत धर्म (गुण) अव्यक्त किंवा व्यक्त दशेत उपस्थित असतात. अव्यक्तावस्थेतून एकेक धर्म व्यक्त होणे व त्याने आपले कार्य उरकून कृतकार्य झाल्यावर पुन्हा अव्यक्तात लीन होणे आणि त्याची जागा दुसऱ्या एखाद्या धर्माने प्रकट होण्यासाठी घेणे हा क्रम प्राणिमात्रात अखंड चालू असतो. ह्याच प्रक्रियेला योगशास्त्रात परिणाम पावणे ही पारिभाषिक संज्ञा आहे. या परिणामप्रक्रियेचे स्थूलमानाने धर्मपरिणाम, अवस्थापरिणाम व व लक्षणपरिणाम असे तीन पोटभेद पातंजलीने स्पष्ट केले आहेत. प्रतिक्षणी घडून येणाऱ्या परिणामप्रवाहात जेव्हा तुल्यत्व असते ( म्हणजे या क्षणी अस्तित्वात असलेल्या अवस्थेला सादृश्य अशी अवस्था परिणामप्रक्रिया चालू असतानाही काही काळ टिकून राहणे) तेव्हा त्या परिणामप्रवाहाला 'ही अमुक एक अवस्थेने युक्त असलेली अमुक एक वस्तू किंवा व्यक्ती' असे म्हणण्यात येते. माणसाचे आयुष्य, नदीचा वाहता प्रवाह किंवा दिव्याची जळती ज्योत ही तुल्यपरिणामप्रवाहाची काही उदाहरणे म्हणून देता येतील. उदा. दिव्याच्या ज्योतीत प्रत्येक क्षणी नवीन तेजःकण निर्माण होत असूनही एकमेकांशी तुल्य असणाऱ्या या तेजःकिरणांच्या अखंड प्रवाहामुळे दिव्याच्या ज्योतीच्या अस्तित्वाची व तिच्या जळत्या अवस्थेची प्रचीती येते.

पूर्वीचा काही एक धर्म (उदा. बाल्य) दुबळा होत जाऊन त्याच्या जागी नवीन धर्म (उदा. तारुण्य) प्रकट होणे हा देहाचा धर्मपरिणाम होय. हा बदल (परिणाम) होत असताना धर्मीचा (म्हणजे देहाचा) अन्वय, अनुबंध त्या दोन्हीही धर्मांशी राहतो. कारण धर्म नेहमी धर्मीवरच दृग्गोचर, भासमान होत असतो. कालाला अनुसरून धर्म तीन प्रकारे अस्तित्वात येतात. धर्म ( उदा. वार्धक्य जेव्हा देहात संभाव्य शक्तिरूपाने ( potential ) राहतो तेव्हा त्याला 'अनागत' लक्षणाने युक्त असलेला धर्म अशी संज्ञा आहे. (आगत म्हणजे आज व्यक्त दशेला असलेला, असा जो नव्हे तो अनागत.) देश, आयुमान इत्यादी बाह्य उद्बोधक, प्रवर्तक कारणे आणि देहातच असलेली धर्म व्यक्त दशेला आणू शकणारी कालरूप क्रियाशक्ती ह्या दोघांच्या संयोगाने त्या अनागत धर्मातून बाह्य उद्बोधक सामग्रीशी ज्याचा मेळ बसू शकेल असे दुसरे धर्म क्रमाने व्यक्त दशेला येतात व तेव्हा त्यांना 'वर्तमान' ह्या लक्षणाने युक्त असलेले धर्म म्हणतात. त्यांचे जे कार्य घडून यावयाचे ते झाल्यावर हे धर्म कृतकार्य होऊन 'अतीत' लक्षणाने युक्त अशा अवस्थेप्रत जातात. अशा रीतीने देहात अनागत (भविष्य) ते आगत (वर्तमान) ते अतीत (भूत) अशा त्रिविध कालजन्य धर्मपरिणामाचा प्रवास सतत चालू असतो.

नवजात अर्भकात बाल्य, तारुण्य, प्रौढावस्था व वार्धक्य इत्यादी धर्म 'अनागत' लक्षणाने उपस्थित असतात अन्न, पाणी, ऊब, मातापित्यांचे प्रेम इत्यादी बाह्य, उद्बोधक प्रेरणा त्या अर्भकाला मिळताच त्याच्यातील कालरूप क्रियाशक्ती व इच्छाशक्ती यांच्या जोरावर ते अर्भक आयुष्याच्या वेगवेगळ्या अवस्थांतून स्थित्यंतर करते. सुरुवातीला बाल्यावस्थेत तुल्यप्रवाह काही काळ टिकल्यामुळे अवस्थांतर होत नाही; पण कालशक्तीच्या ओघात ही तुल्यता मोडून बाल्यत्व संपुष्टात येते व अनुक्रमे तारुण्य इत्यादी नवीन जीवनावस्था येतात व अतीतावस्थेत विलीन होतात. म्हणजेच क्रमाक्रमाने बाल्य ते वार्धक्य इत्यादी धर्मांचा अभिभाव व प्रादुर्भाव शरीरात होणे या प्रक्रियेला वर म्हटल्याप्रमाणे धर्मपरिणाम ही संज्ञा आहे. पूर्वधर्म व त्याची अंतर्बाह्य चिन्हे, लक्षणे यांचा पूर्णतया क्षय होऊन उत्तरधर्म व त्याच्याशी संलग्न असणारी चिन्हे व लक्षणे यांचा उदय होणे हा लक्षणपरिणाम होय. (उदा. तारुण्यावस्थेतील कामवासना, चंचल व अस्थिर मनोवृत्ती, सौंदर्य, पीळदार शरीरयष्टी इत्यादी लक्षणांचा अभिभाव लोप होऊन शांतवृत्ती, कारुण्यता, शिथिल गात्रे, पांढरे केस इत्यादी वार्धक्यलक्षणांचा प्रादुर्भाव होणे) आणि वर निर्देश केल्याप्रमाणे एकच तुल्यपरिणामप्रवाह काही काळ टिकून राहणे याला अवस्थापरिणाम म्हणतात.

## स्मृतिकारप्रणीत आश्रमव्यवस्था

परिणामप्रक्रियेबरोबर बदलत जाणारे देहधर्म. लक्षणे आणि मनोवृत्ती यांना अनुसरून मानवी जीवनाच्या चार नैसर्गिक अवस्था (बाल्य, तारुण्य इत्यादी) कशा होतात हे वर पाहिले. या प्रत्येक अवस्थेत मनुष्याच्या निसर्ग व कालानुरूप अशा विशिष्ट मागण्या, अपेक्षा असतात असे प्रतिपादन करून मनु, याज्ञवल्क्य, बृहस्पती, नारद इत्यादी ३६ प्रमुख स्मृतिकारांनी आपापल्या स्मृतिग्रंथांतून, चतुराश्रमपद्धतीचा पुरस्कार केला. यासाठी ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम असे चार, प्रत्येकी पंचवीस वर्षांचा

कालावधी असणारे चार आश्रम त्यांनी कल्पिले. या आश्रमांतून जीवनाची यात्रा करीत असताना धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ विद्यार्थी, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यासी या चार भूमिकांद्वारा (social roles) पुरुषाने आत्मसात करावयाचे आहेत. प्रत्येक आश्रम काही विशिष्ट पुरुषार्थ व त्यांनी प्रतीत होणारे जीवनधर्म व जीवनमूल्ये यांचा मानदंड म्हणन समजण्यात आला आहे ही मूल्ये व धर्म यांना अनुरूप असे आचारविचार प्रत्येकाने आपल्या वयोमानानुसार पाळावयाचे असतात. त्या संदर्भात आहार, विहार, कामवासना, वस्त्रभूषण, केशभूषा, निवासस्थान इत्यादी विविध गोष्टींबद्दल पाळावयाचे नियम तपशीलवार व काटेकोरपणे वरील संहितांतून बसविण्यात आलेले आहेत. वयाबरोबर फुलत जाणाऱ्या वैयक्तिक भावना व विचार यांचा सामूहिक जीवनाशी मेळ घालण्यासाठी विद्यार्थी इत्यादी आदर्श भूमिका अशा तऱ्हेच्या अधिक्रमाने (hierarchy) रचल्या आहेत की, जेणेकरून पुढील भूमिकेत मागील भूमिका सहजगत्या विलीन पावून संस्काररूपाने उपस्थित रहावी. तसेच पुढील भूमिकेत पाळावयाचे धर्म व मूल्ये यांची तोंडओळख (व जेथे आवश्यकता भासेल तेथे रंगीत तालीम) आधीची भूमिका पार पाडत असतानाच करून घेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. उदा. वानप्रस्थाने धरावयाच्या ब्रह्मचर्य, अरण्यवास आदि व्रतांची कल्पना, ओळख विद्यार्थीदशेतच करून द्यायची आहे. गुरुकुलातील वास्तव्यात त्याबरोबरच प्रीती, अपत्यप्रेम, कुटुंबवत्सलता, मातापिता-वृद्ध-गुरुजन इत्यादींबद्दल आदर, बंधुप्रेम आदि भावना व्यक्त करण्याची संधी देण्यात आली आहे, जी पुढील गृहस्थाश्रमात उपयुक्त ठरावी. ब्रह्मचर्यावस्थेशी सुसंगत व त्याची पुढची पायरी म्हणून गृहस्थजीवन यावे अशी स्मृतिकारांची अपेक्षा होती. त्याचे पालन केल्याशिवाय, संतानप्राप्ती झाल्याखेरीज मानवी जीवनाचे सार्थक नाही, मोक्षाकडे वळण्याचा अधिकार नाही. या व्यवस्थेमागे एकंदर जीवनयात्रेत प्रवृत्ती व निवृत्ती यांना सारखे स्थान मिळून जीवनात लयबद्धता व एकसूत्रीपणा यावा, जीवनाच्या सर्व अंगांचा व अवस्थांचा समतोल उपभोग कर्तव्यबुद्धीने व धर्मनिष्ठा म्हणून घेता यावा हा हेतू होता.

वरील विवेचनावरून वैदिक व बौद्ध या परस्परविरुद्ध जीवनप्रणालींचा समन्वय साधण्याचा आश्रमव्यवस्थेचा उद्देश लक्षात येतो; पण आबालवृद्धांचे हितसंबंध जपणाऱ्या, ऐहिक उपभोग व पारलौकिक कल्याण यांना सारखेच स्थान देणाऱ्या आश्रमव्यवस्थेचा पुरस्कार करताना स्मृतिकार बौद्धमताचे सरसकट खंडण करीत नाहीत किंवा वैदिक विधींचे धोपटमार्गाने अंधानुकरणही करीत नाहीत. अर्थ व काम यापेक्षा मोक्ष-निर्वाण श्रेष्ठ आहे हे बुद्धाचे प्रतिपादन त्यांनी मान्य केले; पण म्हणून सर्व संसारच दुःखमय व कष्टमय आहे ही त्याची भूमिका त्यांनी नाकारली. बौद्धमताने प्रभावित होऊन त्यांनी गुरुकुलात किंवा ऋषिमुनींच्या आश्रमात विद्यार्थीभूमिका पार पाडण्यात रत असलेल्या कुमाराला तापसव्रत घेऊन एकदम संन्यासाश्रमात शिरण्याची सवलत दिली; परंतु बहुतेक स्नातक गुरूच्या आशीर्वादाने व प्रेरणेने गृहस्थधर्माचाच स्वीकार करीत. तेव्हा स्मृतिकारांनी योजिलेल्या समन्वय-प्रक्रियेत अगतिकता नसून एका ध्येयवादी, आदर्शानुगामी वृत्तीचा पुरस्कार आहे हे विधान सयुक्तिक वाटते. (पहा : कालिदासदर्शन, गो. के. भट, पृ. ७७.)

## रघुवंश आणि आश्रमव्यवस्था

मानवी जीवन व संसार यांचा स्थायीभाव जरामय दुःख आहे या बुद्धाच्या निदानामुळे विरक्त, संन्यस्त वृत्तीने तत्कालीन समाजात जो जोर धरला त्याचे प्रतिबिंब अश्वघोषाच्या महाकाव्यात पडलेले दिसते. याउलट आश्रमव्यवस्थेवर आधारित अशा आदर्श समाजजीवनाचे प्रभावी चित्रण कालिदासाच्या साहित्यातून, विशेषतः रघुवंशातून केलेले आढळते. रघुवंश हे विदग्ध महाकाव्य बुद्धोत्तर, गुप्तकालीन भारतीय संस्कृतीचे काव्यमय रूपांतर आहे. त्यामुळे तत्कालीन वर्णाश्रमव्यवस्था, सहा दर्शने, चौसष्ट कला व विद्या, नवरस भक्ती, वैराग्य आदींच्या उल्लेखांनी व तपोवने, मुनींचे आश्रम, उपवने यांच्या वर्णनांनी रघुवंश अगदी गजबजून गेला आहे. (पहा— वाटवे, पृ. १५२) जणू काही तत्कालीन भारतीय मनच कवीच्या मुखावाटे बोलत आहे. रघुवंशात स्मृतिसंस्कृतीचे नुसते कोरडे निदर्शन नाही. त्या संस्कृतीवर दृढ विश्वास ठेवणाऱ्या राजांचे व प्रजेचे चित्रण त्यात आहे. राजा व प्रजा, पितापुत्र, तरुण व प्रौढ इत्यादि परिणत समाजात नेहमी आढळून येणाऱ्या विविध संबंधांचे वर्णन रघुवंशात येते. ते वाचून ह्या संबंधांतून सूचित केलेली तत्त्वे वाचकांच्या लक्षात येतात व त्या तत्त्वांच्या द्वारे सुचविलेल्या योग्य व आदर्श आचरणाच्या स्मृतिकारांना अभिप्रेत असलेल्या दिशा कोणत्या हे ओळखण्यास मदत होते. उदा. गुरुजननिरत व निर्लोभी ब्रह्मचर्याश्रमी विद्यार्थ्याची भूमिका रघुवंशात कौत्स या स्नातकाच्या द्वारे रंगविण्यात आली आहे. गृहस्थजीवनाचे चित्र त्यातील पत्नीप्रेम व अपत्यस्नेह यांच्या उत्कटतेसह राजा दिलीपाच्या संदर्भात रेखाटले गेले आहे. तसेच वानप्रस्थांचे तपस्यानिरत जीवनही वृद्ध रघूच्या स्वरूपात सादर करण्यात आले आहे. अशा प्रकारे जीवनाच्या प्रवृत्तिप्रधान व निवृत्तिप्रधान या दोन्ही प्रकारच्या अवस्थांचा उत्कट अनुभव आणि आनंद वाचकांना मिळवून देणे हे कालिदासाच्या रघुवंशाचे विशेष रूप आहे.

सौंदरनंदमधील भिक्षूप्रमाणे रघुवंशातील वसिष्ठऋषी प्रौढ स्त्री-पुरुषसंबंधांना तुच्छ किंवा हीन लेखत नाहीत. कालिदासाला अभिप्रेत असलेल्या प्रेमाची व्याप्ती मानवी जीवनापुरतीच मर्यादित नाही. वस्तुतः सर्व निसर्ग आणि जीवनसृष्टीच कालिदासाच्या साहित्यात प्रीतीच्या धाग्याने बांधली गेली आहे. म्हणूनच मेघाचा विजेपासूनचा वियोग त्याच्या यज्ञाला मान्य नाही; शकुंतला वनज्योत्स्नेचे लग्न सहकाराशी (आम्रवृक्षाशी) लावून देते; पण यक्ष जरी चिरतरुण असला तरी सर्वसामान्य माणसाच्या जीवनात यौवन एकदाच येते आणि काही काळच टिकते. एकदा गेले की ते पुन्हा परत येत नाही. (...'न पुनरेति गतं चतुरं वयं '...रघु. ९.४७) सौंदरनंदात भिक्षु नंदाला हेच आदितत्त्व विशद करतो. (...'द्रुतं हि गच्छति अनिवर्ति यौवनं '...सौं ९.२७) आणि त्याला सुंदरीकडे परत जाण्याच्या विचारापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो; पण कालिदास या तत्त्वाचा बरोबर विरुद्ध अर्थ लावतो. यौवनाची एक विशिष्ट मागणी, गरज आहे ती पुरी करणे यातच महान पुरुषार्थ आहे; पण म्हणून अनिर्बंध विषयोपभोग कालिदासाला संमत नाही. यौवन किंवा सत्ता म्हणजे उपभोगाचा खुला परवाना नव्हे. तसल्या वागण्यामुळे ओढवणाऱ्या अनर्थाचे विदारक चित्र रघुवंशाच्या एकोणिसाव्या सर्गात, अग्निवर्ण राजाच्या वर्तनात काढले आहे. भोगाला जीवनात स्थान

आहे; पण ते गृहस्थाश्रमात आणि तेव्हाही गृहस्थ संयमाच्या अंकित असला पाहिजे. मात्र संयमाचा अर्थ अव्हेर नाही. अप्सरांच्या मोहाला बळी पडलेला राजा शातकर्णी व दांतचरित्र (संयमी जीवन जगणारा) असलेला तपस्वी सुतीष्ण यांची विरोधी व्यक्तिचित्रे शेजारी शेजारी मांडून कालिदास संयम व इंद्रियनिग्रह यांचे महत्त्व सूचित करतो. ( रघु. १३.३८–४४ )

वृद्धजन व तरुण यांच्यामधील संबंधांचे स्वरूप दर्शविताना वैदिक व बौद्ध विचारसरणी परस्परविरुद्ध मते कशी मांडतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे तरुण गौतम व वृद्ध रघु यांचे तपोवनप्रवेशाचे अनुक्रमे अश्वघोष व कालिदास यांनी रंगविलेले प्रसंग होय. बुद्धचरितात गौतमाने अरण्यात जाण्याचा आपला मनोदय व्यक्त केल्यावर त्याचे अनुक्रमे राजा शुद्धोधन, त्याचा मंत्री उदायि, पुरोहित, सारथी छंदक व अराडमुनी या सर्व वृद्ध मंडळींशी वादविवाद होतात. सर्वांचा मुद्दा एकच असतो: गौतमाने तारुण्यात अरण्यप्रवेश करू नये; पण गौतम कोणाचेच न ऐकता त्यांचा विरोध पत्करून व वृद्ध पित्याला दुःखाच्या खाईत लोटून वनात निघून जातो. याउलट वृद्ध रघूच्या निर्णयाने त्याचा पुत्र अज याला अपरिमित दुःख होते. पित्याच्या पायांवर डोके ठेवून अज त्याला वनात आताच जाऊ नका अशी विनंती करतो. रघूही त्याच्या विनंतीला मान देऊन काही काळ नगराबाहेरच वानप्रस्थ बनून राहतो.

वृद्ध रघु व प्रौढ अज हे दोघे अनुक्रमे वानप्रस्थव्रत व गृहस्थव्रत कसे पाळत होते याचे जोडीजोडीने पण विरोधात्मक वर्णन रघुवंशाच्या आठव्या सर्गात येते. वृद्ध पिढी व तरुण पिढी यांमधील संबंध आनंददायक व कल्याणदायक कसे होते वा असावेत याचे कालिदासाने रंगविलेले हे चित्र मोठे काव्यमय व आल्हाददायक वाटते. उदा. दोघांनीही आपल्या व्रतपालनाच्या संदर्भात योग्य असे सहकारी गोळा केले. वृद्ध रघूने आप्त मंडळी ( धार्मिक व अध्यात्मिक बाबतीत सल्ला देऊ शकणारे ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध ) तर अजाने राजनीतिविशारद मंत्री. आपापली कर्तव्ये पार पाडण्यासाठी दोघेही आसनस्थ झाले. रघूने कुशासन घेतले तर अजाने व्यवहारासन ! ( रघु. ८.१८ ) दोघांनीही आपापल्या विशिष्ट शत्रूंचा बीमोड करण्यासाठी बळ व दमनचक्र वापरले. रघूने समाधिबळ व समत्वबळ ( लोखंड व सोने यांना सारखेच लेखणारी वृत्ती. ) तर अजाने स्वामित्वबळ ( साम–दाम–दंड–भेद यांचा उपयोग. ) वानप्रस्थाश्रमी रघु स्थिरमति झाला तर गृहस्थाश्रमी अज स्थिरकर्मा बनला. 'धीमेपणाने काम करणारा नवा राजा अज आपल्या कर्माची फलसिद्धी होईपर्यंत निवृत्त होत नसे; तर रघु स्थितप्रज्ञ होत्साता परमात्मसाक्षात्कार होईपर्यंत योगाभ्यासापासून निवृत्त झाला नाही. ( रघु ८.२३ ) अशा प्रकारे शत्रूंच्या व इंद्रियांच्या आक्रमणाला आळा घालून अज व रघु हे दोघे अभ्युदय ( गृहस्थाश्रमाचे मूल्य ध्येय व ध्यानसिद्धि मिळविते झाले ! ( रघु. ८.२३ )

यौवनात सुखोपभोग घेऊन गृहस्थाश्रमाची कर्तव्ये पूर्णतया पार पाडल्यावर संसारातून हळूहळू निवृत्त होत वार्धक्यात वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार करावा आणि तपस्या व योगसाधना यांच्याद्वारे ईश्वरस्वरूपाचे ज्ञान संपादन करून अंती देह ठेवताना ईशरूपात मिळून जावे ही स्मार्त (स्मृतिप्रणीत) विचारसरणी रघुवंशाप्रमाणेच कालिदासाने त्याच्या इतर कृतींतूनही मांडली आहे. (उदा. शाकुंतल ४.२०, ७.२०.) गुणवान अशा आपल्या मुलांवर संसारातील कमाई आणि पुण्याई सोपवून, उतारवयात (वार्धक्ये) दिलीपवंशातील राजे प्रयत होऊन, स्वेच्छा (बळजबरीने नव्हे) यमनियमादि व्रतांनी युक्त होऊन वल्कले धारण करणाऱ्या महंताचा मार्ग स्वीकारीत. मोक्षमार्ग स्वीकारणे म्हणजे भरल्या संसारावर पाणी ओतून निघून जाण्याचा मार्ग नव्हे; प्रवृत्ती आडदांडपणे नष्ट करण्याचा मार्ग नव्हे. प्रवृत्तीचे स्वाभाविक, नैसर्गिक कार्य संपादन करून मगच शाश्वत सुखसंपादनाचा (म्हणजे निवृत्तीचा) मार्ग स्वीकारणे हा खरा आश्रमधर्म कालिदास मानतो. (पहा : कालिदासाची सृष्टि: मा. दा. अळतेकर, मुंबई, १९३७, पृ. २५८ ) शकुंतला भरतावरोबर घरी जाण्यासाठी निघते तेव्हा ती कण्वाला मी या आश्रमात पुन्हा केव्हा येईन असे विचारते. उत्तरादाखल कण्व म्हणतो, " भूत्वा चिराय... पुनराश्रमेऽस्मिन्... " पतीबरोबर पुष्कळ दिवस राज्याचा उपभोग घेऊन, पराक्रमी पुत्राला राज्यावर बसवून मग आपल्या वृद्ध पतीबरोबर या आश्रमात तू पुन्हा (वानप्रस्थव्रतपालनासाठी) येशील. बरोबर याच्या उलट अवस्था बुद्ध व नंद यांच्या पत्नींची होते.

आश्रमधर्म व्यवस्थितपणे पार पाडणाऱ्या रघुवंशातील मुलेबाळे, प्रौढ स्त्रीपुरुष व वृद्ध यांना परस्परांबद्दल हेवा, मत्सर, द्वेष वाटण्याचे प्रसंग येत नाहीत ते एकमेकांकडे तिरस्काराने उपहासाने पहात नाहीत(उदा.अजाने इंदुमतीसाठी (रघु. सर्ग ८) व सुंदरीने नंदासाठी (सौंदरनंद स. ६) केलेला विलाप यांतील परस्परविरोध). कालिदासाचे प्रौढ स्त्रीपुरुष प्रेमाने, आदराने बालतरुणांचे मार्गदर्शन करतात. मुलांनी आपल्याहून मोठे व्हावे यातच त्यांना आपल्या वडीलपणाचे सार्थक वाटते. कालिदासाच्या काव्यात वृद्धांचे पुनर्विवाह नाहीत मुलाबाळांच्या संसारात ते अडचण बनून रहात नाहीत. वृद्धांना शोभेल असे धर्म, भूमिका तरुणांनी आचरणात आणाव्या असा अट्टाहास, दुराग्रह नाही. त्यामुळे नवीन व जुनी पिढी यांच्यात तणाव नाही, वितुष्ट नाही. याउलट बुध्द व नंद यांचे जीवन संघर्षात्मक आहे. पितापुत्र, पतिपत्नी, भाऊभाऊ (बुध्द व नंद आतेमामेभाऊ होते.) यांच्यात चर्चा होऊन मग दोघांच्या संमतीने किंवा दोघांनाही पसंत पडतील असे निर्णय घेण्यात आल्याची नोंद नाही.

बुध्दचरित, सौन्दरनन्द व रघुवंश या तीन विदग्ध महाकाव्यांच्या अभ्यासावरून असे म्हणता येईल की, भारतीय संस्कृती व परंपरा यांनी वार्धक्य व वृध्दजीवन यावर व्यक्त केलेले विचार आधुनिक भारतीय वार्धक्यशास्त्राचा पाया घालण्याच्या संदर्भात उपयुक्त ठरतील. म्हणून वैद्यकीय संशोधनाबरोबरच भारतीय सांस्कृतिक दृष्टिकोनातून वार्धक्य व इतर संलग्न विषयांवर अधिक व्यापक संशोधन व अभ्यास होणे आवश्यक आहे. सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे भारतातील वृध्द स्त्रीपुरुषांपुढे आज नवनवीन समस्या उभ्या रहात आहेत. त्या सोडविण्याच्या संदर्भात कोणत्या तत्त्वांना, मुद्द्यांना प्राधान्य द्यावे, कोणते निकष लावावे, समाजातील वेगवेगळ्या घटकांची याबाबतीत काय भूमिका, जबाबदाऱ्या असाव्या वगैरे प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या संदर्भात वरील अभ्यास उपयुक्त ठरू शकेल. समन्वयाच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीवर निर्माण करण्यात आलेल्या चतुराश्रमव्यवस्थेचा अभ्यास संस्कृती व वार्धक्य यांचा संबंध काय, एखाद्या संस्कृतीत ऐहिक व पारमार्थिक मूल्ये कोणती असतात आणि ती संस्कृतीत पवित्र का मानली जातात, कालानुसार माणसाच्या मनोवृत्तीत कोणते बदल कसे घडून येतात वगैरे प्रश्नांवर महत्त्वाची व उपयुक्त मानसशास्त्रीय माहिती प्राप्त करून देऊ शकेल. भ्रष्ट स्वरूपात का होईना, आज बहुसंख्य भारतीय आश्रमव्यवस्थेशी परिचित आहेत. तिच्यातील नेमकी कोणती तत्त्वे आजच्या संक्रमणशील परिस्थितीत उपयोगी ठरतील हा एक स्वतंत्र अभ्यासाचा भाग होईल; पण आश्रमव्यवस्थेमागील काही तत्त्वे इतकी चिरंतन स्वरूपाची आहेत की ती सांप्रत काळीही काही प्रमाणात मार्गदर्शक ठरावीत इतकेच प्रतिपादन करण्याचा प्रस्तुत लेखाचा उद्देश आहे. □

(या लेखासंबंधीचे संशोधन 'शास्त्री इंडो–कॅनेडियन इन्स्टिटयूट, नवी दिल्ली, यांच्या सहकार्याने शक्य झाले. )

पुस्तके

# ' उलगाउलग ' निमित्ताने

श्रीपाद जोशी, सुमारे दीडशे प्रकाशित पुस्तकांचे लेखक. प्रवासवर्णन, कथा–कादंबरी–काव्य, आणि त्यांतून विचार चिंतनही मुबलक प्रमाणात करणारे एक सुप्रसिद्ध विचारवंत. त्यामुळे त्यांचे आत्मचरित्र केवळ वाचनीय नव्हे तर पुष्कळसे उद्‌बोधक झाले आहे हे प्रारंभीच नमूद केले पाहिजे. प्रकाशकांनी ध्यानात घेतलेला ' श्रीपाद जोशींच्या लेखणीला लाभलेला अभयाचा साक्षात्कार ' आणि स्वत: लेखकांनी 'भूमिका' मांडताना पुस्तकाच्या नावाबद्दल ' उलपा (शिधा)' ऐवजी 'उलगा–उलग' म्हणजे 'आवरा आवरी' बरोबर 'उलगडा' हा व्यक्त केलेला ध्वन्यर्थ, या आत्मचरित्रातून स्पष्ट झाल्यावाचून रहात नाही.

'उलगा–उलग' हे एक नितांत प्रांजळ लेखन आहे. ही प्रांजळता ठायी ठायी दिसते. मोहवते. लेखकाबद्दल आदर दुणावतो. 'सामान्य पांढरपेशा' वा त्यांनीच शब्द वापरलेल्या 'भटा–ब्राह्मणाच्या' जीवनात 'सामाजिक विषमता', 'स्वातंत्र्यलढा', 'संघ वा आसाम आंदोलनासारख्या चळवळी', 'कांग्रेस–सर्वोदय–समाजवादी विचारसरणी' आणि 'कुटुंब परिवारातले विविध व्यक्तिदर्शन' अशा विविध पैलूंनी किती समृद्धी निर्माण केली, याचा येणारा प्रत्यय ही या लेखनांतली विशेष खुमारी आहे.

## समता–विषमता : १९२०

दोन तीन उल्लेख अवश्य करावेसे वाटतात. विशिष्ट कालखंडाच यथार्थरूप समजून घेण्यास आत्मचरित्र उपयुक्त असते, हे लेखकाचे म्हणणे निश्चितच वास्तव वाटते. १९२० ते ३१ कालातला मृतपशूचं मांस खाण्याचा मुद्दा पहा. आजच्या मूल्यांच्या संदर्भात जुन्या रीतिरिवाजाबद्दल राग येणार. पण हे वर्णन पहा–

' महारानं प्रेतवस्त्र घ्यायचं, परटानं मृतव्यक्तीचं अंथरुण पांघरुण घ्यायचं आणि भटानं बाराव्याला जेवायचं, यात कुणालाच काही वाटत नव्हतं. बाराव्याला जेवणारा आणि अंत्यक्रिया करणारा भट इतर ब्राह्मणांच्या दृष्टीनं जवळ जवळ अस्पृश्य समजला जाई. महार किंवा परीट यांना असल्या अपमानाला तोंड द्यावं लागत नव्हतं. महाराला पायलीभर जोंधळं मिळवण्यासाठी मणभर लाकडं फोडावी लागत तर भटाला पसाभर तांदुळ मिळवण्यासाठी दोन–चार कोस पायपीट करावी लागे. सारांश, सर्वांनाच घाम गाळावा लागत होता; परंतु ते करीत असताना आपल्यावर कुणी अन्यायानं हे जीवन लादलंय अशी भावना निर्माण होत नव्हती. किंबहुना अशी भावना नसल्यामुळंच आजच्या संकल्पनेप्रमाणं विषमतापूर्ण असणारी समाजव्यवस्था हजारो वर्ष टिकून राहिली होती. '

अर्थात हे लिहिणारा लेखक बालकाळापासून अस्पृश्यता न मानणारा, साफसफाईची सर्व प्रकारची कामे सहजतेने करणारा आणि सामाजिक समतेच्या तत्त्वाची निकड जाणणारा आहे. त्यामुळे अशा विचार चिंतनाचं मूल्य अधिक वाढतं. द्वेष वा संघर्षनिर्मिती ऐवजी प्रत्यक्ष समस्येचे निराकरण यातून नीट होऊ शकते हे ध्यानात आणून देणारे अनेक प्रसंग या आत्मचरित्रात आहेत.

## कौटुंबिक–पारिवारिक

साहित्यिक व राजकीय–सामाजिक स्वरूपाच्या कामात सहभागी असूनही श्रीपादजींच्या जीवनांतील कौटुंबिक वातावरणाचा अभाव, हाही या आत्मचरित्रातला एक विशेष. हे पुस्तक पत्नीलाच अर्पण करण्याची त्यांच्या मित्राने केलेली सूचना त्यांना भावली, मानवली ही बहुधा त्यामुळेच. आजोबा, आजी, वडील, चुलते, आई, पत्नी, बहीण आणि मुले–सुना अशा सर्वांबद्दलचे त्यांचे लिखाण आस्था अन् जिव्हाळ्याने भरलेले आहे. त्यांतील मनमोकळेपणाची एक वेगळीच लज्जत आहे. अनेक वाचकांना आपापल्या परिवारांत घडत असलेल्या घटनांशी वा प्रसंगी झालेल्या आचरणाशी स्वाभाविक संगती–विसंगती लावण्यास त्यांचा उपयोग होणारच.

थोडेसे आश्चर्य वाटावे इतका मोकळेपणा त्यांच्या आईच्या स्वभावदर्शनातील मजकुरात आहे. तर मुले–सुना–पत्नी यांच्यासंबंधी सर्वसाधारणपणे थोडयाफार फरकाने; पण समान भावभावनांचा अनुभव वाटतो. आपल्या आईच्या जीवनात ओढवलेल्या, वैधव्यावर लेखकांचे मामा श्री. गुळवणीमहाराज यांचा मार्गदर्शक अभिप्राय आला आहे. आताच आयुष्याचा शेवट केला तर वैधव्याचा आलेला भोग पुरा करण्यासाठी पुढच्या जन्मी तो वाट्याला येणार, अशा आशयाचा सोप्या शब्दातला युक्तिवाद जीव घेण्याचा विचार सोडून देण्यासाठी प्रभावी ठरलेला. सण, उत्सव, लोकभ्रम इ. भागही अतिशय रंजक तर आहेच पण विचार करायला लावणाराही आहे.

## १९४२....

महात्मा गांधीजींचा सहवास, काकासाहेब कालेलकरांचे स्थान, गांधीवादी कार्यकर्ते व त्या काळातील उपक्रम हा श्रीपादजींच्या जीवनातल्या रसरशीत उमेदीचा कालखंड. उर्दूचा अभ्यास, हिंदी लेखन, प्रवास यासंबंधी मर्यादित उल्लेख; पण पारिवारिक व कौटुंबिक व्यक्तिप्रसंगांना भरपूर माप असे या आत्मचरित्रात वाटले तरी ते एक प्रकारे समर्थनीय वाटते. कारण सुमारे दीडशे पुस्तकांतून जे साहित्य प्रकाशित झाले त्याची विनाकारण पुनरावृत्ती वाटली असती. त्यामूळ वाङ्मयाच्या वाचनाची इच्छा या मर्यादित निर्देशाने अवश्य निर्माण होते.

महात्माजींशी प्रश्नोत्तररूपी झालेला पत्रव्यवहार हा या पुस्तकातला एक महत्त्वपूर्ण भाग आहे. मुद्दाम टिपण करावे, लक्षात ठेवावे, प्रसत होऊन त्यावर चिंतन व्हावे

सा एक मुद्दा तर मौलिक आहे. बुनियादी स्वरूपाचा. तो म्हणजे १९४२ च्या चळवळीचा.

१९४२ ची चळवळ काँग्रेसची नव्हती असे म. गांधींचे स्पष्ट म्हणणे असल्याने श्रीपादजींनी विचारलेला प्रश्न व त्यावरचे उत्तर नीट सखोल विचार करायला लावणारे आहे.

प्रश्न : १९४२ ची चळवळ काँग्रेसची नव्हती तर मग ती होती तरी कुणाची? नियमाप्रमाणे तरी ती कांग्रेस कार्यकारिणीने अथवा अ. भा. कांग्रेस समितीने सुरू केलेली नसली तरी ती करणाऱ्यांपैकी ८०–९० टक्के कांग्रेसवालेच होते. म्हणून माझे असे मत आहे की, नैतिकदृष्ट्या आपण ती जबाबदारी टाळू शकत नाही. याबाबतीत आपले मत काय?

यावर म. गांधींनी परामर्श घेणारे पत्र लिहिले. त्यात–'ही चळवळ कांग्रेस-वाल्यांनीदेखील केलेली असली तरी ती काही कांग्रेसची नव्हती. याचा पुरावा म्हणजे ता. ७ व ८ ऑगस्टची भाषणे आणि ठराव. चळवळ मीच सुरू करू शकत होतो आणि मी तर ती सुरूच केली नाही. भ्रम उत्पन्न झाला हे खरे; परंतु म्हणून काय झाले? मौ. अबुल कलम काय म्हणतात ते पहा. 'तुरुंगभरती करण्यास मनाई नव्हती; परंतु हिंसा करण्यास मनाई होती.' असा मजकूर आहे.

यातून जो मौलिक प्रश्न निर्माण होतो तो असा की, कांग्रेस चळवळ, हा जर त्या काळांतला भारतातला राजकीय मुख्य प्रवाह मानला गेला असेल तर १९४२ ची चळवळ, चळवळ म्हणजे काय? किती ठिकाणी आणि प्रत्यक्ष काय घडले? वृत्तपत्रांतल्या प्रसिद्ध झालेल्या घटना वा काही मराठी साहित्यांतून, कथा–कादंबऱ्यांद्वारे त्यांचा केलेला वापर हा कोणत्या प्रवाहाचे गमक मानायचा? आणि अशा खंडित प्रवाहाच्या एखाद्या लहानशा तळ्याने, राष्ट्रीयत्वाच्या विशाल प्रवाहाची वाटचाल करणाऱ्या रा. स्व. संघाला सहभागी का झाला नाही असे उच्चरवाने विचारत रहाणे किती हास्यास्पद?

अशा प्रकारच्या चिंतनातून भारताचा खरा मुख्य प्रवाह कोणता या विषयाकडे लक्ष वेधले गेले तर श्रीपाद जोशींच्यासारख्या विचारवंत लेखकाने लिहिलेल्या 'उलगा–उलग'चे एक यश मानता येईल.

### आत्मचिंतन

'माझी कैफियत' या प्रकरणातले प्रसंग व चिंतन हा या पुस्तकातला बहुमोल भाग आहे. .

आपण केलेलं मूल्यमापन एकांगी वा पूर्वग्रहयुक्त असण्याचा आणि इतरांनी समजून घेतले नाही; पण आपण तरी इतरांना समजून घेण्याचा प्रयत्न केला का, असे समोर, स्वतःच्या मुलीने परखडपणे म्हटलेले ऐकताना होणारी सुन्नता विलक्षण रंगली आहे.

वगळलेला भाग, कर्म आणि काम, तमाशा व कीर्तन यातली स्वतंत्रता सांभाळून भेसळ न करण्याची आणि श्रेष्ठ वा कनिष्ठ अशा वादात न पडण्याची त्यांची इच्छा व्यक्त करून उल्लेखित झाला आहे. मुख्य विषयाकडे दुर्लक्ष होऊ नये ही त्यामागची रास्त भावना.

प्रकाशकांनी हे उत्तम वाङमय प्रसिद्धीस आणले हे निःसंशय अभिनंदनीय आहे.

—रामदास कळसकर

उलगा–उलग (आत्मचरित्र)
ले. श्रीपाद जोशी
कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे–३०
पृ. : ३६८. मूल्य : ४० रु.

---

जुनी पुस्तके

# लाइन क्लिअर

ले. य. स. कोबाडकर

---

एखादे पुस्तक जुने केव्हा होते? काही कळत नाही. पूर्वी पुस्तकच कमी प्रकाशित व्हायची तेव्हा पुस्तक जुनं व्हायला वेळ लागत असावा. हल्ली महिन्याकाठी भराभर पुस्तके प्रकाशित होतात आणि पुस्तक लवकरच जुने होते. अर्थात एखादे पुस्तक जुने की नवे हे ठरवणार कोण? सामान्य वाचकच ते ठरवणार.

ग्रंथालयात काम करणाऱ्याचा हा नेहमीच अनुभव असतो की पुस्तके न्यायला आलेले वर्गणीदार, वाचक सतत विचारतात,

'काही नवीन पुस्तके आली का?'

जणू त्याने सर्व जुनी पुस्तके वाचलेलीच असतात! तसे नसते. ते शक्यही नाही. नवीन पुस्तक वाचणे याचा अर्थ, इतर कुणी फारश्या वाचकांनी न वाचलेले पुस्तक आपण आधी वाचून नंबर पटकावणे, एवढाच असतो. तेव्हा पुस्तके जुनी होतात, कारण वाचक तसं ठरवतात की–अमुक अमुक पुस्तक आता जुने झाले!

अर्थात पुस्तक केवळ एवढ्याने जुने होत नाही. काही चांगल्या पुस्तकांच्या आवृत्त्याच ५००–१००० च्या असतात. पुनः त्याची आवृत्ती निघत नाही. पुस्तक दृष्टीआड होते. अशी काही वर्षे गेली की ते आपोआप जुने होते.

मला मात्र जुनी पुस्तके आवडतात. याची कारणे दोन : नाही म्हटलं तरी नवे लेखक ज्य गूढ पद्धतीने लिहू पाहतात, ते लेखन वाचणे म्हणजे कठीण गणित सोडवायला बसल्यासारखे वाटते. यामुळे फारच गाजावाजा झाला तर नवे पुस्तक वाचावे हे मला मानवते. शिवाय आर्थिकदृष्ट्या जुनी पुस्तके अद्याप स्वस्त आहेत. आता माझ्यापुढे जे जुने पुस्तक आहे ते क्राउन ११० पृष्ठांचे असून छापील किंमत फक्त ३ रु. ६० पैसे आहे. याच पुस्तकाची नवी आवृत्ती निघाली तर किंमत १० ते १२ रुपये असणार. म्हणून मी अद्याप पुष्कळ वेळा विकत घेतो ती जुनी पुस्तके. मग ती पुस्तकांच्या प्रदर्शनात मिळोत वा रस्त्यावरच्या पुस्तकविक्रेत्याकडे. मी हे पुस्तक रस्त्यावर एक रुपयाला घेतले. एक रुपया बाईंडिंगला खर्च केला. पुस्तकाचे नाव आहे 'लाइन क्लिअर.' व्हीनस प्रकाशनाने हे पुस्तक १९६६ साली प्रसिद्ध केलेले आहे.

य. स. कोबाडकर या रेल्वेखात्यात अंडर गार्डाची नोकरी करणाऱ्या निवृत्त रेल्वे-सेवकाचे हे आत्मकथन आहे. आठवणींच्या स्वरूपात.व्यावसायिक निष्ठा, प्रामाणिकपणा, परोपकारी वृत्ती अशा गुणांच्या जोरावर बढती मिळण्याचा तो काळ असल्याने चढत चढत हा माणूस ट्रॅफिक इन्स्पेक्टर झाला. आत्मचरित्र लिहावे असे त्याच्या मनात निवृत्तीनंतरही कधी नव्हते; परंतु वृद्धापकाळी मधुमेहाचा जोर होऊन, ते घटप्रभेला कर्नाटक

हेल्थ होममध्ये दाखल झाले. तिथे त्यांचा एक पाय मांडीपासून कापून काढावा लागला. कॉटवर पडल्या पडल्या भेटायला येणाऱ्यांशी सारखे बोलायचे काय ? ते आपल्या रेल्वे-सेवेतल्या आठवणी सांगत. भेटायला येणाऱ्यात शंकरराव किर्लोस्कर होते. त्यांनी या आठवणी ऐकून त्यांना आग्रह केला की अनुभव लिहून काढा. म्हणून श्री. कोवाडकरांनी हे वाचनीय पुस्तक लिहिले.

श्री. कोबाडकरांचा जन्म १९००ते१९०२ या कालखंडातला असावा. रेल्वेशी त्यांचा पिढीजात संबंध. वडील रायबागला स्टेशन-मास्तर असताना त्यांचा जन्म झाला. शिक्षण इंग्रजी सहावीपर्यंत होताच त्यांचे लगेच लग्नही झाले. अर्थात शिक्षण संपले.

१९२४ साली बेळगावजवळ एका खेड्यात काँग्रेसचा व्हॉलेंटिअर कॅम्प सुरू झाला. डॉ. हर्डीकर या कॅम्पचे प्रमुख होते. श्री. कोबाडकर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने भारून गेले. त्यांनी आयुष्य समाजउपयुक्त घालवायचे ठरवले. समाजउपयुक्त हा त्यांचाच शब्द.

परंतु 'समाजउपयुक्त' जीवन म्हणजे नेमके काय करायचे ? सांगतात– नंतरच्या काही वर्षात मला कोणतीच प्रगती साधता आली नाही. अशा वेळी माझे मेव्हणे श्री. नाईक निधन पावले. ते हुबळीला रेल्वेत कामाला होते. त्यांचे हुबळीचे सामान आणावे म्हणून मी हुबळीला गेलो. मेव्हण्याचे ऑफिसर अँग्लोइंडियन गृहस्थ होते ते मला म्हणाले—Are you willing to join this Rly ? या आकस्मिक प्रेमाने मी थोडा गोंधळलो. पण लगेच होकार दिला. दुसऱ्याच दिवशी मी बंडरगार्डच्या नोकरीवर हजर झालो.

म्हणजे देशभक्तीचे संस्कार घेऊन कोबाडकर रेल्वेच्या 'सेवेत दाखल झाले. अर्ज, एम्प्लॉयमेंट एक्सचेंज, राखीव जागा या भानगडी नसल्यामुळे नोकरी झटकन लागली. सुरुवातीला पगार होता २४ रुपये !

श्री. कोबाडकरांच्या रेल्वेसेवेतील सर्वच आठवणी या त्यांच्या कर्तव्यतत्परतेची, प्रामाणिकपणाची, परोपकारीवृत्तीची साक्ष देणाऱ्या आहेत; पण मला आवडते ती पहिली आठवण. ज्यात या सद्‌गुणाचा काही संबंध नाही. निवेदकाच्या शब्दातच ही आठवण संक्षेपाने थोडक्यात सांगतो.

### अदलाबदल

१९२८ साल होते. ऍंगलो नावाच्या गार्डबरोबर मी मेलवर होतो. हुबळीहून निघालो. मिरजेला जाणार होतो.

बेळगाव स्टेशनात गाडी थांबताच गर्दीतून वाट काढीत, भरपूर उंच आणि लठ्ठ असा लष्करी अधिकारी माझ्याच रोखाने येताना दिसला त्याच्या मागून त्याचा पाठलाग करीत एक मोठे अल्सेशियन कुत्रे माणसे हुंगत येत होते.

माझ्याजवळ येताच तो म्हणाला– 'मी फर्स्टचे तिकिट पर्चेस केले आहे. मला पुण्याला जायचे आहे. बरोबर हे कुत्रे आहे. आपण याची व्यवस्था डॉग–बॉक्समध्ये करता काय ?'

कुत्र्याच्या गळ्यात पट्टा दिसत नव्हता. गाडीच्या टोकाला एकटा गार्ड गाडीच्या डब्यापाशी उभा होता. मी कॅप्टनला त्याला भेटायला सांगितले.

गाडीने बेळगाव सोडले. गाडी भरवेगाने धावू लागली. सकाळी नऊ वाजण्याचा सुमार होता. बाहेर स्वच्छ सूर्यप्रकाश शेते उजळीत होता. मधूनच या शेतांच्या बांधांची सरळ रेषा तिरपी तिरपी होऊन मागे पडत होती. येणारे स्टेशन रायबाग होते. इतक्यात गाडीचे ब्रेक लागले !

गाडी का थांबली असावी ? मी थोडासा गोंधळलोच; पण माझ्या लक्षात आले की इथं रायबागला कंट्री लिकर (हातभट्टी) चांगली व स्वस्त मिळते. ऍंगलोला तिच्याशिवाय शुद्धच राहत नसे.

मी खाली उतरलो. ड्रायव्हरही गाडीच्या डब्याकडे पाहत उभा होता. तो म्हणाला– 'गार्डनेच ब्रेक दावले–की कुणास ठाऊक ?'

मी ऍंगलोकडे गेलो. स्वारी डब्यातून खाली उतरली होती. लिकर यायला पाच–दहा मिनिटे होती.

आम्ही डॉग–बॉक्स शेजारीच उभे होतो. कुत्रा आलटून–पालटून आमच्याकडे पाहत होता. काही तरी आठवल्यासारखे ऍंगलो डब्यात चढला व पावाचा तुकडा घेऊन उतरला. कुत्र्याचे कौतुक करीत ऍंगलोने बॉक्सचे दारही उघडले. इतक्यात त्या धुडाने खाली झेपही घेतली व गाडीच्या उलट दिशेने तो पळू लागला. काखेत हिरवे निशाण व हातात पाव घेतलेला ऍंगलो त्याच्या पाठोपाठ पळू लागला. इतक्यात इंजिनने शिट्टी दिली. पाठलाग सोडून ऍंगलो पळत आला. आता पुढे काय ? त्याच्या नोकरीवरच संकट आले होते.

इंजिन तर सारखे शिट्ट्या देत होते. काय करावे ? इतक्यात दणकेबाज शिट्टीच्या आवाजाने घाबरून, एक मरतुकडे गावठी कुत्रं थरथरत उठले. मी त्याच्याजवळ गेलो व 'यू–यू' करीत चुचकारून त्याला जवळ बोलावलं. हाताच्या आटोक्यात येताच त्याला पकडले व डॉग–बॉक्समध्ये ठेवून दिले. नगाला नग तरी मिळाला.

ऍंगलोने हिरवे निशाण फडफडवले. गाडीने पुन: वेग घेतला.

मिरजेला आता दोघांची ड्यूटी बदलली. रिसीव्ह करायला आलेला विट्ठल गार्ड माझा मित्रच होता. त्याला मी कुत्र्यात झालेला बदल सांगितला व पुणे मुक्कामी काय करायचे ते समजावून सांगितले.

विट्ठलने मला मिरजेला परतल्यावर सांगितलं–

पुण्याला कॅप्टन कुत्रे न्यायला आला. मी मुद्दामच सामोरा गेलो व डॉग–बॉक्सचा दरवाजा उघडला. ते गावठी कुत्रे प्रवासाने घाबरले होते. दार उघडताच प्लॅटफॉर्मवर उडी मारून ते पसार झाले. कॅप्टन फारच रागवला. लालबुंद झाला. तो म्हणू लागला– ते कुत्रे माझे नव्हते. माझा कुत्रा मला परत करा. नाही तर मी रेल्वेवर दावा लावीन!

मी म्हटलं पण ते कुत्रं तुमचं नव्हतं कशावरून ? रखवालदार त्याला पकडून आणा. शेवटी भांडण पेटले व स्टेशनमास्तरकडे गेले. कायदा व तर्क यांच्या आधाराने त्यानेही माझीच बाजू घेतली.

'गार्डला व रेल्वे कंपनीला शिव्यांची लाखोली वाहत साहेबमजकूर निघून गेले.

—रा. म. शास्त्री

# बडजात्यांचं 'राजश्री प्रॉडक्शन'

## फॉर्म्युलाबंद यशस्वी चित्रपटांचा कारखाना !

शुभदा रानडे




चित्रपटसृष्टीत धोधो वाहणारा पैसा, नित्य नव्या उगवणाऱ्या फॅशन्सची चमक-धमक, इथं पावलोपावली मिळणारा मानमरातब, ओसंडून वाहणारं ग्लॅमर या साऱ्यांचं नव्या पिढीला, तरुण मनाला आकर्षण वाटलं नाही तरच नवल! याशिवाय कलेची सेवा, कलेची जपणूक यासारखे उदात्त विचार उराशी बाळगून या क्षेत्राचं आकर्षण वाटणाऱ्यांचा एक वर्गही येथे आहेच; पण या मोहमयी दुनियेचा सगळा कारभारच तिरपांगडा! इथं लॉटरी लागली तर एखादा एका रात्रीतही नव्हत्याचा होता घडण्याची किमया घडते. नाहीतर अख्खं आयुष्य जिवापाड धडपड करूनही शेवटी नैराश्यच पदरी येण्याची किमयाही इथंच घडते! पण या झाल्या पुढच्या गोष्टी. मुळात इथं गरज असते ती संधीची. एक काळ असा होता की, अभिनयाचं नाणं पक्कं असेल तर ही संधी सहजी मिळतही होती; पण बदलत्या काळानुसार अभिनयाची बाजू दुय्यम व्हायला लागली आणि भलत्याच गोष्टींना जास्त महत्त्व देण्यात येऊ लागलं. तशातच स्टारसन्सची क्रेझ धुमाकूळ घालायला लागली आणि नवोदितांना प्रवेश मिळणं अजूनच दुरापास्त होऊन बसलं. पण या सगळ्या धामधुमीत, या निर्मात्याकडून त्या निर्मात्याकडे, या स्टुडिओतून त्या स्टुडिओत अशा दरदर ठोकरा खात फिरणाऱ्या नव्या, केविलवाण्या चेहऱ्यांना आशावादी दृष्टीकोन देण्याचा प्रयत्न सुरुवातीपासून आतापर्यंत केला तो ताराचंद बडजात्यांच्या राजश्री प्रॉडक्शननं! १९६२ मध्ये पडद्यावर झळकलेल्या 'आरती' पासून ते १९८२ मध्ये पडद्यावर आलेल्या 'नदियाके पार' पर्यंत नवीन रक्ताला वाव देण्याचं ब्रीद राजश्रीनं अगदी इमानेइतबारे पाळलं आहे.

'राजश्री' च्या चित्रपटांचा एक आढावा घेतला तर नव्यांना संधी द्यायची, चित्रपटसृष्टीची दारं त्यांना खुली करून द्यायची, या राजश्रीच्या धोरणाबरोबरच त्यांचं आणखी एक धोरण स्पष्टपणे लक्षात येतं की, अत्यंत साधा, सरळ आणि तरीही योग्य ती व्यावसायिक मूल्यं त्यात खुबीनं गुंफलेला असा चित्रपट काढायचा. या चित्रपटात थोडंसं मनोरंजन असेल, थोडासा मेलोड्रामा असेल, थोडीशी फॅन्टसी असेल, जाता-जाता प्रचारकी थाटाचं अवडंबर टाळून खुसखुशीत ढंगानं दिलेला संदेश असेल आणि हे सगळं असूनही विरंगुळा म्हणून तीन तास घालवायला आलेल्या प्रेक्षकाच्या डोक्याला तीन तास ताप होणार नाही, याचीही काळजी घेतलेली असेल. त्यामुळे राजश्रीचे चित्रपट कुटुंबपट खरेच; पण कुटुंबपट म्हणजे निव्वळ रडारडीचा कहार, आणि समज-गैरसमजांची गुंतागुंत या कुटुंबपटांच्या सर्वसाधारण व्याख्येपासून दूर असलेले. थोडक्यात सांगायचे तर एखादा पदार्थ करताना एक चमचा तिखट एक चमचा मीठ असं सगळं योग्य प्रमाणात घातल्यानंतर त्या पदार्थाला न्यारीच चव यावी, असा काहीसा प्रकार राजश्री-चित्रपटांच्या बाबतीत दिसून येतो. त्यामुळे दोन रिळं मनोरंजन, एक रीळ मेलोड्रामा, भरपूर नाच आणि गाणी अशा काहीशा निश्चित प्रमाणात राजश्रीच्या चित्रपटांचा एक साचा ठरला गेला आणि या साच्यातून राजश्रीचे चित्रपट वेगाने बाहेर येत गेले. आज कलात्मक चित्रपट शाम बेनेगल, ॲक्शनपॅक्ड मनोरंजनात्मक चित्रपट मनमोहन देसाई, भयचित्रपट-रॅम्सेबंधू, हलक्याफुलक्या कॉमेडीज-बासु चतर्जी, हृषीकेश मुखर्जी हे वर्गीकरण जसं मनात ठासून भरलं आहे, तसं सहकुटुंब, सहपरिवार इष्ट-मित्र-मैत्रिणींसह पाहायला योग्य असा कौटुंबिक चित्रपट हा शिक्का राजश्रीच्या चित्रपटावर बसला.

### धोपटमार्गी कथा

राजश्री चित्रपटांची कथा ही तशी धोपटमार्गी साधी. फारशी आडवळणं न घेता जाणारी. मूळ कथानकाचा एकंदरीत आवाकाच मर्यादित स्वरूपाचा असल्यानं साहजिकच धडाधड मनावर आदळावेत असे चढउतार, आंदोलनं कमीच. राजश्रीच्या कुटुंबपटांच्या धोरणामुळं राजश्री आणि मराठी लेखकांचं सूत चांगलंच जुळलं आणि अनेक मराठी कथांची वर्णी लागली. उदा. 'मेरे भैय्या'- १९७२ कथा - बाळ कोल्हटकर, 'पिया का घर'-१९७२ कथा-व. पु. काळे, ('मुंबईचा जावई' या मराठी चित्रपटावर आधारित) 'गीत गाता चल'-१९७५ कथा-

पटकथा–मधुसूदन कालेलकर, शरद पिळ–गावकर, 'दुल्हन वहीं जो पिया मन भाए'-१९७७–मधुसूदन कालेलकर, 'इट स्टार्टेड वुइथ ईव्ह' या इंग्रजी चित्रपटावर आधारित 'आँखियोंके झरोखोंसे–१९७८ – मधुसूदन कालेलकर वगैरे. या चित्रपटांमध्ये सर्व–सामान्य जीवनाशी नातं जोडणारे विषय घेऊन, त्याला अनुरूप असे प्रसंग पेरून सामान्य प्रेक्षकवर्गाला आपलसं करून घेण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यामुळे 'गीत गाता चल' मधले एकमेकांशी भांडणारे राधा–शाम शेजारचे अमित आणि संध्या वाटावेत इतके जवळचे वाटतात. 'चितचोर' मध्ये आपल्या लाडक्या, उपवर लेकीसाठी 'इंजिनिअर' तरुणावर 'डोळा' ठेवून बसलेले आई–वडील ठायी–ठायी भेटणारे, 'हमकदम' मधले विसंवादानं घेरलेले पती-पत्नी आजच्या काळातल्या अनेक जोडप्यांचं प्रतिनिधित्व करणारे तर 'तुम्हारे बीना' तलं दुभंगलेलं जोडपं अनेकांच्या समस्येला वाचा फोडणारं...असं असलं तरी कथेतले छोटे-छोटे प्रसंग चित्रपटात ठासून भरलेल्या योगायोगांच्या अचाट कर्तृत्वाने अचूक जोडले जातात, तेव्हा चित्रपटात वास्तवतेच्या अकृत्रिम धाग्यांमध्ये कृतिमतेचे धागेही विणल जातात आणि या चित्रपटांमध्ये बऱ्यापैकी स्वप्नरंजनही होतं. याशिवाय नीतिमूल्यांची जपणूक, न्यायाबद्दलचा आदर, सत्यप्रियता असे एकेक उत्तम प्रतीचे आदर्शवादही अधून-मधून पेरून ठेवलेले असतात.



मिथुन – रामेश्वरी – राजश्रीचे नायक-नायिका – आता दोघंही डब्यात

चांगलं आणि वाईट यांच्यातला संघर्ष हा बहुतांशी हिंदी चित्रपटांचा पाया असतो. शेवटी चांगल्याचा जय आणि वाइटाचा पराजय दाखवून चित्रपटाचा 'आनंदी आनंद गडे' असा शेवट केला की, बाहेर पडणारं पब्लिक जाम खूष होतं. सत्प्रवृत्तींचा जय आणि सुखद शेवट या गोष्टी प्रेक्षकांना भावत असल्या तरी राजश्रीच्या चित्रपटात या गोष्टी थोडया-फार अतिरेकानेच आढळतात. या मुद्द्याचा विचार करताना या चित्रपटातील नायक-नायिकांचा म्हणजे पर्यायाने त्यातील व्यक्तिरेखांचा विचार करणं आवश्यक आहे. यात चांगल्या व्यक्तिरेखांचा चांगलेपणा हा टोकाचा असतो. त्यामानाने वाईटपणाला झुकतं माप दिलेलं असतं. साहजिकच कथेची दिशा पहिल्या काही काळातच निश्चित होते. त्यातूनही एक वेळ वाईट व्यक्तिरेखांमधला वाईटपणा हा टोकाचा असला तरी तो त्या विशिष्ट व्यक्तिरेखेच्या बांधणीत खपून जातो; पण चांगलेपणाचा अतिरेक झाला की, त्या व्यक्तिरेखेतली सहजता निघून जाते आणि ती गुळगुळीत क्वचित खोटी वाटायला लागते. यासाठी 'नैय्या'तला सोनू (प्रशांत नंदा), 'दुल्हन वहीं जो पिया मन भाए'तली कम्मो (रामेश्वरी), 'सुनयना'तला राजू (नसीरुद्दीन शाह), 'सावनको आने दो' तली चंद्रमुखी (झरीना वहाब) ही उदाहरणं पुरेशी बोलकी आहेत.

## साचेबद्ध व्यक्तिरेखा

यातूनच या चित्रपटांच्या नायक–नायिकांची एक इमेज तयार झाली. हा नायक म्हणजे भोळा-भाबडा, दुसऱ्याच्या सुखासाठी सतत धडपडणारा, 'हे विश्वचि माझे घर' असं समजून लहानथोर सर्वांना आपलसं करणारा, निष्काम कर्मयोगाच तत्त्व पाळून दुसऱ्याच्या मदतीसाठी सदैव तत्पर असणारा... अशी सगळी सद्गुणी लक्षणं दाखवणारा. हा नायक देहाती असल्यावर शहरात आल्यावर त्याला वाईटच अनुभव येणार, मग बिचाऱ्याची फरफट....वगैरे. प्रेक्षकांची हक्काची सहानुभूती मिळण्याचा हा हुकमी मार्ग फक्त राजश्रीवाल्यांचाच नाही तर सगळयाच फिल्मवाल्यांचा; पण याशिवाय प्रेक्षकांची हुकमी सहानुभूती मिळवण्याचा राजश्रीचा आणखी एक उपाय म्हणजे मुख्य व्यक्तिरेखां मध्ये कशाची तरी कमतरता दाखवायची. म्हणजे 'दोस्ती'तला एक आंधळा, एक लंगडा, तपस्या'तली लहान भावंडांसाठी आपल्या ऐहिक सुखांचा त्याग करणारी मोठी बहीण, 'दुल्हन वही जो पिया मन भाए'तली नायकानं हवी तशी वाकवावी अशी अनाथ नायिका, 'अँखियोंको झरोंखोसे' मधली दुर्धर रोगानं ग्रासलेली नायिका, 'सुनयना'चे आंधळी नायिका आणि अनाथ नायक,.... 'शिक्षा' सारख्या एखाद्याच चित्रपटात ही पायवाट सोडून वेगळया पायवाटेनं जाण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. यात तासाला शंभर मैल वेगानं जाणारा मुलगा आणि २० मैल वेगानं जाऊ पाहणारा बाप–यांच्यातला संघर्ष असं वेगळं कथानक हाताळलंय. साहजिकच 'शिक्षा'चा नायक हा अरेरावी, उद्दाम आहे किंवा 'एजंट विनोद' हा बॉण्डपटाच्या धर्तीवर काढलेला आणि 'थ्रिलर' या वर्गात मोडणारा चित्रपट. पण दुर्दैवानं 'शिक्षा'



खास राजश्री टच् – साधना सिंह आणि सचिन – ' नदिया के पार ' मध्ये

¤

आणि ' एजंट विनोद ' दोन्ही पडले आणि वेगळं वळण राजश्रीवाल्यांना फारच महागात पडलं.

हीच गोष्ट नायिकांची. राजश्रीची नायिका म्हटलं की ती साडीतच असणार. साडीतच असणार म्हणण्यापेक्षा ती अंगभर कपड्यात असते हे महत्त्वाचं कारण राजश्रीची नायिका ही जेव्हा ' गाँवकी गोरी ' होऊन येते, तेव्हा तिचा वेष हिंदी चित्रपटातल्या गाँवकी गोरीचा असतो तसाच (म्हणजे कसा तो मुद्दाम वर्णन करून सांगायला नकोच) असतो. पण इतर फिल्मवाले त्या ' अंगभर ' वेषातून नायिकेला ' शिताफीने ' भरपूर ' प्रदर्शन ' करायला लावतात. राजश्रीचे चित्रपट याला अपवाद तशीच एखादीही वट चुकारपणीसुद्धा बाहेर राहू नये अशी घट्ट वेणी, कुंकू, दागिने तेही माफक – सगळं कसं जागच्या जागी. थोडक्यात म्हणजे कौटुंबिक चित्रपटाची नायिका म्हणून एकदम फिट बसणारी. ' चितचोर 'ची झरीना वहाब, ' दुल्हन वहीं जो पिया मन भाए 'ची रामेश्वरी, ' नदियाके पार 'ची साधना सिंह ' तुम्हारे बीना 'ची स्वरूप संपत, ' जियो तो ऐसे जियो 'ची देवश्री रॉय या सगळ्या नायिका कशा एका मुशीतून काढल्यासारख्या वाटतात. ' गीत गाता चल 'चा सचिन, ' सावन को आने दो 'चा अरुण गोविल, ' नैय्या 'चा प्रशांत नंदा हेही सगळे एकाच ब्रॅण्डचे जाणवनात. एवढंच नाही, पण या ब्रॅण्डमुळे रामेश्वरीची 'दुल्हन' मधील नायिका आणि ' सुनयना 'तली नायिका, झरीना वहाबची ' चितचोर 'मधली नायिका आणि ' सावनको आने दो 'ची नायिका, सचिनने पूर्वी रंगवलेला 'गीत गाता चल 'चा नायक आणि मधला बराच काळ उलटल्यानंतर अगदी अलीकडच्या काळात ' नदियाके पार 'साठी रंगवलेला नायक, अरुण गोविलचा ' सावनको आने दो ' आणि ' जियो तो ऐसे जियो 'चा नायक या सगळ्यात काही बदल जाणवत नाही. बदल जाणवतो तो फक्त संदर्भ, पार्श्वभूमी, नाती आणि संबंधित नायक–नायिका यांच्यात आणि नव्या संदर्भातून, नव्या पार्श्वभूमीवरून जुनेच नायक–नायिका पेश केले जातात.

## भविष्यहीन नायक–नायिका

राजश्रीनं फक्त नव्या नट–नटयांनाच संधी दिलीय असं नाही, तर सुखेन्दू रॉय, हिरेन नाग, बासू चटर्जी, गोविंद मूनीस वगैरे दिग्दर्शक, लक्ष्मीकांत प्यारेलाल, रवींद्र जैन, राजकमल, राम-लक्ष्मण यांसारखे संगीतदिग्दर्शक आणि हेमलता, येसूदास, सुरेश वाडकर, आरती मुखर्जी, अलका याज्ञिक, जसपालसिंह वगैरे गायक अशी राजश्रीची तेजस्वी परंपरा आहे. त्याचबरोबर राखी, सचिन, सारिका, झरीना वहाब, रामेश्वरी, राजकिरण, अरुण गोविल, कोमल महुवाकर, परीक्षित सहानी, सत्यजित, नमिता चंद्रा, मिताली, शामली... अशी राजश्रीनं चित्रपटसृष्टीला दिलेल्या नवीन कलावंतांची यादी अजून किती तरी वाढवता येईल; पण इथं प्रश्न उरतो तो राजश्रीनं दिलेल्या या नवीन कलाकारांपैकी ' राखी 'चा अपवाद वगळता किती जण पुढे आले? अर्थात एकदा या कलाकारांना चित्रपटसृष्टीत इंट्रोड्यूस केल्यानंतर त्यांचा जम बसवून देण्याची जबाबदारी राजश्रीची नाही, ही गोष्ट जरी मान्य केली तरी सगळं काही अनुकूल असून ही मंडळी का मागं पडली असावीत ? तशी राजश्रीच्या चित्रपटातील बहुतांशी मंडळी ही खरोखरच टॅलेन्टेड आहेत. रामेश्वरी– झरीना वहावनं लोकांना जया भादुरीची आठवण करून दिली, तर अरुण गोविल दुसरा दिलीपकुमार होणार म्हणून अनेकांनी स्वप्नं रंगवली. बालकलाकार म्हणून चित्रपटसृष्टी गाजवणाऱ्या सचिन–सारिकाला नायक–नायिका म्हणून राजश्रीनं संधी दिली. आसामचा अमिताभ समजल्या जाणाऱ्या प्रशांत नंदाला राजश्रीनं हिंदीत आणला. हिंदी चित्रपटसृष्टीत सध्या बापाच्या पुण्याईवर एकापाठोपाठ एक चित्रपट खिशात घालणाऱ्या ठोकळयांच्या मानानं राजश्रीची ही फाइंडप् निश्चित टॅलेन्टेड आहेत. निदान पहिल्या चित्रपटात त्यांनी दाखवलेल्या अभिनयक्षमतेवरून भविष्यात या कलाकारांकडून भरघोस कामगिरीची अपेक्षा निश्चितच मनात निर्माण झाली होती. नव्या कलाकाराचा पहिला चित्रपट किती हीट ठरतो, यावरही या कलाकाराचं भविष्य अवलंबून असतं, असा हिंदी चित्रपटसृष्टीत रूढ झालेला समज आणि याही परीक्षेला राजश्रीचे कलाकार आणि त्यांचे चित्रपट पुरेपूर उतरले; पण याच कलाकारांच्या पुढच्या करियरवर नजर टाकली तर काय दिसतं ? ' आशा ' चित्रपटात दुय्यम भूमिकेत चमकलेली आणि नंतर ' मेरा रक्षक ' सारख्या फालतू पडेल चित्रपटाची नायिका म्हणून चमकलेली रामेश्वरी, झरीना वहाब तर राजश्रीची

विशेष लाडकी नायिका. तिला बाहेरच्या चित्रपटात फारशी संधी मिळाली नाही; पण राजश्रीनं 'चितचोर' पाठोपाठ 'सावनको आने दो', 'नैय्या', 'जजबात', 'आगामी', 'दर्द–ए–दिल' अशा अनेक चित्रपटांत तिला घेतलं. झरीनाला बाहेरच्या चित्रपटात फारशी संधी मिळाली नाही. गोष्ट खरीय; पण 'घरोंदा' सारख्या चित्रपटात तिनं यशस्वी कामगिरी करून दाखवली, तरीही तिच्यावरची गैरमर्जी काही संपली नाही. आज ना उद्या संधी मिळेल, या आशेवर राह्यलीय. नायिका म्हणून चित्रपटसृष्टीत येन केन प्रकारेण टिकून राहण्यासाठी धडपडणारी आणि त्यासाठी शरीरप्रदर्शनासारखी कुठलीही तडजोड करायला तयार असणारी सारिका, अभिनयाचा नाद सोडून दिग्दर्शनाकडे वळलेला सचिन, चित्रपटसृष्टीत इतकी वर्षं राहूनही उमेदवारीचा काळ न संपलेले राजकिरण, अरुण गोविल, विस्मरणात गेलेले साधू मेहेर, प्रशांत नंदा, सत्यजित, नमिता चंद्रा...! राजश्रीच्या यशस्वी कारकीर्दीवर पडलेले हे अयशस्वितेचं सावट निश्चितच उदास करणारं आहे.

हे असं का ?

हे असं का ? हा प्रश्न जेव्हा मनात येतो आणि अनेक गोष्टींची वीण उकलवत या प्रश्नाचं उत्तर शोधण्याचा प्रयत्न होतो, तेव्हा हे उत्तर तितकंच अवघड असल्याचं लक्षात येतं. कारण हे कलावंत पुढं आले नाहीत, यामागं किती तरी कारणं देता येतील आणि ती प्रत्येक कलावंतानुसार वेगवेगळी आहेत. म्हणजे झरीना वहाब किंवा रामेश्वरी या प्रतिजया म्हणून अपेक्षा निर्माण करून गेल्या आणि हाच फार मोठा ड्रॉबॅक ठरला. कारण प्रतिजया या त्यांच्याबद्दल असलेल्या अपेक्षेतून त्यांनी जया भादुरीच्या पावलावर पाऊल टाकून पुढं जायला सुरुवात केली आणि प्रतिजया होण्यात त्या कमी पडल्या. शेवटी झालं काय की, प्रतिजयाही झाल्या नाहीत आणि वेगळी प्रतिमाही निश्चित स्वरूपात प्रेक्षकांच्या मनावर ठसवू शकल्या नाहीत ! एक जया होती, तोपर्यंत तीही बदल म्हणून प्रेक्षकांना आवडली; पण ती एकटी होती, तोवर मजा होती; पण पुढे पावलोपावली जयाच–जया निर्माण झाल्यावर त्यातलं नाविन्यही संपलं आणि मजाही संपली ! बालकलाकार असताना चेहऱ्यावरची कोवळीक, निरागसता ही सचिनच्या दृष्टीनं वरदान ठरली होती; पण पुढं चित्रपटाचा नायक झाल्यानंतर ही निरागसता आणि कमी उंची सचिनला शाप ठरली ! ही झाली काहींची झलक आणि अशीच कारणं इतरांच्या बाबतीतही देता येतील; पण या सगळ्यांना सांधणारा समान दुवा म्हणजे हे सगळे कलाकार राजश्रीने दिलेले आहेत. त्यांच्या यशाचा विचार करताना राजश्रीचा विचार केला जातो, म्हणजे अपयशाची कारणमीमांसा करतानाही राजश्रीचा विचार करायलाच हवा. त्या वेळेस जाणवतं की, एकाच ठराविक मार्गानं चित्रित केले जाणारे नायक–नायिका आणि त्यातून बसलेला 'राजश्री छाप' याचा त्यांच्या अपयशात वाटा आहेच. या कलाकारांच्या अभिनयाच्या विविध बाजू, निराळे कोन प्रकट व्हायची संधीही या कलाकारांना मिळाली नाही. तसंच राजश्रीचे चित्रपट हे बहुधा लो बजेट असल्याने यातल्या काहींना बाहेर संधी मिळाली ती लो बजेट चित्रपटातच आणि साहजिकच बिगबजेट चित्रपटवाल्यांनी यांची दखल घेण्याचं नाकारलं. पुन्हा बिगबजेट चित्रपटात नायिकेच्या अभिनयापेक्षा सेक्स अपील खपतं. टंच, मुसमुसलेलं शरीर असलं की झालं आणि राजश्रीच्या बहुतेक नायिका सेक्स अपीलच्या बाबतीत मार खाणाऱ्या. एक सारिका आहे– दोन्ही गोष्टी असणारी. चित्रपटसृष्टीत आपली खैर नाही हे पाहिल्यावर तिनंही सेक्स अपीलचं शस्त्र बाहेर काढलं; पण तरीही तिची परवड थांबलेली नाहीय. हळूहळू एकेक करता ते दार या कलाकारांना बंद झालं आणि हे कलाकार लो बजेट चित्रपट, दुय्यम भूमिका अशा विशिष्ट वर्तुळातच फिरत राह्यले. यातून शिताफीनं किंवा परिश्रमपूर्वक धडपड करून जे सुटले ते राखीसारखे अपवादात्मक कलावंत इथं सापडतात; पण बहुतांशी याच मगरमिठीत घट्ट सापडलेले !

## यशस्वी बाजू

असं असलं तरी एका ठराविक काळापर्यंत राजश्रीच्या चित्रपटांचं प्रेक्षकांनी उत्तम स्वागत केलं. याला कारण राजश्रीच्या अगदी सुरुवातीच्या काळात चित्रपटातून



राखी – तपस्यानं हात दिला !

नायक–नायिकांचं जे चित्रण होत होतं, ते सामान्य आयुष्यापासून खूप लांबचं होतं. पुन्हा त्या चित्रपटातला नटवेपणा, प्रेमाचं काहीसं भडक, उथळ, उत्तान दर्शन अशा कृत्रिम पार्श्वभूमीवर राजश्रीच्या चित्रपटातला सगळसाधेपणा, भावडे नायक–नायिका, त्यांचे हळुवार सूचक प्रेम, चित्रपटातील कुटुंबवत्सलता याचा नाही म्हटलं तरी लोकांवर परिणाम झालाच !

याशिवाय राजश्रीच्या चित्रपटांच्या यशात संगीताचंही सहकार्य आहेच. राजश्रीची गाणी ही कशी 'चितचोर' ठरली आहेत, हे त्या त्या काळात आणि तो काळ उलटून अनेक वर्षं झाल्यानंतरही ओठांवर रेंगाळणाऱ्या चालींनी सिद्ध केलंच आहे. 'झिल-



सारिका – ' राजश्री 'ची गुणी नायिका असा आमचा समज पण...

□

मिल सितारोंका आँगन होगा' (जीवनमृत्यू) 'ले तो आए हो हमें सपनोंके गाँवमें' (दुल्हन वहीं जो पिया मन भाए), 'सोना करे झिलमिल झिलमिल' (पहेली), 'सुनयना इन बहारोंको तुम देखो' (सुनयना), 'जो राह चूनी तूने' (तपस्या) ... अशी किती तरी गाणी आहेत; पण 'चितचोर', 'गीत गाता चल', 'सावनको आने दो' या चित्रपटात नायक हा गायक आहे किंवा त्याला संगीताची आवड आहे, जाण आहे. संगीत हा या चित्रपटांचा आत्मा होता आणि या गोष्टीचा रवींद्र जैन, राजकमल या संगीतकारांनी पुरेपूर फायदा घेतला. हे या संगीताचं यश हे क्षणिक ठरलं नाही. आजही त्यातला ताजेपणा टिकून राहिलेला आहे.

राजश्रीच्या संगीतात जाणवणारं वैशिष्ट्य म्हणजे ही गाणीही साधी. वाद्यांचा गदारोळ नसणारी. गाण्याच्या चाली शास्त्रीय संगीताशी जवळीक साधणाऱ्या असल्या तरीही क्लिष्ट नसणाऱ्या. सुरांशी विळ्या-भोपळ्याचं नातं असणाऱ्यालाही सहजी गुणगुणता याव्यात अशा आणि राजश्रीनं वेगवेगळे संगीतकार हाताळले तरीही वैशिष्ट्यं कायम राहिली. साहजिकच प्रेक्षकांनी ही गाणी तावडतोब उचलली आणि या चित्रपटांच्या चलतीच्या काळात गणेशोत्सव 'शाम तेरी बन्सी' 'धरती मेरी माता' नं साजरे व्हायला लागले, तर कॉलेजच्या गॅदरिंगमध्ये 'तू जो मेरे सूरमें' किंवा 'जब दीप ढले आना'ची हजेरी लागायला लागली.

राजश्रीच्या चित्रपटातील बदल लोकांना भावला असला तरी खूप दिवस एकाच खेळण्याशी खेळल्यानंतर लहान मुलाला त्या खेळण्याचा कंटाळा येतो आणि त्याला दुसरं काही तरी खेळणं लागतं, हा अनुभव प्रेक्षकांच्या बाबतीतही अनुभवास येतो. त्यामुळेच चित्रपटसृष्टीत अनेक टप्पे आले आणि गेले. एके काळी भाबड्या प्रेमकथांना डोक्यावर घेणाऱ्या प्रेक्षकांना बदल म्हणून पडद्यावरील जोशीच्या मारामारीचं आकर्षण वाटलं तर काही काळानंतर त्या मारामारीला वैतागलेल्या प्रेक्षकांना पुन्हा प्रेमकथांमध्ये रस वाटायला लागला. सांगायचा मुद्दा एवढाच प्रेक्षकांची अभिरुची वगैरे लेबलं आपण लावतो. सर्वसामान्य प्रेक्षकाला हवा असतो तो बदल, या आकर्षणापायीच त्यांनी राजश्रीच्या चित्रपटांचं स्वागत केलं; पण इथली सगळी पद्धतच उरफाटी ! माती मऊ लागली की, पार कोपरानं खणायची–अंदाज न घेता आणि मग स्वतः खणलेल्या खड्ड्यात स्वतःच कोसळायचं ! राजश्रीच्या चित्रपटांद्वारा जाणवलेल्या बदलाचं कौतुकही असंच मर्यादित ठरलं. त्या बदलातील गंमत ओसरली. कथेचा मूळ गाभा, चौकट तशीच ठेवून संदर्भ, पात्रं बदलली जाऊ लागली आणि राजश्रीच्या चित्रपटांनाही तोच-तोचपणाचा शाप जडला. त्याचा परिणाम या चित्रपटांवर मिळणाऱ्या प्रतिक्रियांवर निश्चितच दिसायला लागला. यात पुन्हा आणखी एक गोष्ट लक्षात घ्यायला लागेल की, बदलत्या काळानुसार मारामारीचं उधाण, डिस्कोचा धांगडधिंगा, ॲक्शन-पॅक्ड चित्रपटांचा धुमाकूळ वगैरे निरनिराळी स्थित्यंतरं राजश्रीपुढे शड्डू ठोकून उभी आहेतच. या पार्श्वभूमीवर सरधोपट मार्गावरून चाललेला राजश्रीचा एकांगी प्रवास धक्के खाऊ लागला.

पण राजश्री प्रॉडक्शननं अनेक पावसाळे पचवलेले आहेत, अनेक सुखदुःखं झेललेली आहेत. साहजिकच व्यवहाराची गणितं त्यांनी यशस्वीपणे सोडवली. अलीकडे राजश्रीच्या चित्रपटांकडे शहरी प्रेक्षकांनी पाठ फिरवली असली तरी बाहेर मात्र या चित्रपटांना मरण नाही ! मुंबईत पडलेल्या 'नदियाके पार'नं अलाहाबादसारख्या ठिकाणी सुवर्णमहोत्सव साजरा केला, तर इतर अनेक ठिकाणी सुवर्ण-

महोत्सवाच्या मार्गावर आहे. राजश्रीचं हे अगदी ताजं उदाहरण. 'नैय्या' शहरी प्रेक्षकांच्या पचनी पडणार नाही, हे पाहून 'नैय्या' मुंबईत प्रदर्शितच केला नाही आणि लहान गावांमध्ये 'नैय्या' वेड्यासारखा चालला. चित्रपटगृहांची कमतरता भासतेय, हे पाहिल्यानंतर नवीन चित्रपट मॅटिनीला प्रदर्शित करण्याची कल्पना काढली आणि पहिला प्रयोगही 'जीवनमृत्यू' या आपल्याच चित्रपटावर केला. मुंबईच्या अलंकारचित्रपटगृहात तब्बल १०० आठवडे हाउसफुल्ल होण्याचा विक्रम 'जीवन-मृत्यू' नं केला आणि राजश्रीची ही खेळी चांगलीच यशस्वी ठरली. चित्रपटगृहाअभावी वर्षानुवर्षं चित्रपट रखडत राहिल्यामुळे नाकी नऊ आलेल्या निर्मात्यांना राजश्रीनं दिलासा देणारा नवाच मार्ग दाखवला आणि नवे चित्रपट धडाधड मॅटिनीला प्रदर्शित होऊ लागले. खेड्यापाड्यांतील प्रेक्षकवर्ग राजश्रीच्या चित्रपटांनी हातातून निसटू दिलेला नाहीय आणि शहरी प्रेक्षकवर्गासाठी राजश्रीनं तडजोड करायला सुरुवात केलीय. त्यात काही वावगं किंवा



राजश्रीतून बाहेर पडल्यावर अभिनय दाखवायला वाव मिळेल तर !

◻

कमीपणा न मानता. भपकेबाज सेटस्, नाच, गाणी, डिस्को जे जे हवं ते ते सर्व घुसडायला सुरुवात केली आहे. याची एक छोटीशी झलक नुकत्याच 'छायागीता'त झालेल्या 'दर्द-ए-दिल' च्या गाण्यात दिसलीही. राजश्रीचं हे नवं पाऊल किती यशस्वी ठरतं तेच बघायचं ! ◻

# ताराचंद बडजात्या—बाजू भक्कम !

राजश्री प्रॉडक्शन्सच्या ताराचंद बडजात्या यांचं हे सुवर्णमहोत्सवी वर्ष !

१९३३ मध्ये कलकत्त्याच्या मोतीमहल थिएटरमध्ये अॅप्रेन्टिस म्हणून कामाला सुरुवात केल्यानंतर स्वकर्तबगारीच्या बळावर त्यांनी चित्रपटसृष्टीच्या निर्मिती, प्रदर्शन आणि वितरण या तिन्ही क्षेत्रात राजश्री संस्थेचा मोठ्या प्रमाणावर दबदबा निर्माण केला आहे.

वितरणक्षेत्रात पहिल्यांदा जम बसवून स्वच्छ, साध्या चित्रपटनिर्मितीचा विशुद्ध हेतू मनात धरून ते निर्मितिक्षेत्रात उतरले.

अनेक नवे नट, दिग्दर्शक, गायक, संगीत-दिग्दर्शक यांच्याबरोबर राजश्रीची आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे एस. एस. वासन, ए. व्ही. मेईयप्पन चेट्टियार, एल. व्ही. प्रसाद, एस. एस. नायडू यांसारख्या दाक्षिणात्य चित्रपटनिर्मात्यांना हिंदीत चित्रपटनिर्मिती करण्यासाठी राजश्रीने प्रोत्साहन दिले.

राजश्री प्रॉडक्शननिर्मित 'दोस्ती' चित्रपटाला सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट म्हणून राष्ट्रीय पारितोषिक, सहा फिल्मफेअर पारितोषिके, 'बंगाल फिल्म जर्नालिस्टस् असोसिएशन'चे सर्वोत्कृष्ट चित्रपट अशी एकापाठोपाठ एक बक्षिसं मिळाली आणि सर्वतोपरी नवीन कलाकार घेऊन चित्रपट काढण्याचा धाडसी प्रयत्न इतक्या प्रचंड प्रमाणावर यशस्वी ठरल्याचं पाहून राजश्री प्रॉडक्शनचं नाव चांगलंच गाजलं. त्यापाठोपाठच 'तपस्या'नं राष्ट्रीय पारितोषिक, 'चितचोर'मध्ये खटयाळ दिपूचं काम करणाऱ्या राजूनं १९७६ चं बालकलाकाराचं तर राजकमलचं संगीत असलेल्या 'सावनको आने दो' चित्रपटातील शीर्षकगीताला पारितोषिक—अशी अनेक छोटी—मोठी पारितोषिकं राजश्रीच्या खात्यावर जमा झाली. 'दुल्हन वही...', 'जीवनमृत्यू', 'अखियोंके झरोखोंसे', 'गीत गाता चल', 'नदियाके पार' हे चित्रपट रसिकांचं बहुमूल्य पारितोषिक मिळवून गेले.

राजश्री संस्थेची वितरणाची बाजूही अनेक यशस्वी चित्रपटांच्या बळावर चांगलीच पक्की आहे. 'चंद्रलेखा', 'आझाद', 'ससुराल', 'मीलन', 'खिलौना', 'जीने की राह', 'राजा और रंक', 'धरमवीर' 'अमर अकबर अँथनी', 'शोले', 'व्हिक्टोरिया नं. २०३', 'अवतार' हे आतापर्यंत येऊन गेलेले चित्रपट आणि 'कुली', 'बॉक्सर', 'जागीर', 'रझिया सुलतान' हे आगामी चित्रपट—यावरून याची सहजी कल्पना येते.

राजश्री प्रॉडक्शननं आतापर्यंत कलात्मक चित्रपट कधी निर्माण केले नाहीत; पण 'सारा आकाश', 'भुवनशोम' 'शतरंजके खिलाडी' वगैरे कलात्मक चित्रपट वितरित करून कलात्मक चित्रपटाच्या विरुद्ध नसल्याचं दाखवून दिलं आहे.

◻

## त्यागमूर्ती, सोशीक इत्यादी

# थोरली जाऊ

'घराचे घरपण राखणारी, दुःखातून सुख वेचणारी, पतीला परमेश्वर व दिराला पुत्र नी जावेला लेक मानणाऱ्या थोर वहिनीचे आणि कुलस्वामिनी अंबाबाई यांचे आज दर्शन घ्या !' तमाम पुणेकरांना हा मजकूर परिचयाचा झाला असेल. रोज फिरवून फिरवून हाच मजकूर परत परत पेपरात 'थोरली जाऊ' च्या संदर्भात दिसतो. अशा या 'ऑल इन वन' 'थोरली जाऊ'चे दर्शन घेण्याचे भाग्य आपल्याला लाभले, याचे श्रेय निर्माते, दिग्दर्शक कमलाकर तोरणे यांनाच !

'थोरली जाऊ'चं कथानक थोडक्यात असं—

उर्मिला (आशा काळे) आणि सदाशिव (रवींद्र महाजनी) यांच प्रपोज्ड लव्हमॅरेज होतं. सदाशिवच्या आईविना धाकट्या भावंडांवर उर्मिला आईप्रमाणे जीव लावून त्यांना आपलेसे करते. ही आई या मुलांवर कध्धीच चिडत नाही. कायम तिच्या चेहऱ्यावरून वात्सल्य, माया इ. चं मिश्रण ओसंडून वाहात असतं. (भानुविलासवरील पोस्टर बघा) अशा या सुखी संसाराला एके दिवशी कलंक लागतो. उर्मिलेला मूल होणार नाही असं डॉक्टर सांगतात; पण उर्मिला फार मोठ्या मनाची ! ती सरळ सदाशिवसाठी दुसरी बायको आणण्याचा घाट घालते. वंशाला दिवा नको का ? पण सदाशिव हे नाकारतो आणि आपल्या (पोटच्या) मुलांप्रमाणे उर्मिला-सदाशिवच्या भावंडांना अवि (लहानपणाचा अमिताभ, मोठेपणी महेश कोठारे) व प्रमिला (लहानपणी ममता, मोठेपणी कविता किरण) यांना मोठं करते.

इकडे अवि कॉलेजशिक्षण घेता घेता प्रेमशिक्षण घेतो आणि लग्नाची परीक्षा पास होतो. दरम्यान प्रमिलाचंही लग्न ठरतं. हुंडा न देता-घेता. फक्त दोन्ही कडचा खर्च आणि मुलीच्या अंगावरचे दागिने घेऊन हे 'लव्ह-मॅरेज' होतं. हे लग्न लावून देण्यासाठी सदाशिव मित्राकडे पैशाची मागणी करतो व त्याच्याकडून पैसे मिळण्याची खात्री असल्याने आपल्या कामाच्या पेढीवरून पैसे चोरतो. अचानकच त्या मित्राचा मृत्यू होतो आणि सदाशिववर चोरीचा आरोप येऊन त्याला दोन वर्षांची शिक्षा होते. उर्मिलेवर दुसरे



थोरली जाऊ आशा काळे आणि
धाकटी जाऊ प्रिया तेंडुलकर

□

संकट कोसळते.

अविची बायको नमिता (प्रिया तेंडुलकर) एकदम मॉड, बड्या बापाची बेटी, तिचं आणि उर्मिलाचं पटत नाही. चतुर्थीच्या दिवशी नमिता चंद्रोदयाच्या आधी जेवायला बसते (बाप रे ऽऽ) आणि चिकन मुर्गी, मटण इत्यादी पदार्थांची नावं घेते. नमिताला हे घर फारच घाणेरडं वाटायला लागतं. ती नवऱ्याला घेऊन घराबाहेर पडते. वडलांनी ब्लॉक आणि नोकरी तयारच ठेवलेली असते.

कर्जाची परतफेड, स्वतःचं आजारपण अशा छोट्यामोठ्या आपत्ती उर्मिलेवर येतच असतात. अविला मुलगा झाला म्हणून ती बारशाला जाते (अर्थातच न बोलवता). तिचा तिथं 'वांझोटी' म्हणून अपमान होतो. जी सून काही क्षणांपूर्वी (चित्रपटात) म्हणते 'अमेरिकेनं चंद्रावर पाऊल टाकलंय, कसला चंद्रोदय आणि कसलं काय ?' ती आता 'वांझोटी'च्या हातानं मी नाही मुलाला पाळण्यात ठेवू देणार' म्हणते, काय हा बदल...

यानंतर नमिताच्या बाळाचं आजारपण, अविचं आजारपण आणि उर्मिलेचं आजारपण, इतरांसाठी देवाला नवससायास (उर्मिलेचे) देवीला कौल लावणे, देव पाण्यात ठेवणे वगैरे प्रकार उर्मिला करते.

एकाकर एक संकटे कोसळत असतानाही उर्मिलेच्या चेहऱ्यावरची त्यागाची भावना काही गेलेली नसते. शेवटी सगळ्यांसाठी नवस करून सगळ्यांना वाचवते व स्वतःसाठी त्यागापोटी नवस करायचा विसरून शेवटी नवऱ्याच्या मांडीवर प्राण सोडते ! (सांगायचं विसरलं, पहिल्या अंकानंतर गेलेला हा नवरा, एकदम तिसऱ्या अंकात बरोबर पडदा पडायच्या वेळीच येतो !)

'थोरली जाऊ'कडून जे अपेक्षित होते ते पूर्ण झालं. 'थोरली जाऊ' 'आईची माया' अन् 'बहिणीचं प्रेम' या नावांतूनच प्रेम, माया, वात्सल्य ओसंडून असतं, त्यामुळं कथानक पटकन समजतं. हे असे भावनाप्रधान (!) आणि स्त्रीवर्गाला हमखास खेचून घेणारे (त्यांच्या मते) चित्रपट किती काळ बघावे लागणार आहेत कोण जाणे !

तद्दन मराठी चित्रपटात, घरफोडी स्त्रीच असावी लागते, ती मॉडच असते आणि अर्थातच श्रीमंताघरची असते. तिचे डोळे शेवटी उघडतात (चित्रपटाच्या शेवटी) 'वांझोटी' असणं ही अजूनही अपमानास्पद गोष्ट असते. वांझोटी असल्यानं, मुलाच्या मायेसाठी आसुसणं, दुसऱ्या मुलावर जीव लावणं आणि त्यानं पुढं ठोकरणं हेच कथासूत्र असावं लागतं. मग 'थोरली जाऊ' याला अपवाद कसा असेल ?

याशिवाय देवानं कौल दिला की बाळाचे डोळे उघडणं, देव पाण्यात ठेवले की अवि शुद्धीवर येणं इ. सारख्या गोष्टी बघताना खरंच संभ्रमात पडायला होतं. लोकांच्या अंधश्रद्धेचा इतका फायदा घ्यायचा, यापेक्षा सरळ ट्रिकसिन्स वापरून काल्पनिक गोष्टींवर चित्रपट काढावेत. चालतीलही भरपूर, पैसाही मिळेल !

याशिवाय एकत्रकुटुंबपद्धती आणि विभक्त कुटुंबपद्धतीचा प्रश्नही या कुटुंबात हाताळला गेलाय. चार जावा एकत्र कशा काय व्यवस्थित राहू शकतात, सुखाने नांदू शकतात इ. इ. अगदी फुलवून सांगितलंय. अर्थात सर्वच चित्रपटात एकत्र कुटुंबपद्धतीचा जय होतो. पण इतक्या ढोबळपणे हे अनुमान काढणे योग्य होणार नाही.

नायिकाप्रधान चित्रपट असेल तर नायिका ही त्यागमूर्तीच असते. तिचं कर्तृत्व = तिचा त्याग, सोशिकपणा हेच समीकरण. कधी अस्मिता उफाळून आलेली नायिका पडद्यावर दिसतच नाही. स्वतःचे अस्तित्व जोपासून इतरांसाठी काही करणारी नायिका पडद्यावर दिसत नाही. उलट एकेका त्यागाच्या मालिकेतूनच तिला जावं लागतं. (अपवाद : अलीकडचे उंबरठा, शापितसारखे काही चित्रपट) मागे काही सामाजिक संघटनांनी 'सत्यम् शिवम् सुंदरम्'वर मोर्चा नेला होता. त्यापेक्षाही या अशा प्रकारच्या चित्रपटाविरुद्ध काही करणं जास्त महत्त्वाचं आहे. स्त्रीच्या शरीरप्रदर्शनापेक्षाही स्त्रीचं विकृत मनोदर्शन जे केलं जातं, ते जास्त भयानक आहे.

'थोरली जाऊ' हा ठराविक साच्यातला चित्रपट; पण त्यातून सध्याच्या प्रश्नांना मिळणारं खत-पाणी याचा निश्चितच विचार करावा लागेल !

—विद्या कुलकर्णी

# इथून-तिथून

### ◻ पोरक्या मुलीला आई मिळाली !

ती एक वर्षाची असताना सायगावच्या एका रस्त्यावर असलेल्या कार्डबोर्डच्या खोक्यात पडली होती. ही १९७३ च्या फेब्रुवारीतली गोष्ट. व्हिएतनाम–युद्धात तिला पोरकं व्हावं लागलं. त्यावेळी तिचा भाऊ सायगावच्या रस्त्यावरून भीक मागत असे. ती त्या खोक्यात असताना एका फोटोग्राफरने फोटो काढला होता.

ती हृद्रोगी आहे. तिला शस्त्रक्रियेसाठी अमेरिकेला येणे भाग होते. त्या फोटोला अमेरिका आणि इतर देशांतल्या वृत्तपत्रांनी ठळक प्रसिद्धी दिली आणि मदतीचे आवाहनही केले. सगळ्या देशांतून तिच्याकडे मदतीचा ओघ सुरू झाला. त्यानंतर लौकरच तिला नाव–नूग्री–अमेरिकेत नेण्यात आले.

ओहायवोमधील स्प्रिंगफिल्ड येथल्या इव्हलिन हेल या अमेरिकन महिलेने तिला दत्तक घेतले असून ती सध्या तेथे आनंदात आहे. आता अकरा वर्षांची असलेली ही कन्या नुकतीच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रेगन आणि सौ. रेगन यांच्या उबदार कुशीतही स्थान मिळवून बसली आहे !

### ◻ 'लॉर्ड कृष्णा 'चे आगमन

परकीय सहकार्याने निर्माण होणाऱ्या 'लॉर्ड कृष्णा' या चित्रपटासाठी नामवंत म्हणावेत असे चाळीस हिंदी अभिनेते काम करणार आहेत. हिंदी आणि इंग्रजीतून हा चित्रपट निघणार आहे. सौ. सत्ती शौरी या चित्रपटाच्या निर्मात्या आहेत. त्यांच्या अंदाजाप्रमाणे या चित्रपटाचा निर्मिती–खर्च १५ कोटी रुपयांचा असेल आणि दोन वर्षात तो पूर्ण केला जाईल. या चित्रपटाचे चित्रीकरण पुढील वर्षी मार्चमध्ये सुरू होणार आहे.

कलावंत आणि भूमिका अशा आहेत– रणजित–कंस, शम्मीकपूर–भीष्म, अमजदखान–जरासंध, प्राण–शकुनीमामा, अमोल पालेकर–सुदामा, हेमामालिनी–द्रौपदी, डिंपल कापडिया–राधा, आशा पारेख–यशोदा, शर्मिला टागोर–देवकी, अनिता राज–रुक्मिणी, सुप्रिया पाठक–उत्तरा, निरुपा रॉय–कुंती आणि मुनमून सेन–सुभद्रा अशा भूमिका आत्तापर्यंत निश्चित झाल्या आहेत.

सौ. शौरी म्हणाल्या की, कृष्णा आणि अर्जुन यांच्या भूमिकांसाठी अद्यापी निवड व्हायची आहे. प्रसिद्ध अभिनेते दिलीपकुमार या निर्मितीत मार्गदर्शन करणार असल्याचे त्यांनी सांगितले. नामवंत हिंदी कवी नरेन्द्र शर्मा या चित्रपटाची कथा आणि संवाद लिहीत आहेत. सर्वश्री श्रीराम लागू, गिरीश कर्नाड, ए. के. हनगल, भारतभूषण, अरुण गोविल, कामिनी कौशल, दीना पाठक, आशा सचदेव यांचाही समावेश करण्यात आला आहे.

### ◻ सेवानिवृत्ति : सहानुभूतीचे धोरण

सेवानिवृत्तांच्या निवृत्तिवेतनाच्या पुनर्रचनेबाबतच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा केंद्र सरकार अभ्यास करीत असून "या बाबतीत "सहानुभूतीची भूमिका सरकार घेईल असे अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी नुकतेच राज्यसभेत सांगितले. या बाबतीत सरकारी अधिकाऱ्यांच्या गटाने अभ्यास करून केलेल्या सूचना मानवतावादी भूमिका घेऊन अंमलबजावणीसाठी विचारात घेण्यात येतील.

अर्थसंकल्पात यासाठी आपण २१५ कोटी रुपयांची तरतूद केल्याचेही अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केले. अकरा लाख निवृत्त–सेवकांना याचा फायदा मिळणार असून लौकरच त्याच्या कार्यवाहीच्या सूचना दिल्या जाणार आहेत.

### ◻ व्हिडिओविषयीचा एक निर्णय

लाहोर कस्टम्सच्या विशेष न्यायदंडाधिकाऱ्यांच्या मते व्हिडिओवर घरातून सिनेमा दाखवणे हा गुन्हा नाही. पोलिसांनी या स्वरूपाच्या दाखल केलेल्या १८ व्यक्तींच्या अटकेसंबंधीच्या केसेस निकालात काढताना या न्यायदंडाधिकाऱ्यांनी म्हटले आहे की, व्हिडिओ दाखवला जात असताना खाजगी ठिकाणी, एखाद्याच्या घरात पोलिसांनी प्रवेश करणे कायद्याला सोडून आहे. 'सर्च वॉरंट' असेल तरच पोलीस प्रवेश करू शकतात. या प्रकरणात पोलिसांनी व्हिडिओच्या मालकावर कस्टम्स ॲक्टखाली केस नोंदवली पाहिजे. कस्टम ड्यूटी वगैरे कराराची कागदपत्रे त्याने सादर केली नाहीत तर त्याच्यावर केस दाखल करावी, असेही त्यांनी सुचवले आहे.

### ◻ सौरऊर्जेच्या छताखाली

यापुढे मोठ्या प्रमाणात सौरऊर्जेचा वापर करण्याची योजना दिल्ली शहरासाठी आणण्यात आली आहे. केंद्रीय ऊर्जामंत्रालयाच्या अखत्यारीत ही योजना कार्यान्वित होणार आहे.

कापडगिरण्या, हॉटेले, खासगी–सरकारी इस्पितळे, सर्व प्रकारचे कारखाने या सर्वांनी आपल्याला लागणारे गरम पाणी सौरऊर्जेचा वापर करून मिळवावे आणि त्यासाठी छतावर सौर–ऊर्जासंग्राहक बसवावा असे सांगण्यात आले आहे.

या वर्षअखेरपर्यंत संपूर्ण दिल्ली अशा प्रकारे सौर–ऊर्जा–वापर सुरू करील अशी अपेक्षा आहे. केंद्रीय सार्वजनिक बांधकाम आणि गृहनिर्माण खात्याने सौर–ऊर्जेच्या वापराची ही योजना मान्य केली असून भविष्यात सरकारी इमारती बांधताना छतावर सौर–ऊर्जा–संग्राहक ठेवण्याची दक्षता घेण्यात येणार आहे.

### ◻ 'गांधी आणि 'फोर्ड–टी'

सर रिचर्ड ॲटनबरा यांच्या 'गांधी' चित्रपटात शिलाँगमधल्या श्री. हॉन्सन लिंगडोह या गृहस्थाने महत्त्वाचे सहकार्य केले आहे. सेहेचाळीस वर्षांचे हे खासी समाजातले व्यावसायिक. 'गांधी' चित्रपटाच्या

निर्मितिकाळात अॅटनबरा यांना १९१० च्या मॉडेलची फोर्डमोटारची गरज होती. ही मोटार श्री. लिंगडोह यांच्याकडे असल्याची माहिती मिळताच अॅटनबरांनी त्यांच्याशी संपर्क साधला. या घटनेने हा गृहस्थ आनंदाने आश्चर्यचकित झाला आणि ती मोटार त्याने चित्रीकरणासाठी देऊ केली. सर अॅटनबरा यांना संपूर्ण भारतात तपास केल्यानंतर ही गाडी शिलाँगच्या या व्यावसायिकाकडे असल्याची माहिती कळली.

अॅटनबरांनी लिंगडोह यांना गाडीच्या विम्याचे १ लाख रुपये दिले आणि साठ हजार रुपये चित्रपटातल्या त्या मोटारच्या वापरासाठी फी म्हणून दिले. याशिवाय लिंगडोह दांपत्याला दिल्लीत दहा दिवस चांगला पाहुणचार दिला. रोज त्यांना किरकोळ खर्चासाठी (पॉकेटमनी) तीनशे रुपये देण्यात आले. दिल्ली आणि परिसरातले चित्रीकरण पहाण्यासाठी त्यांना पासेस देण्यात आले होते.

खासी समाजातले ट्रॅक्टरचे उत्पादन करणारे कै. जे. आर. रोस्वेल यांचे लिंगडोह हे चिरंजीव. या चित्रपटात वापरलेली मोटार श्री. लिंगडोह यांनी एका इंग्रजी गृहस्थाकडून १९६६ साली विकत घेतली. त्या माणसाने विकत दिली एका अटीवर ! श्री. लिंगडोह यांनी आत्मविश्वासाने गाडी चालवून दाखवली तरच तो ही गाडी त्यांना विकत देणार होता. त्याप्रमाणे लिंगडोह तयार झाले. मोटारीची किंमत म्हणून त्या इंग्रजी गृहस्थाने लिंगडोह यांच्याकडून ५०० रुपये घेतले. मोटार चांगली चालवून दाखवल्यावर त्या गृहस्थाने लिंगडोह यांना २५० रुपये परत केले !

मोटार ताब्यात घेतल्यावर अॅटनबरांनी तिची तपासणी केली. इंजिनाचा आवाज टेप करून इंग्लंडला पाठवला आणि तपासून घेतला. मोटारीला रंग दिला. पूर्णतः नवे रूप दिले ! ही मोटार 'गांधी' चित्रपटात दक्षिण आफ्रिकेतल्या दृश्यासाठी वापरण्यात आली आहे !

## ▫ राजीव आणि संजय

चौदा ऑगस्टचे उदाहरण. त्या दिवशी संरक्षणमंत्रालयाने दिल्लीतल्या विजयचौकात एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. 'ट्रान्स–हिमालयन' म्हणून बहुचर्चित असलेल्या स्पर्धेत ज्या मोटारगाड्या भाग घेण्यासाठी रवाना होणार होत्या, त्यांना निरोपाचे झेंडे दाखवण्याचा कार्यक्रम त्या दिवशी राष्ट्रपती झैलसिंग यांच्या हस्ते होणार होता. प्रोटोकॉलप्रमाणे संसद–सदस्यांना पुढच्या रांगेत बसवण्याची प्रथा आहे. या वेळी पुढच्या रांगेत बसले होते मुत्सद्दी आणि सचिव अधिकारी. यामुळे सदस्य संतापले होते; पण त्यांनी राग आवरला; पण जेव्हा कार्यक्रमासाठी संरक्षणसदस्य राजीव गांधी आले तेव्हा प्रकरण तापले ! संरक्षणखात्याचे सचिव एम. सी. सरीन यांनी त्यांना पुढच्या रांगेत नेऊन बसवले. जनता पक्षाचे सदस्य सुब्रमण्यम् स्वामी यांनी श्री. सरीन यांना विचारले की, जेव्हा इतर संसदसदस्य मागच्या रांगेत बसतात तेव्हा राजीव गांधींनाच पुढच्या रांगेत का बसण्याचा मान मिळतो ? सरीन याचे उत्तर देऊ शकले नाहीत; पण त्याच दिवशी सायंकाळी संरक्षणखात्याचे राज्यमंत्री के. पी. सिंगदेव यांनी फोन करून स्वामी यांना सांगितले की, राजीव गांधी यांना संसदसदस्य म्हणून त्या कार्यक्रमाला आमंत्रण नव्हते, तर पंतप्रधानांच्या कुटुंबाचे सदस्य म्हणून त्यांना बोलावलेले होते. श्री. स्वामी कडाडले, 'राजीव गांधी आईच्या पदराआड लपण्याइतके आता लहान नाहीत !'

दुसरी घटना आणीबाणीच्या काळचा पर्वातली. भारताचे संरक्षणमंत्री होते बन्सीलाल. त्या वेळी संजय गांधींची हांजी हांजी करण्यात ते अग्रेसर होते. सुरक्षाव्यवस्था त्यांनी संजय गांधींसाठी ठेवली होती. संरक्षणमंत्रालयाच्या एका कार्यक्रमासाठी ते संजय गांधींना घेऊन कानपूरला गेले होते.

संरक्षणमंत्री म्हणून बन्सीलालना सलामी स्वीकारायची होती. त्यांना वाटले, आपल्याबरोबर संजयनी सलामी स्वीकारल्याशिवाय खरे नाही. संजयना त्यांनी व्यासपीठावर बोलावले आणि समोरच्या हवाईदलाच्या अधिकाऱ्यांत खळबळ माजली ! संजय गांधी असतील तर सलामी द्यायला हवाईदलअधिकाऱ्यांनी नकार दिला. बन्सीलाल त्या अधिकाऱ्यांवर गुरगुरले; पण त्या अधिकाऱ्यांनी काहीही प्रतिसाद दिला नाही. शेवटी संरक्षणमंत्री असलेल्या बन्सीलालनांसुद्धा माघार घेणे भाग पडले.

## ▫ बंगलोरला विधिविद्यालय

बार कौन्सिल ऑफ इंडिया ट्रस्टच्या वतीने पुढील वर्षापासून बंगलोर येथे राष्ट्रीय विधिविद्यालय सुरू होणार आहे. देशात कायदा शिकवणाऱ्या शिक्षकांना वाढती मागणी असल्याचे लक्षात घेऊन हे विद्यालय सुरू होत आहे प्रत्येक राज्यातल्या विद्यार्थ्यांना प्रतिनिधित्व मिळणार आहे.

ट्रस्टचे उपाध्यक्ष एन. रंगाराऊ यांनी सांगितले की, या विद्यालयाची रचना अमेरिकेतल्या हॉर्वर्ड व्यवसाय–प्रशासन विद्यालयासारखी राहील. हा अभ्यासक्रम पाच वर्षांचा राहील.

## ▫ प्रौढ-शिक्षणात स्त्रिया मागे

स्त्री आणि पुरुषांमधील शिक्षणाची वाढती दरी कमी करण्यासाठी अधिकाधिक स्त्रियांना प्रौढ शिक्षण कार्यक्रमात सामील करण्याची सूचना या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना अनेक वक्त्यांनी केली. हे चर्चासत्र राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन आणि प्रशासन संस्था आणि प्रौढ शिक्षण संचालनालय यांनी आयोजिले होते. चर्चेत शिक्षणतज्ज्ञ आणि राज्यांच्या प्रौढ शिक्षण संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी भाग घेतला होता. १९५१ ते १९८१ च्या काळात अशिक्षित स्त्रियांची टक्केवारी ८९ वरून ६८ वर आली. पुरुषांची हीच टक्केवारी ६७ वरून ३६ वर आली. याचे एक कारण सांगण्यात आले ते असे की, मुलींना शिकायला उत्तेजन कमी दिले जाते. लौकर लग्न, सांसारिक जबाबदारी, वारंवार प्रसूती, कुपोषण आणि असंघटितपणा यामुळे स्त्रिया नेटाने शिकण्यात कमी पडतात. तसेच प्रौढ शिक्षणासाठी पुरेशा महिला–पर्यवेक्षकही नाहीत. या चर्चासत्रात सुमारे चोवीस सूचना मांडण्यात आल्या. त्यात महिलांना घरचे उत्पन्न वाढवण्याच्या कामात नवी तंत्रे शिकायला लावावीत ही एक आहे.

## ▫ इन्सॅट–१ बीची नोंद

या वर्षी महाराष्ट्र, गुजरात, आंध्रप्रदेश, ओरिसा आणि बिहार या राज्यांत प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना इनसॅट–१ बी या उपग्रहाच्या साहाय्याने सकाळच्या वेळेत दूरदर्शनवरून शैक्षणिक कार्यक्रम दाखवले जाणार आहेत. राष्ट्रीय संशोधन, प्रशिक्षण परिषद संस्थेमार्फत असे सुमारे नवीन ८० कार्यक्रम निर्माण करण्यात येणार आहेत. ☐

# नाट्यपंढरी



□ **चारुदत्त**

अण्णांच्या सामाजिक कार्याच्या मदतीची पसामूठ, भाऊरावांनी आपल्या कारकीर्दीत मणा–सवामणाची केली होती. सामाजिक कार्याला एरवी सढळ हाताने ते मदत करीतच असत; पण एकदा, 'गुजराथी लोक आपले भाऊच आहेत. त्यांना दुष्काळात सर्वतोपरी मदत करणे हे आपले कर्तव्य आहे' अशा अर्थाचे निवेदन लोकमान्य टिळकांनी आपल्या 'केसरी'त केले होते. लोकमान्यांचा शब्द वेदवाक्य मानणाऱ्या भाऊराव कोल्हटकरांनी, मुंबईत नाटकाचा खेळ करून, गुजराथच्या दुष्काळनिधीस गायीगुरांच्या रक्षणासाठी, किर्लोस्करमंडळीच्या नावे रोख रु २५००/– ची मदत केली. मुंबईचे पुढारी नि रसिक भाऊरावांच्या या देणगीने इतके भारावून गेले की, सर भालचंद्र भाटवडेकर यांच्या हस्ते त्यांना मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

भाऊराव गेल्यावर कंपनीचे कर्ते चालक अजोड कलावंत, दानशूर अशा सर्वच दृष्टीने 'लास्ट ऑफ द किर्लोस्कर्स', 'किर्लोस्कर मंडळीचा अखेरचा दुवा' या शब्दांत त्यांचे वर्णन शिवराम महादेव परांजपे यांनी आपल्या 'काळ' पत्रात त्यांच्यावरील मृत्युलेखात केले होते.

□ **फार्स**

जुन्या जमान्यात, मुंबईत 'सभ्य अमरचंदवाडी हिंदु नाटक मंडळी' गद्य नाटके करणारी नाटकमंडळी होती. त्यांची बहुतेक नाटके पौराणिकच असत; पण नाटक दाखवून वेळ उरला की, मग 'फार्स' करून दाखवीत. पुढे ही पद्धत 'शाहूनगरवासी'नेही उचलली होती. 'झोपी गेलेला जागा झाला' या नावाचा फार्स गणपतराव जोशी करीत असत. त्या काळात भरपूर करमणूक करण्याच्या कल्पनेतून फार्स जन्माला आला असावा. कारण नाटक पहाटेपर्यंत चालायलाच हवे असा त्या काळी प्रेक्षकांचा ग्रह असे.

तुम्हाला आश्चर्य वाटेल की, सौभद्र, मृच्छकटिक या नाटकांच्या मानाने 'संशयकल्लोळ' लवकर संपत असे. म्हणून त्यात 'खास जलशाचा प्रवेश' घालण्यात आला. मग त्यात नामांकित गवयांचे गाणे ऐकवू लागले. काही नाटक कंपन्यात रेवतीही जलशात 'ऐसी न मारो पिचकारी' पेश करू लागली. पुढे पुढे कित्येक 'संशयकल्लोळ' च्या प्रयोगात जलसा हेच मोठे आकर्षण होऊ लागले.


□ **गुड कॉंडक्ट फंड**

अण्णा, मोरोबा, बाळकोबा, भाऊराव, रामभाऊ हे किर्लोस्कर मंडळीचे पंचप्राण! सगळ्यांचा जीव आपल्या संस्थेत, आपल्या नाटकमंडळीत. ध्यास एकच, कंपनी मोठी कशी होईल? गुणी कलावंताचे चीज कसे होईल, हा एकच विचार त्यांच्या डोक्यात असे. संस्थेसाठी सर्वस्वावर तुळशीपत्र ठेवण्याची त्यांची तयारी असे नि तसा त्याग त्यांनी केलाही. किर्लोस्कर मंडळीच्या स्थापनेपासून, वर्षातून दोन महिने सुटी घेण्याची प्रथा होती. मंडळी सुटीत आपापल्या घरी जात. काही तेथेच रहात; पण पगार नसे. मालकांच्या मिळकतीतून, भागिदारीतून, दोन आणे, अडीच आणे, हिश्श्याची रक्कम नटमंडळीस, योग्यतेनुसार 'गुड कॉंडक्ट फंड' म्हणून वाटली जाई. शिवाय आजारपण, कौटुंबिक अडचणीत, कंपनीकडून मदत दिली जाईच. संस्थेच्या नटवर्गाचे नि पर्यायाने संस्थेचे हित साधणाऱ्या या दूरदृष्टीच्या मालकांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे, नाही का?

आज कलावंतांना मानधन, सरकारी वर्षासन, कलाकार–निधी अशा काही मार्गांनी थोडी-फार मदत होते हे खरे; पण ती फारच अपुरी पडते. शिवाय ती सगळ्याच गरजू कलावंतांपर्यंत पोचणे अशक्य होते. आपले उगाच मनात येते की, जी. सी. एफ. (G. C F.) चा किर्लोस्करी वसा साऱ्याच नाटकमंडळींनी मनोभावे पूजला असता, तर वीस-वीस, पंचवीस-पंचवीस वर्षं तोंडाला रंग लावून लोकरंजन करणाऱ्या, गुणवंतांना रंग उतरताच मदतीसाठी कुणाच्या तोंडाकडे पहाण्याची पाळी आली नसती! आजच्या पी. पी. एफ. (P. P. F.)च्या चालीवर किर्लोस्करी 'जी. सी. एफ'ची गंगाजळी खचितच उपयोगी पडली असती!

□ **संगीत न्हावी**

पूर्वीच्या काळी नाटकमंडळी हे एक संस्थानच असे. कलावंताच्या सरबराईसाठी, गडीमाणसे, न्हावी, धोबी, आचारी अशी अनेक मंडळी कंपनीत असत. किर्लोस्कर मंडळीत विसू न्हावी ही एक इब्लिश वल्ली होती. तो भाऊराव कोल्हटकरांपासून बहुतेक साऱ्या नटांच्या त्यांच्या गाण्या-बोलण्याच्या, आवाजासहित सुरेख नकला करून, सर्व मंडळींना नेहमी हसवीत असे! कंपनीत तो 'संगीत न्हावी' म्हणूनच प्रसिद्ध होता; पण जितका विनोदी तितकाच प्रामाणिक. अण्णासाहेब किर्लोस्करांचा त्याच्यावर फार जीव होता. अण्णांच्या अखेरच्या दिवसांत तो त्यांच्याबरोबर गुर्लसूरला होता. अण्णांच्या वडिलांनी अण्णांची नाटके पाहिली नव्हती. हा विसू न्हावी त्यांना अनेक गाणी म्हणून दाखवी. अण्णासाहेबांना मरणापूर्वी भ्रम झाला होता. संन्यास घेण्याचा निश्चय त्यांनी बोलून दाखविला होता नि अखेर संन्यास दिलाही गेला. अण्णांचा अखेरचा श्मश्रू नि रेशीमकाठी धोतरांच्या छाटाचा विसूच्याच हातून झाल्या. असे सांगतात, अण्णांचे देहावसान झाल्यावर अण्णांचा विसू–कंपनीचा संगीत न्हावी कंपनीत दिसला नाही!



MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW–28



## लवकरच प्रकाशित होत आहे

# पूर्णिया

लेखक : अनिल अवचट

तिसरी आवृत्ती

## प्रकाशित

श्याम हा मध्यमवर्गातला, मध्यम आकाराचा, मध्यम विकारांचा,
मध्यम बुद्धीचा, मध्यवर्ती सरकारातला मध्यम प्रतीचा अधिकारी.
साधा तसाच बेरकी. मिस्किलपणा हा त्याचा स्थायीभाव.
राधा त्याला कधी साथ करते तर कधी विरोध.
त्यांच्या संसाराच्या या कथा.

# काही दिवस श्यामचे, काही राधाचे

लेखक : फिरोझ रानडे

मूल्य : पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशित